CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | शनिवार, ५ जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक - २३७ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



८०० वर्ष हिंदुस्थानने अथक स्वातंत्र्यलढा चालवला... स्वातंत्र्ययुद्धातील असंख्य कर्णधारांनी स्वातंत्र्याचे जहाज चालवले. त्यांच्या अखंड प्रहारामुळे, इस्लामची विजयी तलवार धूळ खात पडली.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

### विनम्र अभिवादन



**राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका वं. मावशी केळकर यांचा आज (तिथीप्रमाणे) जन्मदिन. हा दिवस संकल्पदिन म्हणून पाळला जातो.**

# भाषेच्या नावावर गुंडगिरी खपवून घेणार नाही

## मुख्यमंत्र्यांचा इशारा



◆ **मुंबई, ४ जुलै**

आम्हीसुध्दा मराठी आहोत, आम्हाला मराठीचा अभिमान आहे. महाराष्ट्रात मराठी बोलली गेली पाहिजे, हा आग्रहदेखील चुकीचा नाही. पण एखाद्या व्यावसायीकाला मराठी येत नाही म्हणून मारहाण करणं चुकीचं आहे. अशाप्रकारे भाषेच्या नावावर गुंडगिरी खपवून घेणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अमराठीद्वेषींना दिला.

राज्यात आणि विशेष करुन मुंबईत मराठी भाषेचा मुद्दा चांगलाच तापला आहे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी २९ जून रोजी एका व्यावसायिकाला मराठी भाषेचा अपमान केला म्हणून मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर मीरा भाईंदर परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झाला होता. या घटनेचे पडसाज राजकीय वर्तुळातही उमटले. यावर फडणवीसांनी कडक इशारा दिला. फडणवीस म्हणाले, भाषेवरून मारहाण करणं हे अतिशय चुकीचं आहे. महाराष्ट्रील मराठी भाषिक लोकं देशाच्या इतर राज्यात व्यवसाय, नोकरीच्या निमित्ताने गेले आणि त्यांना तेथील भाषा येत नसेल तर, त्यांच्यासोबतही अशीच वर्तणूक झाली तर ते योग्य होईल का? ◂(तभा वृत्तसेवा)

## तेव्हा कुठं गेलं होतं मराठी प्रेम?

### शिंदेंचा ठाकरेंवर पलटवार

◆ **मुंबई, ४ जुलै**

लोकसभा निवडणुकीच्या मिरवणुकीत पाकिस्तानचे झेंडे नाचवले, तेव्हा कुठं गेलं होतं मराठी प्रेम, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठा गटावर जोरदार पलटवार केला.

एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्यानंतर विरोधक शिंदे यांच्यावर टीका करताना दिसत आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्रात राहून जय गुजरात म्हणणे हा महाराष्ट्राचा अपमान असल्याची टीका केली आहे. याशिवाय शिवसेना ठाकरे गटाचे इतर नेतेही एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना दिसत आहेत. त्यावर स्पष्टीकरण देण्यासाठी आता एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरेंचा जुना व्हिडीओ दाखवत पलटवार केला.

आज चार-पाच कार्यक्रम होते. त्यातील एक कार्यक्रम जय गुजराती या संस्थेचा होता. पुण्यात पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या गुजराती लोकांनी जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटर उभारले आहे. त्यामध्ये सर्वसामान्य लोकांसाठी हॉल असतील, त्यामध्ये इनडोअर गेम, स्पोर्ट क्लब अस सर्वच आहे. तिथल्या सर्वसामान्य लोकांना सोयीसुविधा आणि सर्व गोष्टी उपलब्ध करून देण्याच काम या संस्थेने केलं आहे.. मी नेहमी भाषणामध्ये जय हिंद, जय महाराष्ट्र बोलतोच, असे म्हणत शिंदे यांनी आपल्या वक्तव्यावर खुलासा केला. ◂(तभा वृत्तसेवा)

### 'केम छो शिंदेसाहेब' म्हणत विरोधकांनी डिवचले

(वृत्त शेवटच्या पानावर) ▸

### ठाकरेंनीही दिला होता जय गुजरातचा नारा : सरनाईक

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात, जय आंध्र, जय कर्नाटक असं म्हणण्यात काय चुकीचं आहे. उद्धव ठाकरे सुद्धा गुजराती भाषेमध्ये बॅनर लावले होते. जय गुजरात म्हणाले होते. संजय राऊत एकदा पाकिस्तानमध्ये गेले होते तेव्हा त्यांनी जय पाकिस्तान म्हटले होते. निवडणूक आली की मराठी भाषा आठवते. अशा शब्दांत सरनाईक यांनी ठाकरे गटावर जोरदार टीका केली. ■

# दोन दशकानंतर ठाकरे बंधू आज एका व्यासपीठावर

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ४ जुलै-**

गेल्या जवळपास दोन दशकापासून परस्पराविरोधी राजकीय भूमिका घेणारे उद्धव व राज हे ठाकरे बंधू शनिवारी एका व्यासपीठावर येऊन राज्यातील जनतेला साद घालणार आहेत. पहिलीपासून हिंदी भाषा शिकविण्याचा जीआर रद्द केल्याबद्दल काढण्यात येणाऱ्या विजयी मेळाव्यात ते एकत्र येत असून ते काय बोलणार, याबद्दल मराठी माणसासह देशभरातील राजकारण्यांचे लक्ष लागून राहिलेले आहे.

कोणत्याही पक्षाचे बॅनर न लावता होणाऱ्या या मेळाव्यात सर्वपक्षातील मराठीप्रेमींनी सहभागी होण्याचे आवाहन शिवसेना ठाकरे गट व मनसेच्यावतीने करण्यात आले आहे.त्यामुळे महाविकास आघाडीतील कोणकोणत्या पक्षाचे नेते यामध्ये सहभागी होतात?, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. वरळीतील डोममध्ये सकाळी अकरा वाजता हा मेळावा सुरु होणार आहे. त्यासाठी आजपासूनच राज्यभरातून शिवसेना व मनसेसैनिक मुंबईकडे रवाना झाले आहेत. विजयी मेळाव्याच्या ट्रिजर दोन्ही पक्षाकडून जारी करण्यात आला आहे. तसेच मुंबई महानगरासह राज्यभरात विविध ठिकाणी याबाबत पोस्टर लावण्यात आले असल्याने अभूतपूर्व वातावरण निर्मिती झाली आहे. मुंबई महापालिकेसह राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यातून राज्याच्या राजकारणाची दिशा बदलण्याची शक्यता वर्तविली जात आहे. केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रीकरणाच्या धोरणानुसार राज्य सरकारने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून पहिलीपासून हिंदी ही तिसरी भाषा लागू करण्याचे अध्यादेश (जीआर) काढले होते. त्याला मनसे व शिवसेना ठाकरे यांनी विरोध केला. त्याविरोधात ५ जुलैला सर्वपक्षीय मेळावा काढण्याचे जाहीर केले होते.



### मेळाव्यातील ठळक मुद्दे

- दोन्ही ठाकरेंचे पक्ष आणि त्यांचे नेते आपआपला पक्षीय अहंकार बाजूला ठेवून मेळाव्यासाठी झोकून काम करत आहेत.
- सोशल मिडीया, बॅनर, जाहिरातींद्वारे या मेळाव्याची जोरदार प्रसिद्धी केली आहे.
- गर्दीचे नियोजन ही मेळाव्यातील दोन्ही पक्षांची संयुक्त जबाबदारी असणार आहे. दोन्ही ठाकरेंच्या पक्षांमधील नेत्यांच्या विशेष टीम तयार करुन जबाबदारीचं वाटप केलं जाणार आहे.
- वरळी डोममध्ये गर्दी झाल्यास डोमच्या गॅलरीही कार्यकर्त्यांसाठी खुल्या केल्या जाणार आहेत. वरळी डोम परिसरात मोकळ्या जागेत अतिरिक्त शेड टाकून बैठक व्यवस्था केली जाणार आहे.



**सोलापूर : आषाढी एकादशीनिमित्त शुक्रवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग मुंबई या स्थानिक कलाकारांचा 'विठू माऊलीच्या दारी' हा संगीत नृत्य कार्यक्रम झाला. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# बाजीराव पेशव्यांच्या स्मारकासाठी एनडीएचीच जागा योग्य : अमित शाह

## स्वराज्य रक्षणाचे उत्तम उदाहरण म्हणजे ऑपरेशन सिंदूर

◆ **पुणे, ४ जुलै**

स्वराज्य रक्षण किंवा सार्वभौमत्वाचे उत्तम उदाहरण म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' आहे. पहिले बाजीराव पेशवे यांनी अनेक लढाया लढल्या आणि जिंकल्या. छत्रपती शिवारायांनी स्थापन केलेले स्वराज्य वाढविण्याचे कार्य पहिल्या बाजीराव पेशव्यांनी केले. अशा या सेनानीचे स्मारक एनडीएतच हवे, असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले आहे.




**पुतळा अनावरणप्रसंगी गृहमंत्री अमित शाह यांना श्रीमंत बाजीराव पेशवे यांची प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली**

अमित शाह यांच्या हस्ते पुण्यातील खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथे थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे,केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ, एनडीएचे प्रमुख व्हाईस अडमीरल गुरुचरण सिह यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी शिवाजी महाराजांना प्रणाम करून भाषणाला सुरूवात केली. पुण्याची भूमी स्वराज्याच्या संस्काराचे उगमस्थान आहे, असेही शाह म्हणाले.

जेव्हा मनात नकारात्मक विचार येतात तेव्हा मी शिवाजी महाराज आणि बाजीराव पेशवे यांचा विचार करतो. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत लढा दिला. आता स्वराज्याचे रक्षण करण्याची जबाबदारी १४० कोटी भारतीयांवर आहे, असे शाह म्हणाले. देशाच्या सार्वभौमतेचे आणि स्वराज्याचे रक्षण करण्याची वेळ आली तेव्हा आम्ही ऑपरेशन सिंदूर राबविले. शिवरायांनी स्थापन केलेले स्वराज वाचविण्यासाठी पेशव्यांनी जर पुढील शंभर वर्षे लढाया लढल्या नसत्या तर आजचा भारत दिसला नसता. अवघ्या ४० वर्षांच्या आयुष्यात बाजीराव पेशव्यांनी जो इतिहास रचला त्याला तोड नाही, अशा शब्दात शाह यांनी बाजीराव पेशव्यांना आदरांजली अर्पण केली. ◂(वृत्तसंस्था)

### खरा इतिहास बदलण्याचा प्रयत्न

» पालखेडच्या लढाईतील बाजीरावांची कामगिरी जागतिक पातळीवर नोंदविण्यात आली. अशा अनेक लढाया लढल्या पण त्याची नोंद घेतली गेली नाही. देशाचा इतिहास बदलण्याचा प्रयत्न झाला. अशा योद्ध्यांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे, असे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ■



# फताटेवाडीत प्रकल्प बाधित शेतकऱ्याची आत्महत्या

## वाढीव मावेजा व कंत्राटी कामगार म्हणून कामावर घेतले नसल्याचा कुटुंबियांचा आरोप

तभा वृत्तसेवा
**सोलापूर, दि. ४ जुलै -**
फताटेवाडी येथे औष्णिक ऊर्जा प्रकल्प बाधित शेतकरी मिथुन धनु राठोड (वय ४०) या शेतकऱ्याने शुक्रवारी सकाळी गळफास घेऊन आपली जिवन यात्रा संपवली. एम टीपीसीची वाढीव रखमा देण्यास विलंब झाला आहे. एनटीपीसी मध्ये कंत्राटी कामगार म्हणून कामावर घेण्यासाठी त्यांच्याकडे दलालाने पैशाची मागणी केली होती. प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना सोडून बाहेरील लोकांकरवी कामगार म्हणून भरती करण्यात येत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. मिथुन स्वतः आर्थिक विवंचनेत असल्यामुळे दलालाला तो पैसे देऊ शकला नाही. त्यामुळे त्याचे काम न झाल्यामुळे नैराश्यातून त्याने गळफास घेऊन आपली जीवनातला संपली. फताटेवाडी ग्रामस्थ मृतदेह घेऊन औष्णिक ऊर्जा प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर ठेवून जोपर्यंत आपल्याला न्याय मिळत नाही तोपर्यंत इथून मृतदेह हलवणार नाही अशी भूमिका ग्राम स्थांनी घेतली आहे. रात्री उशिरापर्यंत एनटीपीसीम धील अधिकारी, पोलिस अधिकारी, महसुलचे अधिकारी, मृताचे नातेवाईक, ग्रामस्थ यांची बैठक सुरु होती. तोपर्यंत तरी मृतदेह गेटवरून घेऊन जाऊन अंत्यसंस्कार करण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नव्हता.



घटनास्थळी वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, पोलीस उपनिरीक्षक रविराज कांबळे, म्हाळप्पा सुरवसे हे घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती करताच राजकीय नेते देखील या ठिकाणी उपस्थित झाले यामध्ये सुरेश हसापुरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रामाप्पा चिवडशेट्टी, अभिजित कुलकर्णी, जगन्नाथ गायकवाड, सुभाष पाटोळे, नरसाप्पा दिंडोरे याबाबत अधिक माहिती कारभारी राजेंद्र राठोड यांनी दिली. यावेळी फताटेवाडीसह प्रकल्प बाधित गावातील सरपंच, नागरिक, कामगार, बहुसंख्येने उपस्थित होते. यापसंगी प्रकल्पातील कोणतेही अधिकारी भेटीसाठी गेटवर येत नसल्याने संतप्त जमावाने औष्णिक ऊर्जा प्रकल्पाच्या प्रवेशद्वारावर दगडफेक केली. संतप्त महिलांनी गेटवर चढून प्रकल्पात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तर रमेश राठोड या तरुणाने अंगावर पेट्रोल ओतून घेतले. तेव्हा लागलीच पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

घटनास्थळी दक्षिण तहसीलचे निवासी नायब तहसीलदार राजाभाऊ भंडारे, मंडल अधिकारी रियाज भाईजान, तलाठी शेडयाळ, दाखल झाले होते.

### मृतदेह ठेवण्यासाठी ग्रामस्थांनी मागवला फ्रिजर

जोपर्यंत विषयावर तोडगा निघत नाही तोपर्यंत मृतदेह हलवणार नाही अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली होती यासाठी विलंब लागणार असल्याचे ओळखून ग्रामस्थांनी मृतदेह ठेवण्यासाठी फ्रीजर मागविला होता.

# गौहर हसन यांच्याकडे मुख्यालय तर अश्विनी पाटील यांच्याकडे गुन्हेचा पदभार

तभा वृत्तसेवा
**सोलापूर, दि. ४ जुलै -**
सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयात नव्याने रूजू झालेले पोलिस उपायुक्त गौहर हसन यांच्याकडे पोलिस उपायुक्त मुख्यालय व वाहतूक शाखा तर अश्विनी पाटील यांच्याकडे पोलिस उपायुक्त गुन्हे चा पदभार देण्यात आला आहे. याबाबतचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले आहेत.



गौहर हसन



अश्विनी पाटील

गेल्या काही दिवसापूर्वी राज्यातील ८३ पोलिस अधिक्षक/उपायुक्त पदाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश गृह विभागाने दिलेले आहेत. त्यामध्ये सोलापूर शहर आयुक्तालयातील उपायुक्त अजित बोऱ्हाडे यांची बृहन्मुंबई येथे, दिपाली काळे यांची एसआरपीएफ सोलापूरच्या समादेशपदी तर विजय कबाडे यांची नागपूर शहर येथे बदली करण्यात आली आहे. तर शहर आयुक्तालयामध्ये मुंबई येथून पदाच्या प्रतिक्षेत असलेले गौहर हसन आणि सीआयडी कोंकण विभागाच्या अधिक्षक अश्विनी पाटील यांची बदली झालेली आहे. गौहर हसन व अश्विनी पाटील हे सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयात रूजू झाल्यानंतर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी गौहर हसन यांच्याकडे मुख्यालय तर अश्विनी पाटील यांच्याकडे गुन्हे विभागाचा पदभार दिला आहे.

## महत्त्वाचे...



### वाचनाने शब्द भांडार वाढते : गोयल

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
सध्या मोबाईलच्या युगात वाचन खूप कमी झाले आहे.वाचनाने शब्द भांडार वाढते.त्यामुळे विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन करावे. शब्द भांडारात वाढ झाल्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा नकळत विकास होतो, त्यामुळे सभाधीटपणा येतो, असे प्रतिपादन सहस्त्रार्जुन शिक्षण संस्थेचे सचिव गजानन गोयल यांनी केले. प्रिसिजन वाचन अभियानातर्फे आज सहस्त्रार्जुन प्रशालेत बुकमार्क या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी गोयल बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा माने, इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार ,प्रिसिजनच्या जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे, श्रीधर खेडगीकर उपस्थित होते. स्पर्धेत २०० हून अधिक स्पर्धकांनी आकर्षक बुक मार्क तयार केले होते. परीक्षक म्हणून संगीता पवार यांनी काम पाहिले. वैशाली बनसोडे यांनी मुलांना बोधपर गोष्टी सांगून बोलते केले.श्रीधर खेडगीकर यांनी प्रास्ताविक केले तर आभार भगवंत उमदीकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश आळंगे, संगीता पवार, धनश्री महाजन,मल्हेश पुरवंत, सुमय्या सय्यद,सोनाली उन्हाळे, वैष्णवी जाधव, निशिगंधा खिलारे यांनी परिश्रम घेतले. संस्कार खोबरे, मानसी भोसले, साक्षी बिराजदार, अथर्व शिंदे, संस्कृती जोकारे,भाग्या हिप्परगी, रूपा सुतार, स्नेहा कोरे, साक्षी माळगे, अश्विनी गवळी आदी यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.



### शंभर टक्के वसुली झाल्याबद्दल सोसायटी सभासदांकडून सत्कार

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
होनमुर्गी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सलग तीन वर्ष शंभर टक्के वसुली पूर्ण झाल्याबद्दल सोसायटी सभासदांकडून चेअरमन बसवराज हसापुरे व सेक्रेटरी ईरण्णा शेतसंदी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच सुभाष तेली, संचालक रजाक निंबाळे, महेश नरसगोंडे, माजी उपसरपंच राजू कोळी, कुतूब पटेल, राजकुमार उंबरजे, महमद कादरी, बापू हवालदार, जंगली कादरी, पैंगबर मुल्ला, मुबारक निंबाळे, कलप्पा रामपुरे उपस्थित होते.

### फरशीने तरूणास मारहाण करणाऱ्या तीन महिलांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ जुलै -**
फरशीने तरूणास मारहाण करणाऱ्या तीन महिलांवर एमआयडसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आकाश रामसिंग मैनावाले (वय २८, रा. बालसिंवयोगी नगर, कुमठा नाका, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादिवरुन कमल केवलसिंग कैय्यावाले, जुगनाबाई कैय्यावाले, ममता राजेश मैनावाले (रा. शिवगंगा नगर भाग ५, मजरेवाडी, सोलापूर) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ जुलै रोजी रात्री शिवगंगा नगर येथे आकाश मैनावाले, भाऊ निलेश व बहिण अंजेली असे तिघेजण वहिणी ममता हिचे भाऊ राजेश यांच्यासोबत भांडण झाल्याने वहिणीला घरी आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी कमल कैय्यावाले व जुगनाबाई कैय्यावाले या दोघींनी आम्ही ममताला पाठविणार नाही, तुमच्यावर खोटा गुन्हा दाखल करणार आहे अशी धमकी देऊन अंजेली हिस शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. तसेच आकाश हा भांडण सोडविण्यासाठी गेला असता वहिणीचा भाऊ अमित हा मागून आला व त्याने रस्त्याच्या कडेला पडलेली फरशी डोक्यात मारून आकाशाला जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### 'पोलिस केस मागे घे' म्हणत महिलेस मारहाण करणाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
पोलिस केस मागे घे म्हणत महिलेस मारहाण करणाऱ्याविरूद्ध जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चांदीणी विकास घाटगंरे (वय ३०, रा. भिमरत्न चौक, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन प्रताप सिद्राम गायकवाड (रा. बाँबी चौक, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जून रोजी दहाच्या सुमारास कचरा डेपोजवळ चांदीणी घाटगरे यांना प्रताप गायकवाड याने निळ्या पत्र्याच्या खोलीजवळ बोलावले. त्याठिकाणी प्रताप गायकवाड याने तु माझ्या लोकांविरूद्ध केलेली पोलिस केस माघारी घे असे म्हणून चांदीणी यांना शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. त्यावेळी पोलिस केस माघारी घेणार नाही असे म्हणाल्यानंतर प्रतापने चांदीणीस भिती घालण्यासाठी पिवळ्या रंगाचे फिनेलसारखे द्रव्य चांदीणीस पाजले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### संगमेश्वरच्या पार्किंगमध्ये सायकलच्या चेनने तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ४ जुलै -**
सात रस्ता परिसरातील संगमेश्वर कॉलेजच्या पार्किगमध्ये अज्ञात कारणातून सायकलच्या चेनने तरुणाला मारून जखमी केले. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता घडला. पार्थ पांडुरंग झांबरे (वय १८, रा. निराळे वस्ती, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास पार्थ हा संगमेश्वर कॉलेजच्या पार्किंगमध्ये उभा होता. त्यावेळी तेथे प्रतिक कट्टीमणी व त्याचे चार साथीदार आले. त्यांनी पार्थला अज्ञात कारणातून सायकलच्या चेनने, फायटरने तसेच लोखंडी सळईने मारहाण केली. यात डाव्या हाताला आणि पाठीला खरचटल्याने दुपारी दोनच्या सुमारास स्वतः शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# डॉ. ऋत्विक जयकर यांच्याकडे अधिष्ठाताचा अतिरिक्त पदभार

तभा वृत्तसेवा
**सोलापूर, दि. ४ जुलै -**
डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त पदभार येथील शल्य चिकित्सक डॉ. ऋत्विक जयकर यांच्याकडे देण्यात आला आहे.



३० जून रोजी अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर हे निवृत्त झाले. त्यामुळे त्यांच्या झालेल्या रिक्तपदी डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शल्य चिकित्सा शास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. ऋत्विक जयकर यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत अधिष्ठातापदाचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे.

याबाबतचा आदेश महाराष्ट्र शासनाच्या उपसचिव श्वेतांबरी खडे यांनी काढला आहे. डॉ. जयकर यांचे एमबीबीएसचे शिक्षण सोलापुरात तर एम. एस. चे शिक्षण कराड येथे झाले आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात शल्य चिकित्सक म्हणून चांगले काम केले आहे. त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अनेकांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# १४ हजार विद्यार्थ्यांनी घेतला अकरावीत प्रवेश

■ **सोमवारपर्यंत प्रवेश घेण्यास मुदत**

तभा वृत्तसेवा,
**सोलापूर, दि. ४ जुलै-**
२८ जूनपासून अकरावी प्रवेशप्रक्रीया सुरू झाली असून जिल्ह्यातील १४ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. सोमवार ७ जुलैपर्यंत पहिल्या यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी मुदत देण्यात आला आहे. त्यानंतर ९ जुलैला दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.

२६ जूनपासून सुरू होणारी प्रवेशप्रक्रीया दोन दिवस उशिराने २८ जूनला सुरू झाली. त्यामुळे २८ जूनपासून विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेत आहेत. यापूर्वीच शाळा महाविद्यालयांना इनहाऊस अंतर्गत संस्था कोटातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

मात्र यावेळी अनेक विद्यार्थ्यांची अर्जप्रक्रीया चुकल्याने काही महाविद्यालयात रिक्त जागांची संख्या अधिक आहे. २८ जूनपासून सुरू झालेल्या प्रवेश प्रक्रियेत जिल्ह्यातून १४ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

आज शनिवार आणि सोम वार प्रवेश घेण्यासाठी अंतिम मुदत राहणार आहे. त्यामुळे दोन दिवसात विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावे लागणार आहे. त्यानंतर शाळा महाविद्यालयांनी रिक्त जागांची माहिती दिल्यावर उर्वरित जागासाठी ९ जुलैपासून दुसरी यादी जाहीर करण्यात येणार आहे.

> २८ जूनला कॅपमधून पहिली यादी जाहीर करण्यात आली असून ७ जुलैपर्यंत पहिल्या यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. त्यानंतर रिक्त जागांसाठी ९ जुलैला दुसरी यादी जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून त्वरित प्रवेश निश्चित करावे.
> **- सचिन जगताप, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**

# चेष्टामस्करी करण्याच्या कारणातून तलवारीने हल्ला

**सोलापूर, दि. ४ जुलै -**
शहरातील शानदार चौकात चेष्टामस्करी करण्याच्या कारणातून तरुणाला तलवारीने हल्ला करून जखमी केले. ही मारहाण गुरवार तीन जुले रोजी रात्री ८.३० च्या सुमारास झाली. आयान जहाँगीर शेख (वय १९, रा. शानदार चौक, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. गुरवारी रात्री आठच्या सुमारास यातील जखमी आयान व त्याचे मित्र शेख साबीर आणि अब्बास सय्यद हे शानदार चौकात बसले होते. त्यावेळी त्यांच्यात चेष्टामस्करी सुरु होती. यातून साबीर आणि अब्बास याने आयान याला तलवारीने वार केला. यात आयानच्या डोक्याला जखम झाली आहे. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ९.४५ वाजता भाऊ वसिम शेख याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# स्वच्छता मोहिमेमध्ये शुक्रवारी ४८ टन कचरा संकलित

■ **१४४ नागरिकांकडून ३८ हजार रुपये दंड वसूल**
■ **महापालिका कर्मचाऱ्यांनी हटविली कचरा साठलेली ३६ ठिकाणे**

तभा वृत्तसेवा,
**सोलापूर, दि. ४ जुलै-**
महापालिकेच्या वतीने दाखवण्यात येत असलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये शुक्रवारी ४ जुलै रोजी एकूण ४८ टन कचरा संकलित करण्यात आला. कचरा साठलेली ३६ ठिकाणे (जीव्हीपी) हटविण्यात आली आहेत. तर १४४ नागरिकांकडून ३८ हजार २०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली आहे.

शहरात बहुतांश भागात साचलेला तसेच नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी टाकलेला कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असल्याने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ४ जुले रोजी सोलापूर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या शहरातील सर्व कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये दैनंदिन शहर स्वच्छतेच्या कामकाजाव्यतिरिक्त शहराम धील विविध भागामध्ये आढळून आलेल्या कचऱ्याचे ढीग हटविण्यात आले. रस्त्यावर तसेच सार्वजनिक ठिकाणी नागरिकांकडून टाकण्यात आलेला कचरा वाहनाद्वारे संकलित करण्यात आला. या मोहिमेदरम्यान दैनंदिन स्वच्छतेच्या कामकाजानंतर सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व परिसर अस्वच्छ करणाऱ्या नागरिकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली. ही मोहिम घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक, मुख्य आरोग्य निरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली सर्व झाडूवाला/झाडूवाली, बिगारी, सफाई कामगार यांच्या समन्वयाने राबविण्यात आली.



### अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई : अतिरिक्त रवी पवार

सोलापूर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत ही मोहीम यापुढेही अशीच चालू राहणार आहे. सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर व परिसर अस्वच्छ करणाऱ्या नागरिकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. शहरातील नागरिकांनी शहरात स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

# थॉयराईडच्या आठ गोळ्या खाल्याने महिला अत्यवस्थ


**सोलापूर, दि. ४ जुलै -**
घरगुती कारणातून महिलेने थॉयराईडच्या आठ गोळ्या खाल्ल्याने महिला अत्यवस्थ झाली. हा प्रकार मोहोळ स्टेशनजवळील दिलीप वस्ती येथे गुरवारी रात्री ७.४५ च्या सुमारास घडला. सविता दिलीप भालेराव (वय ४०, रा.दिलीप वस्ती) असे महिलेचे नाव आहे. गुरवारी रात्री ७.४५ वाजता सविता या दिलीप वस्ती येथील त्यांच्या राहत्या घरी होत्या. त्यावेळी घरगुती कारणातून त्यांनी थॉयराईडच्या सात ते आठ गोळ्या खाल्ल्याने त्यांना त्रास होऊ लागला. त्यामुळे मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून पती दिलीप याने शुक्रवारी रात्री १२.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. उपचार करून रात्री १.४० वाजता महिलेला सोडण्यात आले आहे.

# सार्वजनिक शौचालयात गळफास घेऊन आत्महत्या

तभा वृत्तसेवा
**सोलापूर, दि. ४ जुलै -**
अण्णाभाऊ साठे नगर परिसरातील जवाहर येथील सार्वजनिक शौचालयात लुंगीने गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. हा प्रकार शुक्रवार चार जले रोजी सकाळी ७ च्या सुमारास उघडकीस आला. सुरेश सदाशिव सुरवसे (वय ४४, रा. जवाहर नगर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सुरेश हा शौचास जातो असे सांगून सकाळी सातच्या सुमारास राहत्या घराच्या परिसरातील सार्वजनिक शौचालयात गेला होता. त्याठिकाणी त्याने लुंगीने गळफास घेतला. ही बाब माहिती होताच नातेवाईकांनी पोलिसांना याबाबतची माहिती दिली. पोलीस हवालदार इनामदार यांनी नातेवाईकांच्या मदतीने त्याची गळफासातून सोडवणूक करून बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**बेशुध्द अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा मृत्यू**

मुरारजी पेठेतील सुपर मार्केट येथील कट्टयावर बेशुध्द अवस्थेत आढळून आलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आला. विनोद ईश्वर सातपुते (वय ४०, रा. हब्बू वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर) असे त्या व्यक्तीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास विनोद हा सुपर मार्केट येथील कट्टयावर बेशुध्द अवस्थेत आढळून आला. त्यास सहाय्यक फौजदार जाधव यांनी उपचारास सकाळी ११ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वी तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



**दहा वर्षाच्या मुलीला सर्पदंश**

सोलापूर - राहत्या घरासमोर खेळत असताना दहा वर्षाच्या मुलीला सर्पदंश झाला. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील नंदूर गावात गुरवारी रात्री ७.३० वाजता घडला. स्वरांजली लक्ष्मण माने (वय१०) असे मुलीचे नाव आहे. स्वरांजली हि नंदूर गावातील तिच्या राहत्या घरासमोर खेळत होती. त्यावेळी तिच्या डाव्या पायाला सापाने दंश केला. रात्री ९ वाजता मामा समाधान याने शासकीय रुग्णालयात दाखल केले असून ती शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

**अनैतिक संबंधाच्या संशयातून महिलेला मारहाण**

अनैतिक संबंधाच्या संशयातून महिलेला लाकडी बेलने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील चिंचोली एमआयडीसी येथे गुरवारी घडला. कल्पना परमेश्वर बनसोडे (वय ४५) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. कल्पना ही गुरवारी राहत्या घराजवळ थांबली होती. त्यावेळी नव-याबरोबर संबंध असल्याच्या संशयातून चंदा पंडित पवार या महिलेने लाकडी बेलने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ८.३० वाजता शेजारी राणी व्हरेंग या महिलेने कल्पना हिला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद झाली आहे.



# तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय व हि.ने. कॉलेजमध्ये सामंजस्य

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स आणि तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय यांच्यात शैक्षणिक व वाचन संस्कृतीच्या विकासासाठी परस्पर सहकार्याचा सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सत्यजित शहा, डॉ.मयेकर स्मिता, ग्रंथपाल डॉ.संदीप लोखंडे उपस्थित होते. तसेच तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयाच्या वतीने अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, उपाध्यक्ष बालराजू बोल्ली, सदस्य तिप्पान्ना गनेरी, भिमनाथ प्रभाकर आणि ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुड्डूर यांची उपस्थिती होती.

या सामंजस्य करारानुसार, दोन्ही संस्थांमधील ग्रंथसंपदेचा परस्पर उपयोग, स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके, वाचनवाढीचे उपक्रम, ग्रंथप्रदर्शन, साहित्यिक कार्यशाळा, आणि बहुभाषिक संवादांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यां ध्ये वाचनाची गोडी निर्माण करून त्यांचा वैचारिक व बौद्धिक विकास साधणे, हा या करारामागील प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अधिक वाचनसुविधा, विविध भाषांतील साहित्य व संशोधनासाठी आवश्यक स्रोत उपलब्ध होतील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रशियाच्या हल्ल्याने युक्रेनमध्ये विध्वंस

**● पाच तासांत डागली ५५० क्षेपणास्त्रे, २०० ड्रोन ● १० ठार, ३७ जखमी ● निवासी इमारतींसह लष्करी तळे उद्ध्वस्त**





◆ **कीव, ४ जुलै**

रशियाच्या लष्कराने शुक्रवारी सकाळी युक्रेनची राजधानी कीवसह सहा शहरांवर पाच तासांत २०० क्षेपणास्त्रे आणि ५५० ड्रोन डागले. यात अनेक निवासी इमारतींसह लष्करी तळे उद्ध्वस्त झाली. या हल्ल्यात १० नागरिकांचा मृत्यू तर ३७ जण जखमी असल्याची पुष्टी युक्रेनच्या लष्कराने केली आहे. १७० क्षेपणास्त्रे आणि ३०० पेक्षा अधिक ड्रोन युक्रेनच्या हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच नष्ट केल्याने मोठी हानी टळल्याचेदेखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये लिहिले की, रशियाच्या लष्कराने कीव, डनिप्रो, सुमी, खार्किव, चेर्निहिव्ह आणि आजूबाजूच्या परिसरात क्षेपणास्त्र आणि ड्रोनने हल्ला केला. यात कीवच्या अनेक भागातील निवासी इमारती, दुकाने, शाळा, एक रुग्णालय, एक रेल्वे मार्ग आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणांचे मोठे नुकसान झाले. रशियाने प्रथम कीवच्या दिशेने बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले, यात दोन लष्करी तळांचे नुकसान झाले. या हल्ल्यात सामान्य नागरिकांना जीव गमवावा लागला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी चर्चा केल्यानंतर आणि अमेरिकेने युक्रेनला शस्त्रास्त्रांचा साठा थांबवण्याचा निर्णय घेतल्यानंतर काही तासांतच हा हल्ला झाला. रशियाच्या हवाई दलाने हल्ल्याची पुष्टी केली.

त्यांनी सांगितले की, युक्रेनवर करण्यात आलेल्या हल्ल्यात शाहिद ड्रोन, बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला. निवासी भागाला लक्ष्य करण्यापूर्वी हल्ल्याची माहिती दिली होती. ◂(वृत्तसंस्था)

### आठ ठिकाणी अचूक लक्ष्य भेदले

कीव शहराचे महापौर विटाली क्लिट्स्को यांनी सांगितले की, रशियन हवाई दलाने युक्रेनमध्ये ५५० ड्रोन आणि २०० क्षेपणास्त्रे डागली. हल्ल्याचे मुख्य लक्ष्य कीव शहर होते. इमारतीच्या ढिगाऱ्यातून १० नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर ३७ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. या हल्ल्यात शहराचे प्रचंड नुकसान झाले. यात शाळा, निवासी इमारती आणि पायाभूत सुविधांचा समावेश आहे. रशियाच्या लष्कराने आठ ठिकाणी अचूक लक्ष्य भेदले. ■

### ट्रम्प-पुतिन यांच्यात सहाव्यांदा संवाद

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी युद्धविरामासंदर्भात गुरुवारी फोनवर चर्चा केली. जानेवारीमध्ये ट्रम्प पुन्हा निवडून आल्यानंतर दोन्ही नेत्यांनी सहाव्यांदा संवाद साधला. दोन्ही नेत्यांनी युक्रेन-इराण आणि अमेरिका-रशिया संबंधांसह अनेक मुद्यांवर चर्चा केली. पुतिन यांच्याशी झालेल्या संवादानंतर ट्रम्प म्हणाले, आम्ही युक्रेन युद्धाबद्दलही बोललो, पण मी या संभाषणावर खूश नाही. आज त्यांच्याशी झालेल्या संभाषणात कोणताही परिणाम समोर आलेला नाही. ■

### नाटोचा आग्रह सोडावा : पुतिन



ट्रम्प यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर पुतिन यांनी सांगितले की, युक्रेनविरोधात ज्या कारणाने युद्ध सुरू झाले, त्याचे समाधान होईपर्यंत रशिया संघर्ष थांबवणार नाही. त्यांना शांतता हवी असल्यात नाटोमध्ये सामील होण्याचा आग्रह सोडावा. रशियाने युक्रेनच्या लुहान्स्क प्रांत ताब्यात घेतला. ■

# इस्रायली हवाई हल्ल्यात ३५ पॅलेस्टिनी ठार

## सलग दुसऱ्या दिवशी गोळीबार डागली क्षेपणास्त्रे; ५० पेक्षा अधिक जखमी

◆ **देर अल-बलाह, ४ जुलै**

गाझा पट्टीत सलग दुसऱ्या दिवशी इस्रायली लष्कराने केलेल्या हल्ल्यात ३५ पॅलेस्टिनी ठार तर ५० पेक्षा अधिक जखमी झाले. हमासच्या अतिरेक्यांनी लक्ष्य करीत रफाह, खान युनूस आणि देर अल बलाह शहरातील विविध भागात क्षेपणास्त्र डागले. याशिवाय मदत केंद्राबाहेर गोळीबारदेखील करण्यात आला. या हल्ल्यात १० पेक्षा अधिक इमारती जमीनदोस्त झाल्या असून ढिगाऱ्यातून नागरिकांना बाहेर काढणे सुरू आहे.

गाझातील आरोग्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इस्रायली सैन्याने शुक्रवारी पहाटे विविध भागात क्षेपणास्त्रे डागले. यात १५ नागरिक ठार झाले तर मदत केंद्रावर जीवनावश्यक वस्तू मिळविण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या नागरिकांवर गोळीबार करण्यात आला. यात महिला आणि मुलांसह २० पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला. सलग दुसऱ्या दिवशी इस्रायली सैन्याने हल्ला केला असून गेल्या २४ तासात १३० पेक्षा अधिक नागरिकांनी जीव गमवला तर ३५० जण जखमी आहे. इस्रायली सैन्याने शाळा, निवासी इमारती आणि निर्वासितांच्या ठिकाणांना लक्ष्य करून हल्ले केले.



इस्रायलची हमास, इतर पॅलेस्टिनी गटांमध्ये युद्धविराम प्रस्तावावर चर्चा सुरू असताना होणारे हल्ले दुर्दैवी आहे.

### मृतदेहांची ओळख पटवणे कठीण

नासेर रुग्णालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, बचाव पथकाने आणलेली मृतदेह इतकी भीषण होती की, त्यांची पटवणे कठीण काम झाले आहे. इस्रायली हवाई हल्ल्यात १५ जण ठार झाले, ज्यात आठ महिला आणि एका मुलाचा समावेश आहे. तर मदतीची वाट पाहणाऱ्या २० जणांचा गोळीबारात मृत्यू झाला. त्यापैकी दोघांचा मृत्यू रफाहमधील मदत वितरण केंद्रांजवळ झाला आणि दक्षिण गाझामधील इतर ठिकाणी ट्रकमधून मदत साहित्याची वाट पाहत असताना झाला.

### ५७ हजार नागरिकांनी दोन वर्षांत गमावला जीव

गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने म्हटले की, दोन वर्षांत गाझामध्ये मारल्या गेलेल्या पॅलेस्टिनींची संख्या ५७ हजारांपेक्षाही जास्त आहे. मृतकांमध्ये निम्म्याहून अधिक महिला आणि मुले आहेत. मे महिन्यात मदत केंद्र सुरू झाल्यापासून इस्रायली सैन्याच्या गोळीबारात शेकडो लोक मृत्युमुखी पडले आहेत. गाझात संघर्षविराम घडवून आणावा, अशी नागरिकांची मागणी आहे. ◂(वृत्तसंस्था)

### विरोध करणाऱ्यांना अर्बन नक्षल म्हणणे फॅशन

**पुणे** : न आवडलेल्या विचारांना विरोध करणाऱ्यांना अर्बन नक्षलवादी म्हणणे आता फॅशन झाली आहे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प) नेते शरद पवार यांनी म्हटले आहे. शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांनी वारीत अर्बन नक्षलवादी घुसल्याचा आरोप केला होता. यावर विचारलेल्या प्रश्नावर पवार बोलत होते. कायंदे काय म्हणाल्या याबाबत मला फार काही माहिती नाही. पण, एखाद्या व्यक्तीला अर्बन नक्षलवादी संबोधण्याचे प्रकार यापूर्वीही घडल्याचे पवार यांनी सांगितले. ■

# नुकसान भरपाईच्या कपातीसाठी एअर इंडियाचा दबाव




◆ **अहमदाबाद, ४ जुलै**

नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये कपात करता यावी यासाठी

## अपघातातील मृतांच्या नातेवाईकांचा आरोप

आर्थिक अवलंबित्वाशी संबंधित कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी एअर इंडियाकडून दबाव आणला जात असल्याचा आरोप विमान अपघातातील मृतांच्या नातेवाईकांनी केला आहे. त्यानंतर आता एअर इंडियाकडूनही यावर स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांनी केलेले हे आरोप बिनबुडाचे असून, विमान कंपनी केवळ नुकसान भरपाईशी संबंधित प्रक्रियेचे पालन करत आहे, असे एअर इंडियाने स्पष्ट केले आहे.

एअर इंडियामधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आमच्याकडून पाठवण्यात आलेल्या प्रश्नावलीचा उद्देश हा केवळ नुकसान भरपाईचं वितरण योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावं यासाठी कौटुंबिक संबंधांची खात्री करण्याचा आहे. ही एक औपचारिक प्रक्रिया आहे. तसेच तिचे पालन आवश्यक आहे, असे एअर इंडियाने म्हटले आहे. तसेच पीडितांच्या कुटुंबीयांना सर्वतोपरी मदत मिळावी यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचेही एअर इंडियाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, हा अर्ज ई-मेलच्या माध्यमातून किंवा व्यक्तिगतरीत्या जमा केला जाऊ शकतो. ◂(वृत्तसंस्था)

### ४७ जणांच्या कुटुंबीयांना मदत

कुणाच्याही घरी न सांगता कुठलीही भेट दिली जाणार नाही. तसेच या अपघातानंतर वेगवेगळी पथके तयार करण्यात आली असून ती पीडित कुटुंबांना अंत्यसंस्कार, निवारा आणि इतर व्यवस्था करण्यामध्ये पीडितांच्या नातेवाईकांची मदत करत आहेत. आतापर्यंत मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांपैकी ४७ जणांच्या कुटुंबांना मदत करण्यात आली आहे. तसेच ५५ कुटुंबांना मदत करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहितीही एअर इंडियाकडून देण्यात आली. ■

# मराठीवरून हल्ला; सात मनसे कार्यकर्ते पोलिसांच्या ताब्यात

◆ **मुंबई, ४ जुलै**

राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) सात सदस्यांना मराठी न बोलल्याने फूडस्टॉल मालकाला मारहाण केल्याच्या आरोपाखाली ताब्यात घेण्यात आले, असे एका अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले.

पोलिसांनी नोटीस बजावल्यानंतर आरोपींना जाण्याची परवानगी देण्यात आली, असे त्यांनी सांगितले. ठाणे जिल्ह्यातील भाईंदर भागात मंगळवारी ही घटना घडली. समाज माध्यमावर सामायिक झालेल्या हल्ल्याच्या व्हिडीओमध्ये काही हल्लेखोरांनी मनसेचे चिन्ह असलेले स्कार्फ घातलेले दिसत होते. अन्न खरेदी करताना, त्यापैकी एकाने स्टॉल मालकाला मराठीत बोलण्यास सांगितले, ज्यावर त्याने त्यांना नाही असे उत्तर दिले. तो माणूस दुकानदारावर ओरडत असताना, त्याच्यासोबत असलेल्या काहींनी स्टॉल मालकाला झापड मारली, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. त्यानंतर काशिमीरा पोलिसांनी सात मनसे सदस्यांविरुद्ध दंगल, धमकी आणि मारहाण केल्याचा गुन्हा दाखल केला. ◂(वृत्तसंस्था)

# सरन्यायाधीश भूषण गवई यांचा विधानमंडळात ८ जुलैला सत्कार

**तभा वृत्त सेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ जुलै-**

महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र विधानमंडळातर्फे सत्कार करण्यात येणार आहे. ८ जुलैला दुपारी २.00 वाजता विधान भवनातील मध्यवर्ती सभागृह हा कार्यक्रम होईल, यांवेळी ते ''भारताची राज्यघटना'' या विषयावर संबोधन करणार आहेत. अशी घोषणा विधानपरिषद सभागृहात सभापती प्रा. राम शिंदे यांनी तर विधानसभेत अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी केली. सत्कार सोहळ्याला सभापती शिंदे, विधानसभा अध्यक्ष नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि अजित पवार आदी उपस्थितीत असतील.

### न्या. गवई यांचे मुंबईत स्वागत

मुख्य न्या. गवई यांचे परिवारसह छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी दुपारी आगमन झाले. यावेळी त्यांचे पूर्ण राज शिष्टाचाराप्रमाणे स्वागत करण्यात आले. गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झालेले गवई पहिल्यादाच मुंबईत आले त्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी राज्य सरकारतर्फे एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हता. त्याबाबत त्यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आज त्यांच्या आगमनावेळी योग्य खबरदारी घेतली होती. विमानतळावर राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अतिरिक्त मुख्य सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर- पाटणकर,मुंबईचे, पोलीस आयुक्त देवेन भारती, आदी उपस्थित होते.

# मुंबईतील कबूतरखाना बंद होणार

◆ **मुंबई, ४ जुलै**

आता यापुढे मुंबईत कबूतरखाना दिसणार नाही. महाराष्ट्र सरकारने बृहन्मुंबई महानगरपालिकेला मुंबईतील कबूतरखाना तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांच्या विष्ठेमुळे आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे कारण देण्यात आले आहे.



गुरुवारी विधान परिषदेत हा मुद्दा उपस्थित करताना शिवसेना नेत्या आणि नामनिर्देशित आमदार मनीषा कायंदे म्हणाल्या की, कबूतरखाने त्यांच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांसाठी धोकादायक आहेत, कारण त्यांच्या कचऱ्यामुळे व पंखांमुळे श्वसनाचे आजार होतात.

भाजपा नेत्या चित्रा वाघ म्हणाल्या की, कबुतरांच्या विष्ठेमुळे श्वसनाचे आजार झाल्यामुळे माझ्या मावशीचे निधन झाले. तोंडी उत्तर देताना उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, शहरात ५१ कबूतरखाने आहेत. महापालिकेला एका महिन्याच्या आत याविरोधात जागरूकता मोहीम सुरू करण्यास सांगितले जाईल. कबूतरखाने बंद करण्याची प्रक्रिया तत्काळ सुरू करण्याचे निर्देश बीएमसीला देण्यात येतील. ◂(वृत्तसंस्था)

### एआयएमआयएमचे युतीसाठी लालूंना पत्र

◆ **पाटणा, ४ जुलै**

बिहारमध्ये होणाऱ्या विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी युती करण्याची इच्छा दर्शविणारे पत्र एआयएमआयएमच्या आमदाराने राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव यांनी लिहिले आहे. बिहार विधानसभेत सध्या या पक्षाचा एकच आमदार आहे. तसेच राज्याचे प्रदेशाध्यक्षही आहेत. अख्तरूल इमाम यांनी लालू यांना पत्र लिहून इंडिया आघाडीत सहभागी करण्याचे विनंती केली आहे. २ जुलैला हे पत्र पाठविले आहे. आमचा सहभाग झाल्यास बिहारमध्ये पुढील सरकार महागठबंधनचेच असेल. गेल्या निवडणुकीत एकत्र येण्याचे प्रयत्न केले पण त्यात यश आले नाही. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आमच्या पक्षाने चांगले यश मिळविले होते. आम्ही पाच जागा जिंकल्या होत्या, असेही इमाम यांनी पत्रात नमूद केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सौदी अरेबियामध्ये सापडले आठ हजार वर्षे जुने मंदिर

◆ **रियाध, ४ जुलै**

सौदी अरेबिया हा एक इस्लामिक देश आहे. मात्र, येथे आठ हजार वर्षे जुने मंदिर सापडले आहे. या मंदिरात कहल देवतेची पूजा केली जात होती, असे म्हटले जाते. खरे तर, सौदी अरेबियाच्या सरकारने २०२२ मध्ये घोषणा केली होती की, रियाधच्या नैर्ऋत्येस आठ हजार वर्षे जुने पुरातत्त्व स्थळ अल फा सापडले आहे. येथे सौदी पुरातत्त्व विभागाच्या लोकांना एका मंदिराचे अवशेषदेखील सापडले आहेत.

आता या पुरातत्त्व स्थळावरील मंदिराचा शोध सर्वात महत्त्वाचा मानला जात आहे. हे मंदिर दगडापासून बनलेले आहे. तेथे वेदीचे काही अवशेष सापडले आहेत. यावरून स्पष्ट होते की, अल फा परिसरातील लोक पूजा आणि विधी



करत असत. हे पुरातत्त्व स्थळ नवपाषाण काळातील आहे. येथे वेगवेगळ्या काळातील एक दगडी वेदी आणि २८०७ कबरीदेखील सापडल्या आहेत. या थडग्यांचे सहा वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकरण केले आहे, असे पुरातत्त्व विभागाने म्हटले आहे. पथकाने सांगितले की, हे मंदिर खडक कापून बांधले गेले आहे. हे मंदिर अल फा क्षेत्राजवळील तुवाईक पर्वताच्या काठावर बांधले गेले होते. याला खाशेम कारिया असेही म्हणतात. लोक येथे पूजा करायचे.

### नवपाषाण काळात होती मंदिर संस्कृती

सौदी तज्ज्ञांनी या पुरातत्त्वीय स्थळाचा शोध घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. त्यांनी ड्रोन, रिमोट सेन्सिंग, ग्राऊंड-बेस्ड रडार, लेसर स्कॅनिंग आणि भूभौतिक सर्वेक्षणदेखील केले. असे म्हटले जाते की, अल फा येथील लोक काहल देवाची पूजा करायचे. येथील इमारती अशा प्रकारे बांधल्या गेल्या होत्या की, त्या अति उष्ण आणि वाळवंटातील वातावरणातही तग धरून राहतील. येथे काही पाण्याचे तलाव आणि शेकडो खड्डे बांधले गेले आहेत. या शोधावरून असे दिसून येते की, नवपाषाण काळात सौदी अरेबियामध्ये मंदिर संस्कृती होती आणि येथे मूर्तिपूजा केली जात होती. ◂(वृत्तसंस्था)

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी त्या पोलिसांवर गुन्हे दाखल करा

## उच्च न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ जुलै-**

परभणी येथील संविधान शिल्प विटंबना प्रकरणी आंदोलन करणार्या सोमनाथ सूर्यवंशीया तरुणाच्या मृत्यू प्रकरणी संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. सोमनाथ याच्या आईने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. अड प्रकाश आंबेडकर यांनी या याचिकेवर न्यायालयात सूर्यवंशी यांची बाजू मांडली होती.१६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत सोमनाथचा मृत्यू झाल्यावर सुरुवातीला तो हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, या प्रकरणी दोन महिन्यांनी परभणीच्या एका पोलीस अधिकाऱ्यासह २ पोलिसांना निलंबित करण्यात आले होते. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुरुंगात सोमनाथला पोलिसांनी मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाला नसून त्याला श्वसनाचा दुर्धर आजार होता असा उल्लेख शवविच्छेदन अहवालात आहे. आधीपासूनच त्यांच्या शरीरावर काही जखमा होत्या, असे सांगितले. प्रत्यक्षात शवविच्छेदन अहवालातून मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे उघड झाले होते. सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे आणि अहवालात मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालातही म्हटले आहे. न्यायालयात मृत्यूला पोलीस जबाबदार असल्याचा पुराव्यातून सिद्ध झाल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचा आदेश आज खंडपीठाने दिला.

# कृत्रिम बुद्धिमत्तेने सांभाळले दुकान; केला ग्राहकांशी व्यवहार

**● वस्तूंची यादीही केली तयार, साधला संवाद ● आश्चर्यकारक निष्कर्ष समोर, पण चुकलाही खूप**

◆ **वॉशिंग्टन, ४ जुलै**

एआय चॅटबॉट ९ ते ५ काम करू शकतो का याबाबत नुकताच एक प्रयोग करण्यात आला. २०२५ मध्ये एआय संबंधित अनेक नव-नवीन प्रयोग केले जात आहेत. यातच आता आणखी एकाची भर पडली आहे. अँथ्रोपिक या एआय संशोधन संस्थेने केलेल्या प्रयोगातून चॅटबॉट क्लॉडला हा दुकान कसे सांभाळतो याचा प्रयोग करण्यात आला. कंपनीने त्यांच्या एआय चॅटबॉट क्लॉडला वास्तविक जगात काम देऊन, संपूर्ण महिनाभर त्यांच्या ऑफिसमध्ये एक छोटेसे दुकान चालवून त्याची चाचणी घेतली.

कंपनीने त्यांच्या एआय चॅटबॉट क्लॉडला प्रत्यक्ष काम देऊन त्याची परीक्षा घेतली. महिनाभर त्यांच्या ऑफिसमध्ये एक छोटेसे दुकान चालवले. कल्पना सोपी होती. क्लॉडला स्टॉकिंग आणि किंमतीपासून ते ग्राहकांच्या विनंत्या आणि नफा कमावण्यापर्यंत सर्व



काही सांभाळायचे होते. त्यानंतर अनेक आश्चर्यकारक गोष्टी समोर आल्या. त्याने अनेक चुका केल्या. यावरून हे सिद्ध झाले की एआयला मानवांची जागा घेण्यासाठी अजूनही बराच पल्ला गाठायचा आहे.

कंपनीने तयार केलेले हे दुकान पूर्णपणे सुसज्ज होते. यात फ्रीज, बास्केट आणि वस्तू तपासण्यासाठी आयपॅड होता. सामान भरण्याची आणि भौतिक कामांची जबाबदारी मानवाची होती. क्वॉड हा सर्व गोष्टींचा निर्णायक होता. तो पुरवठादारांसाठी वस्तू शोधत होता. तसेच ईमेल पाठवू शकत होता. ग्राहकांशी संवाद साधणे, दुकान सुरू ठेवणे, हिशोब ठेवणे हे त्याचे ध्येय होते.

**या कामात कमी पडले एआय**

क्लॉडने काही मनोरंजक उत्पादने शोधण्यात यश मिळवले आणि विशेष ऑर्डरसाठी स्वतः पुढाकार घेऊन मदत देखील केली. परंतु तो लवकरच अडचणीत सापडला. त्यांनी अँथ्रोपिक कर्मचाऱ्यांना सवलती दिल्या. यासाठी त्यांना पैसे गमावावे लागले. त्यांनी काही वस्तू तोट्यात विकल्या. व्यवसाय संधींकडे दुर्लक्ष केले आणि पेमेंटसाठी बनावट व्हेन्मो पत्ता देखील तयार केला. महिन्याच्या अखेरीस, क्लॉडने त्याच्या सुरुवातीच्या पैशांपैकी जवळजवळ २० टक्के गमावले आणि दुकान जवळजवळ दिवाळखोरीत निघाले. ◂(वृत्तसंस्था)

### एआयची दिशाभूल करणे शक्य

कोणीतरी विनोद म्हणून विनंती केल्यानंतर त्यांनी लष्करी यंत्रणेत वापरल्या जाणाऱ्या टंगस्टन क्यूबसचा साठा करायला सुरुवात केली. कोक झिरो तीन डॉलर्समध्ये विकण्याचा प्रयत्न केला. तो कर्मचाऱ्यांना ऑफिसमध्ये मोफत मिळत होता. या घटनांनी हे दाखवून दिले की कृत्रिम बुद्धिमत्तेची सहजपणे दिशाभूल होऊ शकते. ■



# कामरा, अंधारे आले अडचणीत

## शिंदे यांच्यावरील विडंबनात्मक गाणे भोवले








◆ **मुंबई, ४ जुलै**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर केलेल्या भाष्यानंतर मागील अधिवेशनात शेवटच्या दिवशी सादर झालेला कॉमेडियन कुणाल कामरा आणि उबाठा नेत्या सुषमा अंधारे या दोघांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव हक्कभंग समितीकडे पाठविण्यात आला होता. तो या अधिवेशनात मंजूर झाला आहे. त्यामुळे या दोघांच्या अडचणीत आता वाढ झाली आहे.

कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या नया भारत या कॉमेडी शोमधून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक एक गाणं तयार करत, त्याचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल केला होता. तर, दुसरीकडे उबाठा गटाच्या सुषमा अंधारेंनी देखील व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे, या दोघांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव विधान परिषदेत दाखल करण्या आला होता.

सुषमा अंधारे यांनी बोलताना वापरलेली खालच्या पातळीवरील भाषा आणि कुणाल कामराने हेतूपूरस्पर उपमुख्यमंत्री यांच्यावर वैयक्तिक आणि उपरोधिक केलेले गाणे यातील भाषा एकप्रकारे सभागृहाचा अवमान करणारी आहे. त्यामुळे कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे यांच्याविरोधात हक्कभंग मांडण्यास अनुमती द्यावी, अशी विनंती प्रवीण दरेकर यांनी केली होती. त्यावर सभापती राम शिंदे यांनी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडं योग्य त्या कारवाईसाठी पाठवित असल्याचे जाहीर केले होते. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# ‘सर्वोच्च’ निर्णयाचा बोध

रस्ते अपघातात होणारे मृत्यू ही देशातील सर्वांत मोठी आणि गंभीर अशी समस्या म्हणायला पाहिजे. युद्धात आणि नैसर्गिक आपत्तीत आपल्या देशात दरवर्षी जेवढे मृत्यू होत नाहीत, त्यापेक्षा जास्त लोकांचे मृत्यू हे रस्त्यावरील अपघातात होत असतात. अधिकृत सरकारी आकडेवारीनुसार, दरवर्षी आपल्या देशात पाच लाख रस्ते अपघात होतात आणि त्यात दरवर्षी दीड लाखावर लोकांचे मृत्यू होतात, तर तीन लाखांवर लोक जखमी होतात. अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व येणाऱ्या लोकांची संख्याही कमी नाही. विशेष म्हणजे रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या खूप मोठी आहे. रस्ते अपघातात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होणे म्हणजे एक कुटुंब पूर्णपणे उद्ध्वस्त होण्यासारखे असते. पत्नी आपला पती, लहान मुले आपले वडील, बहीण आपला भाऊ तर वृद्ध आई-वडील आपला म्हातारपणाचा आधार गमवत असतात. त्यामुळेच रस्त्यांवरील अपघातात होणाऱ्या या प्राणहानीबाबत केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आपल्या सगळ्या भाषणांमध्ये सातत्याने चिंता व्यक्त करीत असतात. रस्ते अपघातात होणारी प्राणहानी कमी करण्यासाठी येत असलेल्या अपयशाबाबत शासकीय यंत्रणांना दोष देत असतात. येत्या पाच वर्षांत रस्ते अपघातात बळी पडणाऱ्यांची संख्या ५० टक्क्यांवर आणण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्पही गडकरी यांनी सोडला आहे.

कोणत्याही रस्ते अपघाताचे कारण एक नसते, तर रस्ते अपघाताची कारणे एकापेक्षा जास्त म्हणजे अनेक असतात. सदोष रस्ते बांधणी तसेच धोकादायक वळण हे रस्ते अपघाताचे एक प्रमुख कारण मानले जाते. गडकरी आपल्या भाषणात या कारणाचा सतत उल्लेख करीत असतात. रस्त्यावरील अपघात प्रवण क्षेत्र चिन्हीत करून त्या ठिकाणी असलेले अपघाताचे कारण दूर करण्याचे निर्देश गडकरी हे महाराष्ट्रात आधी सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच नंतर गेल्या ११ वर्षांपासून केंद्रात याच खात्याचे मंत्री असताना सातत्याने देत आहेत. त्याचा बऱ्यापैकी परिणाम झालेलाही दिसून येत आहे.

दारू पिऊन वाहन चालवणे हे आपल्या देशातील रस्ते अपघाताचे दुसरे प्रमुख कारण म्हटले पाहिजे. आपल्या देशात दारू पिणे ही फॅशन झाली आहे आणि दारू पिऊन वाहन चालवणे ही सवय असे म्हटले तर ते चूक ठरू नये. ट्रकसारखे अवजड वाहन चालवणारे बहुतांश चालक दारू पिऊन असतात, असे म्हटले जाते. याचा अर्थ सगळेच ट्रकचालक दारू पिऊन असतात, असे नाही, पण बहुतांश ट्रकचालक दारू पिऊन वाहन चालवतात, हे कोणालाच नाकारता येणार नाही. त्यामुळे बहुतांश अपघात हे ट्रकचेच वा ट्रकमुळे झालेले असतात.

याचा अर्थ खाजगी वाहनचालक दारू पिऊन आपली गाडी चालवत नाहीत, असे नाही. आजकाल तर दारू पिऊन वाहन चालवणे ही फॅशन झाली आहे. जो दारू पीत नाही त्याला गावंढळ समजले जाते. काही जण दारू पिऊनही अतिशय सावधपणे वाहन चालवत असतात, अशांची संख्या खूप कमी आहे. तर काही जण दारू न पिताही बेदरकारपणे वाहन चालवत असतात. हे सगळे रामायण सांगण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय. बेदरकारपणे वाहन चालवताना झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबीयांना विम्याची राशी देणे विमा कंपन्यांना बंधनकारक नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. २०१४ मध्ये कर्नाटकातील मल्लासांद्रा येथे एका अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. एन. एस. रवीश नावाची व्यक्ती कार चालवत होती, कारमध्ये त्याचे पालक आणि मुलेही होती. रवीश बेदरकारपणे कार चालवत होता, तसेच वाहतुकीचे नियमही पाळत नव्हता, वेगात असलेली कार नियंत्रण सुटल्यामुळे उलटली आणि त्यात त्याचाच मृत्यू झाला. रवीशच्या कुटुंबीयांनी केलेला अपघात विम्याचा ८० लाखांचा दावा विमा कंपनीने फेटाळला. त्या निर्णयाला कुटुंबीयांनी कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयानेही कुटुंबीयांचा दावा फेटाळत विमा कंपन्यांच्या बाजूने निर्णय दिला. याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असता, न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. रवीश बेदरकारपणे वाहन चालवत होता, असे दोन्ही न्यायालयांनी आपल्या निकालात म्हटले आणि त्याच्या कुटुंबाचा विम्याचा दावा फेटाळला. रवीश हा दारू पिऊन होता, असे चौकशीत आढळले नाही. मात्र बेजबाबदारपणे वाहन चालवत होता, असा ठपका त्याच्यावर न्यायालयाने ठेवला आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचा तसेच सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा दूरगामी परिणाम करणारा तसेच लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे, असे म्हटले पाहिजे. या निर्णयापासून लोकांनी काही बोध घ्यायला, धडा शिकायला पाहिजे. दारू पिऊन गाडी चालवू नये आणि गाडी चालवताना वाहतुकीच्या नियमांचे पालन केले पाहिजे, हा तो बोध म्हटला पाहिजे. यातील कोणताही एक नियम पाळणे पुरेसे नाही, तर दोन्ही नियम एकाच वेळी पाळले पाहिजेत, हे या प्रकरणात दिसून आले आहे. असे न झाल्यामुळे रवीशच्या कुटुंबीयांनी आपल्या घरातील कर्ता पुरुष तर गमावला आणि सोबत विमा कंपनीकडून आर्थिक मदत मिळण्यासही ते अपात्र ठरले, म्हणजेच त्यांचे दुहेरी नुकसान झाले. आपल्या देशात वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. वाहतुकीचे नियम हे पाळण्यासाठी नाही तर उल्लंघन करण्यासाठीच असतात, अशी आपल्या देशातील लोकांची धारणा झालेली दिसते. अनेकवेळा लाल दिवा लागला असतानाही वाहनचालक भरधाव निघून जातात. ही देशातील कोणत्याही एका शहरातील गोष्ट नाही, तर सगळ्याच शहरात कमी-अधिक प्रमाणात हे घडत असते. लाल दिवा असताना न थांबता तुम्ही भरधाव निघून जात असाल तर तुमचा अपघात होऊ शकतो वा तुमच्यामुळे वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीचाही अपघात होऊ शकतो. आजकाल वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन केले जाते. ज्या चौकात वाहतूक पोलिस असतात, त्या चौकात वाहतुकीला थोडीफार तरी शिस्त असते. लोक आपण नियम पाळत असल्याचे दाखवत असतात. मात्र ज्या चौकात वाहतूक पोलिस नसतात, त्या चौकात लाल दिवा असतानाही भरधाव निघून जाणाऱ्यांची संख्या जास्त असते. मुळात वाहतुकीचे नियम हे तुम्हाला रोखण्यासाठी, तुमचा वेळ घेण्यासाठी नाही तर तुमचा जीव वाचवण्यासाठी आहे, तसेच तुमच्या घरात असलेल्या तुमच्या जीवलगांच्या भवितव्यासाठी आहेत, हे सगळ्यांनी समजून घेतले पाहिजे.

रस्त्यावरील अपघात आपल्याला पूर्णपणे संपवता येणार नसले तरी त्याची संख्या आपण कमी मात्र नक्कीच करू शकतो. त्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी सरकारसोबत स्वयंसेवी संस्थांनीही पुढाकार घेण्याची गरज आहे. देशात आणि काही शहरांत अशा स्वयंसेवी संस्था आणि व्यक्ती काम करीत आहेत. मात्र अशा संस्थांची आणि लोकांची संख्या वाढली पाहिजे. आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजारच होणार नाही, याची काळजी घेणे जसे फायदेशीर असते, तसेच अपघात होऊ नये म्हणून प्रयत्न करणे, आवश्यक आहे. यासाठी वाहतुकीचे नियम पाळण्याची सवय आम्ही आपल्याला लावून घेतली पाहिजे. मुळात चौकात वाहतूक पोलिस आहे, म्हणून आम्ही वाहतुकीचे नियम पाळू ही वृत्ती सोडून दिली पाहिजे.

शाळा आणि महाविद्यालयांतून यासाठी जगजागृतीचे कार्यक्रम घेतले पाहिजेत. एवढेच नाही तर शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात एक विषय म्हणून याचा समावेश करण्याची गरज आहे. पहिल्या वर्गापासून नाही तर किमान पाचव्या वर्गापासून वाहतुकीच्या नियमांचा शाळेच्या अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे. म्हणजे जेव्हा हे विद्यार्थी मोठे होऊन गाडी चालवायला लागतील, तेव्हा त्यांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करायला सांगण्याची वेळ येणार नाही. देशातील रस्ते अपघातांची तसेच त्यातील बळींची संख्या कमी करण्याचे स्वप्न नितीन गडकरी यांनी पाहिले असले तरी ते स्वप्न पूर्ण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून एवढा तरी बोध आपण सर्वांनी घेतला पाहिजे.

## यंगिस्तान

# पण मराठी माणसाचा जीव जातो!

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

माझा मुलगा मराठी माध्यमात शिकतो, मी स्वतः मराठी भाषा आणि मराठी शाळा टिकवण्यासाठी माझ्या परीने प्रयत्न करत आहे, या वाक्याने लेखाची सुरुवात करत आहे. हे सांगण्याचं कारण मराठीचा साधा गंधही नसलेले लोक, आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात घालणारे लोक, घरात मुलांना आई-बाबा, आजी-आजोबा असं बोलायला न शिकवता मम्मी-पप्पा, मम्मा, मॉड, डॅड्डा-फॅड्डा म्हणायला शिकवणारे लोक मराठीचे कैवारी असल्याचा आव आणतात. त्यांचा समाचार आधीच घेतलेला बरा! आता लेखाला सुरुवात. महानगरपालिकेची निवडणूक आता जवळ आली आहे. बीएमसी ही सोन्याचं अंड देणारी कोंबडी आहे आणि सर्वांचेच डोळे त्याकडे लागले आहेत. अनेक वर्षे पालिकेवर शिवसेनेची सत्ता होती. आता ही सत्ता भाजपाकडे जाण्याची चिन्हे दिसत आहेत. कारण मागच्या वेळी देवेंद्र फडणवीसांनी जुन्या मैत्रीला जागून पालिकेची सत्ता मिळवली नाही. निवडणूक जवळ आल्यामुळे नेहमीप्रमाणे महाराष्ट्राचं वातावरण गढूळ करण्याचं काम राजकीय पक्षांकडून केलं जात आहे. सर्वप्रथम मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य दिलं पाहिजे. महाराष्ट्रात राहणाऱ्या, किमान १ वर्ष वास्तव्य करणाऱ्या माणसाला तोडकं मोडकं का होईना, पण मराठी आलीच पाहिजे. ‘‘हम मराठी नहीं बोलेंगे, जो करना है करो’’ हा माज चालणारच नाही. आणि सरकारनेच यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य मिळालेच पाहिजे. त्यासाठी विविध ठिकाणी वाचनालये, मराठी शिकवणी, साहित्य सभा, वाचन कट्टा इत्यादी कार्यक्रम राबवून लोकांमध्ये विशेषतः तरुण व लहान मुलांमध्ये मराठीची गोडी वाढवली पाहिजे. अशी अनेक चांगली कामे करता येऊ शकतात. परंतु उपद्रव माजवणाऱ्यांना केवळ सत्ता हवी आहे. कोणतेही चांगले व सुसंस्कृत काम करायचे नाही.

आता आपण खळ्खट्ट्याकवर चर्चा करूया. राजराव ठाकरे (साहेब हा शब्द फारसी आहे, परकीय आहे, मराठी नाही, भारतीय नाही आणि राज ठाकरे हे मराठीसाठी आग्रही आहेत. म्हणून त्यांच्या सन्मानार्थ साहेब या शब्दाला अलगद उचलून बाजूला काढले आणि राव हा आदरार्थी शब्द वापरला आहे. मराठीच्या कैवाऱ्यांना हे माहीत नसावे म्हणून हे स्पष्टीकरण.) आणि मनसे निवडणूक आली की जोमात असतात. सध्या मनसेचं मराठीविषयीचं आंदोलन सुरू झालेलं आहे. अर्थात त्यांच्यापैकी बहुतेकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकत असणार व घरी मम्मी-डॅड्डीचं खुळही सुरू असणार. ते असो, ते चालायचंच! मी वर स्पष्ट केल्यानुसार महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य दिलेच पाहिजे. मात्र नितेश राणे यांनी एक शंका व्यक्त केली आहे. त्यांचं असं म्हणणं आहे



की ही दादागिरी केवळ हिंदूंवरच होते. पण डोंगरी, भेंडीबाजार, कुर्ला, वांद्रे, मालवणी, मानखुर्द-गोवंडी, मुंब्रा येथे ही मंडळी मराठीचा आग्रह का धरत नाही? त्यांना मुसलमानांची भीती वाटते का? हिंदू व्यापारी फार फार तर सनदशीर व लोकशाही मार्गाने प्रतिकार करतील. पण वरील क्षेत्राचे रहिवासी खळखट्ट्याक करणाऱ्यांवरच विपरीत-खळखट्ट्याक करतील ही भीती त्यांना वाटते का? असा प्रश्न नितेश राणे यांनी उपस्थित केला आहे. यामध्ये तथ्य देखील आहे. कारण तिथे जाऊन मराठीचा आग्रह करण्याची धमक या शूरवीरांनी अजून तरी दाखवलेली नाही. दुसरी गोष्ट स्वत: राजराव यांनीही उत्तर भारतीयांविरोधात हाणामारीची भाषा केली असली तरी हुतात्मा चौकावर दंगल करणाऱ्यांविरुद्ध, मराठी माणसाला, पोलिसांना, महिलांना व महिला पोलिसांना मारहाण करणाऱ्यांविरुद्ध मोर्चा काढला. तेव्हा खळखट्ट्याकची भाषा केली नाही. त्यामुळे नितेश राणे यांच्या बोलण्यात तथ्य असावे असा प्रश्न मराठी माणसाला पडू लागला आहे. दुसरी गोष्ट राज ठाकरे यांच्यावर टीका केली तरी हे लोक मराठी माणसालाच मारायला कमी करत नाही. तिथे हे लोक भव्य सूट देत नाहीत. म्हणजे मराठी माणसाने टीका केली (कोणावरही खालच्या दर्जाची, वैयक्तिक, त्यांच्या कुटुंबाला शिव्या देणारी टीका करूच नये, या मतांचा मी आहे. इथेही ‘‘च’’चा आग्रह आहे मंडळींनो. पण तुम्ही फडणवीस, मोदी अशांवर कितीही खालच्या दर्जाची टीका करू शकता, असा समज या लोकांनी करून घेतलेला आहे. असो, चालायचेच!) तर फक्त समजूत काढायची किंवा त्यांच्या घराबाहेर मोर्चा काढायचा, असं ते करत नाहीत. ते मराठीचं नाव घेतात आणि मराठी माणसालाच मारतात. मग यांना नेमके काय सिद्ध करायचे आहे? याविषयी आपण पुढे बोलू आता चर्चा करूया राजराव-उद्धवराव मनोमिलनावर.

राजराव आणि उद्धवराव एकत्र येण्याची चर्चा सगळीकडे सुरू झाली आहे. बॅनरही लागले आहेत. ‘‘मोर्चात कोणताही झेंडा नसेल. फक्त मराठीचा अझेंडा असेल.’’ आता ‘‘अझेंडा’’ काय असतं हे मराठीच्या कैवारींनी सांगावं. तर दोन भाऊ एकत्र येत आहेत. ही खरोखर आनंदाची बातमी आहे. मी तर म्हणतो जगाच्या सर्वच भावंडांमधील, भावकीमधील भांडणं मिटून सगळे एकत्र आले पाहिजेत. त्या दोघांनाही या कट्टर मराठी माणसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. मात्र हे दोघं मराठीसाठी एकत्र येत आहेत, असा भ्रामक प्रचार होताना दिसतो. दोघं वेगळे झाले ते सत्तासंघर्षामुळे आणि आता एकत्र येण्याच्या योजना आखल्या जात आहेत ते सत्ता हस्तगत करण्यासाठी. अर्थात त्यांनी एकत्र यावं, प्रचार करावा, निवडणूक लढवावी याबाबत कोणाला काहीच देणं घेणं नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर म्हणतात, ‘‘त्यांनी जरूर एकत्र यावे. क्रिकेट - टेनिस खेळावे; जेवण करावे आमची काहीच हरकत नाही. ते दोघे एकत्र येणार असतील तर आनंदच आहे.’’ तसा आम्हालाही आनंदच आहे. पण ते मराठीसाठी एकत्र येत आहेत असं नका ना बोलू. दोघांची मुले इंग्रजी माध्यमात शिकलेली आहेत. हे पाहा मराठी वाचकहो, मराठी माणसाला प्रगतिपथावर घेऊन जाणारा, दूरदृष्टी असलेला नेता हवा आहे.

आपण मराठी म्हणून विचार करायला हवा की छत्रपती शिवाजी महाराजांनी भारताला विश्वास दिला की या परकीय जिहादी आक्रमकांना आपण पळवून लावू शकतो. शिवराय अखंड हिंदुस्थानाचे छत्रपती झाले. पुढे मराठी माणसाने भारतावर राज्य केलं. पण नंतर मराठी माणसाची पकड हळूहळू कमी होऊ लागली. ती का झाली, याचं विश्लेषण आपण मराठी माणसाने केलं पाहिजे. त्यास काही घटक कारणीभूत आहेत. एकतर आपल्याकडे पुरोगामी हा शब्द वापरत प्रचंड जातीयवाद पसरवला गेला, इंग्रजीचं इतकं आक्रमण झालं की आताच्या मराठी मुलांना धड मराठी वाचताही येत नाही, तिसरं कारण मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांनी आपल्या हातात धोंडा दिला. आपण त्वेषाने धोंडा फेकून मारत राहिलो, आपली परिस्थितीही धोंड्यासारखी झाली. पण ज्यांनी आपल्या हातात धोंडा दिला ते गर्भश्रीमंत झाले. हे कसे? हे कोडे ज्या दिवशी मराठी माणूस सोडवू शकेल त्या दिवशी मराठी माणूस जगावर राज्य करेल. तूर्तास धोंडा देणाऱ्यांना एवढंच सांगावसं वाटतं की ‘तुमचा खेळ होतो, पण मराठी माणसाचा जीव जातो!’

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

अनिल फेकरीकर

# नरखेडचा केजीचा प्रयोग स्वागतार्ह!

परिवर्तन हाच संसाराचा नियम आहे, असे भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णाने सांगितले होते. अगदी तसेच परिवर्तन आता शिक्षणात सुरू झाले आहे. महाराष्ट्र शासनाने पहिल्या वर्गापासून सीबीएसईचा अभ्यासक्रम लागू करण्याचे घोषित केले आहे. आता सीबीएसई म्हटले तर त्यानुसार नर्सरी, केजी १, केजी २ यांचाही अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. तेव्हाच मुलांचा शैक्षणिक पाया मजबूत होईल अन् ते भविष्यातील स्पर्धेत टिकतील. अशा स्थितीत पारंपरिक बालवाड्या कुचकामी ठरतात. मग करायचे काय? चर्चा करायची, सरकारवर टीका करायची की यातून मार्ग काढायचा याचा विचार संबंधितांनी नक्कीच करायला हवा. अगदी अशीच वेळ नरखेड नगर परिषद प्रशासनासमोर उभी झाली होती. त्यांनी सकारात्मक विचार केला आणि त्यांच्या अखत्यारीतील ६ बालवाड्या बंद न करता त्यांचे रूपांतर केजी १, केजी २ मध्ये केले. याच केजीचा शुभारंभ बुधवार २ जुलै २०२५ रोजी होऊन नरखेड शहरात नवीन अध्याय सुरू झाला. नरखेड शहर म्हणताच डोळ्यासमोर येते ती प्रत्येक बाबतीत असलेली उदासीनता. पण यावेळी नरखेडने महाभारतातील अर्जुनरूपी मुख्याधिकारी अक्षय परदेशी यांच्या नेतृत्वात उदासीनतेचा चक्रव्यूह भेदला. परिणामी नरखेडला नवीन अध्याय सुरू झाला.

वर्तमान मुख्याधिकारी अक्षय परदेशी, सुनील शिंदे, रवींद्र पडवे, प्रशांत शेंडे यांच्या पुढाकारातून नरखेड नगर परिषद अंतर्गत असलेल्या ६ जुन्या बालवाड्यांना प्रथमत: रंगरंगोटी करण्यात आली. तिथेच केजी १, २ चे वर्ग सुरू करण्यात आले. आता त्यानुसार शिक्षकांचीही गरज भासणार होती. त्याकरिता अधिक आढेवेढे न घेता झटपट निर्णय घेत १० शिक्षिका आणि ५ मदतनीसांची पदे कंत्राटी स्वरूपात भरण्यात आली. नगर परिषदेच्या शाळेत आपल्याला शिकवायला मिळणार ही संधी पाहता सुशिक्षित युवतींच्या शिक्षिका बनण्यासाठी रांगा लागल्या. आज केजी १ मध्ये १०० आणि केजी २ मध्ये १५० विद्यार्थी आहेत. या सर्वांना गणवेश, पाठ्यपुस्तके, आकर्षक दप्तर, बुट नगर परिषदेने चक्क मोफत स्वरूपात पहिल्याच दिवशी उपलब्ध करून दिले. परिणामी पालक सुखावले व त्यांनी खाजगीकडे न जाता आपल्या मुला-मुलींना नगर परिषदेच्या केजीत टाकले.

तसे पाहता नरखेड शहरात इंग्रजी माध्यमातील शाळा सुरू व्हावी याकरिता पहिले पाऊल तत्कालीन मुख्याधिकारी माधुरी मडावी यांनी २०१८ मध्ये उचलले होते. मात्र चीननिर्मित कोरोनामुळे तो प्रयोग रखडला. पण अक्षय परदेशी मुख्याधिकारी म्हणून आल्यावर त्यांनी नवीन प्रयोग करण्याचे धाडस केले. याबद्दल त्यांचे आणि त्यांना साथ देणाऱ्या सर्वांचे मनापासून अभिनंदन केलेच पाहिजे. अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे काय, त्यांनी काम केले अथवा चालढकल करून टाईमपास केला तरी त्यांना पगार मिळणारच असतो. अशावेळी सकारात्मक विचार करून हटके संकल्पनेवर आधारित काम करणाऱ्यांचे कौतुक समाजाने करायला हवे. आज नरखेड येथील केजीचा प्रयोग छोटा वाटत असला तरी नागपूर जिल्ह्यासाठी हा गौरवपूर्ण प्रयोग आहे. विशेष म्हणजे केजीचा प्रयोग सुरू झाला तरी यात कुठेही मराठीवर अन्याय झालेला नाही. मराठी हा विषय येथे असल्याने मुलांवर त्याचा कुठलाही प्रतिकूल परिणाम होणार नाही. आनंद शोधू नका तर निर्माण करा, असा एक सुविचार आहे. अगदी तसेच काम मुख्याधिकारी अक्षय परदेशी यांनी केले. याकरिता त्यांना सहकार्य करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करायला हवी. कारण चांगले काम करणारे आता दुर्मिळ होत आहेत. अशा दुर्मिळ लोकांना जपणे समाजाचे कर्तव्य आहे. केजीचा प्रयोग काळानुरूप टाकलेले पाऊल म्हणायला हवे. आजचे शिक्षण हे जागतिक पातळीवर उभे राहायला शिकवणारे असावे. तेव्हाच आपण जगात कुठेही उभे राहू शकतो. आपण एकाच गोष्टीचे तुणतुणे लावले तर आपला टिकाव लागणार कुठे? याचाही विचार सुज्ञपणे व्हायला हवा. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या काळानुरूप भाषा सर्वांना येणे आज अनिवार्य झाले आहे. याकरिता मनातील भेद बाजूला सारीत यावर अभ्यास व्हायला हवा. चिमुकल्यांचाही पाया मजबूत होईल असे अभ्यासक्रम शिकवायला हवेत. तेव्हाच येणारी पिढी सक्षम होईल अन् खऱ्या अर्थाने भारत एकविसाव्या शतकात जागतिक महासत्ता बनेल. सरकारी शाळा, सरकारी दवाखाने, सरकारी उपक्रम टिकलेच पाहिजेत. अन्यथा खाजगीवाले लोकांना गुलाम बनवतील, हे सदैव लक्षात ठेवा.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

# केम छो वरली...

नागेश दाचेवार

उद्धव ठाकरे यांनी आपल्या लाडक्या युवराजाला वरळीतून निवडून आणण्यासाठी गुजराती मतदारांना ‘‘केम छो वरली’’ म्हणत साद घातली होती. यावेळी ‘‘कम टू वरळी’’ अशी हाक ठाकरेंनी मराठी माणसांना दिली आहे. २०१९ ला सत्तेच्या लोभापोटी भाजपाची साथ सोडली आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेले. आता मुंबईत आपल्यासमोर काँग्रेस-राष्ट्रवादीची ताकद नाही याचा अंदाज येताच, काँग्रेसचा विरोध असूनही, महापालिकेतील सत्तेसाठी उद्धव ठाकरे हे राज ठाकरेंना टाळी द्यायला निघाले आहेत. कधी अमराठी मतदारांची मत मिळविण्यासाठी गुजराती, उर्दू, कन्नड, तेलुगू अशा आठ भाषांमधून आवाहन करायचं आणि काम झाल्यानंतर भाषाद्वेष पसरवायचा. हिंदुत्वाचा पुरस्कार करता करता जनाब होऊन मुस्लिम मतदारांचा अर्थात उर्दू, हिंदी भाषी लोकांचा लोकसभेत फायदा घेतला आणि आता मराठी मराठीचा गजर महापालिका निवडणुकीच्या तोंडावर सुरू झाला. उद्धव ठाकरेंच्या २० वर्षांच्या सक्रिय राजकारणातील त्यांच्या क्षणात बदलत्या भूमिका बघितल्यास सरडासुद्धा आत्महत्या करेल, यात शंका नाही.

पुण्याच्या बाजीराव पेशवा स्मारकाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय हिंदी, जय महाराष्ट्र आणि जय गुजरात अशी घोषणा केली. यावरून शिंदेंवर आरोप केले जात आहे. केम छो शिंदे म्हणायचे का असा सवाल विचारला जात आहे. जे लोक शिंदेंना प्रश्न विचारत आहेत, त्यांनी पहिले वरळीतून मुलाला निवडून आणण्यासाठी गुजराती मतदारांसमोर लोटांगण घालून उद्धव ठाकरेंनी ‘‘मुंबई मा जलेबी ने फाफडा, उद्धव ठाकरे आपडा...’’ आणि ‘‘केम छो वरली’’ असं का म्हटलं होतं? असा प्रश्न उद्धव ठाकरेंना विचारायला हवा. ठाकरेंनी ‘‘कसे आहात वरळीकर’’ असे मराठीत संबोधले नाही. त्यांनीही यापूर्वी ‘जय गुजरात’ म्हटले आहे. त्यांना प्रश्न कोणी विचारणार नाही. पण जय हिंद, जय महाराष्ट्र म्हणत जर जय गुजरात म्हटलं तर मात्र, शिंदे महाराष्ट्रद्रोही ठरविले जातील. आता उद्योजक सुशील केडिया यांनी हिंदी भाषी एका छोट्या हॉकरला मारहाणीचा विरोध करत, मला मराठी शिकायची नाही, काय करायचं ते करा असे आव्हान राज ठाकरेंना दिले. याचा अर्थ आता त्यांना धमक्या देणार हे लोक. का, त्यांना त्यांच्या मातृभाषेचा अभिमान बाळगण्याचा अधिकार नाही? तो केवळ तुम्हालाच दिलाय का? यांची पोरं इंग्रजी माध्यमांच्या मोठ्या शाळांमध्ये शिकून, विदेशात फिरायला जातात. कारण यांच्या पोरांचा पोटापाण्याचा प्रश्न नाही. पण गोरगरीब मराठी माणसांच्या मुलांना यूपी, बिहार, झारखंड, छत्तीसगड, प. बंगाल, तामिळनाडू अशा देशाच्या इतर राज्यांत जाऊन पोटाची खळगी भरावी लागते. आणि मग हे भाषावादाचं लोण जर त्या राज्यात पसरलं आणि तेथील परप्रांतीय असलेल्या मराठी युवकांना, त्यांच्या कुटुंबांना त्या राज्यात मारहाण झाली तर याची जबाबदारी कोणाची असेल? परराज्यातील मराठी लोकांना तेथील भाषा बोलण्याचा आग्रह केला गेला तर काय करतील ते बिचारे... यांना महाराष्ट्राबाहेर कोणी कुत्रं विचारत नाही. सॉरी मुंबई बाहेर महाराष्ट्रात तरी कोण विचारतं? डबक्यात राजकारण करायचं असल्यानं गल्ली बोळापर्यंत हे विचार करतात. पण याचा विपरीत परिणाम महाराष्ट्राबाहेर गेलेल्या किंवा आता भविष्यात जाणाऱ्या मुलांवर होईल. याचे थोडेही भान या संधिसाधू लोकांना नसावे, यापेक्षा दुर्दैव नाही.

आता पुन्हा नवा हास्यास्पद प्रकार बघा. बीसीसीआयने सांगावं भारतीय संघ पाकड्यांसोबत खेळणार आहे की नाही. खेळला तर, या संस्थेला सरकार देशद्रोही ठरवणार आहे का? असा प्रश्न आजच्या तारखेत युवराज आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. आता खेळात देशद्रोह कुठून येतो, हे कळण्यापलीकडे आहेत. पण आदित्य ज्याप्रमाणे बोलले त्याच न्यायानं जर घेतलं तर, जावेद मियादादला घरी दावत देणाऱ्यावर देशद्रोहाचा खटला दाखल झाला पाहिजे की नाही? यावर युवराज प्रतिक्रिया देतील का? नाही देणार ना. मग कशाला उगाच ‘‘आपलं ठेवायचं झाकून, लोकांचं पाहायचं वाकून...’’ चे धंदे करायचे. हेच ते लोक आहेत जे आज मराठीच्या मुद्यावरून इतर भाषिकांच्याविरोधात गरळ ओकत, द्वेष निर्माण करताना दिसत आहेत. तिसरी भाषा म्हणून भारतीय भाषा शिकता कामा नये, केवळ इंग्रजी शिकलं पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. मराठी अभिमान असायला पाहिजेच, यात वादच नाही. मुळात तो प्रत्येक मराठी माणसाला आहेच. पण मराठीचा अभिमान बाळगण्याचा अर्थ इतर भाषांचा द्वेष करणे असा होत नाही. हा प्रकार म्हणजे महाराष्ट्राचा तामिळनाडू करण्याचा प्रकार आहे. असा प्रकार करून महाराष्ट्राच्या भावी पिढ्यांचं नुकसान होईल. मग काय मराठी मुलांनी येथेच आयुष्यभर निव्वळ वडापावच विकत बसायचं की काय?

बरं २४ जुलै २०२४ ला मनसे नेते संदीप देशपांडे यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती. त्यात मराठी माणूस आणि महाराष्ट्राबद्दलचं प्रेम या फालतू लोकांकडून शिकण्याची गरज नाही. लोकांना संजय राऊतांची घाणेरडी, शिवराळ भाषा नको आहे. यांचे घाणेरडे चेहरे देखील बघायला नको आहे, अशा शब्दांत संजय राऊत आणि उद्धव ठाकरेंची अब्रू काढली होती. मुंबई महानगर पालिकेत २५ वर्षे सत्तेत राहून काय केलं यांनी? किती मराठी लोकांना कामं दिली यांनी?, किती मराठी माणसांची घरं वाचविली?, अख्खं गिरगाव रिकामं करून मराठी माणसाला मुंबई बाहेर दूरवर पाठवलं. २०१९ ला भाजपाच्या मांडीवर बसून निवडणूक लढविली आणि मग पंधरा दिवसांत अचानक भाजपा महाराष्ट्रद्वेषी असल्याचा साक्षात्कार झाला का? मग लगेच जाऊन पवारांच्या मांडीवर जाऊन बसलात. हे जे उबाठाचं राजकारण आहे ना ते संधिसाधूपणाचं आहे. यांना केवळ सत्ता पाहिजे. असा आरोप अवघ्या वर्षभराआधी केला होता. वर्षभर कशाला, आत्ता आत्ता महिनाभरापूर्वी देखील हे एकमेकांची कपडे फाडताना दिसत होते. मात्र, आता अचानक लाचारी पत्करून दोघेही वरळी डोम येथे एकत्र सभा घेत आहेत. आणि सभादेखील कोणती तर विजयी सभा. कसला विजय. परिपत्रक तात्पुरतं रद्द करून नवं काढलं जाणार आहे. यासंदर्भातला निर्णय घेण्यासाठी समिती नेमली आहे. याचा अर्थ याविषयाबाबतचा अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही. मग जेव्हा निर्णयच झालेला नसेल तर, विजय कसा आणि कोणाचा झाला? मग कुठली आली विजयी सभा? पण हिंदी सक्ती नसताना सक्ती असल्याची टिमकी वाजवायची, मग विचाराधीन विषयावर विजयी झाल्याचं तुणतुणं देखील आपणच वाजवायचं, असा हास्यास्पद प्रकार चालला आहे. असो आता ‘‘केम छो वरली’’वाल्यांना ज्या भाषेत कळते त्याच भाषेत ‘‘भगवान ए बधाने सद्बुद्धी आपे...!’’

९२७०३३३८८६

### परंपरा पुनरुज्जीवित करण्याची वेळ

गुरू-शिष्य परंपरा हाच महान हिंदू संस्कृतीचा पाया आहे. भारतावर आक्रमण करणाऱ्या प्रत्येक आक्रमणकर्त्याने याच पायावर घाला घातला आणि भारताची आजची स्थिती आपल्या समक्ष आहे. इंग्रजांनी स्वार्थापोटी भारताच्या संस्कृतीवर आक्रमण करून तिला नष्ट-भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला. या दुष्कृत्याचे परिणाम आपण स्वातंत्र्यानंतरही कित्येक दशके भोगत आहोत.

आज भारतात पाश्चात्त्यांचे अंधानुकरण, बीभत्सपणा आणि संस्कृतिहीन आचरण आदींचे काहूर माजले आहे. राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश नसल्याने स्वैराचारी आणि दुराचारी राजाला शिक्षा देण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे आज गुरू-शिष्य परंपरेला पुनरुज्जीवित करण्याची वेळ आली आहे. समाजामध्ये काही प्रमाणात राष्ट्राविषयी अभिमान असला, तरी धर्मप्रेम असणेही तितकेच आवश्यक आहे. गुरू-शिष्य परंपरा पुनरुज्जीवित करण्यासाठी भारत पुनश्च हिंदू राष्ट्र बनणे आवश्यक आहे.

**अपर्णा जगताप**/नागपूर

### पावसाळ्यात स्वच्छतेचे नियोजन आवश्यक

पावसाळा हा ऋतू निसर्गाची अनेक रूपे घेऊन येतो. मात्र त्याचबरोबर अनेक प्रकारचे संसर्गजन्य आजारही बळावण्याचा धोका वाढतो.

ग्रामीण भागांमध्ये, जिथे पायाभूत सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत, तिथे स्वच्छतेकडे केले जाणारे दुर्लक्ष आरोग्याच्या मोठ्या संकटाचे कारण ठरू शकते.

त्यामुळे पावसाळ्यात स्वच्छतेसाठी योग्य नियोजन करणे ही गावपातळीवरची अत्यंत गरजेची बाब आहे. स्वच्छतेचे महत्त्व आणि नियोजनाची गरज पावसात रस्त्यावर पाणी साचणे, नाल्यांचा वेळेवर उपसा न होणे, कचऱ्याचे व्यवस्थापन न करणे, सार्वजनिक ठिकाणी चिखल व घाण होणे अशा समस्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण करतात. डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, पोटाचे विकार, पाण्याने होणारे आजार आणि त्वचेचे विकार हे पावसाळ्यात वाढतात. यासाठी ग्रामीण, शहरी भागात पावसाळ्यातील स्वच्छतेकडे प्रशासनाने आवर्जून लक्ष दिले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## वाचक पत्रे

### आला पावसाळा, तब्येती सांभाळा!

उन्हाळ्यानंतर येणारा पाऊस हा सुखावून जातो. हवेतला गारवा पण छान वाटतो. पण पावसाचे प्रमाण जस जसे वाढत जाते तसे नद्या, नाले, ओढे तुडुंब वाहतात. त्यांचे घाण पाणी, मलमूत्र व गटारीचा दुर्गंध वातावरणात मिसळले जाण्याची शक्यता जास्त असते. त्यात राहण्याची जागा, परिसर कोंदट, अस्वच्छ असेल तर वायू दूषित होऊन श्वसन मार्गाने शरीरात प्रविष्ट होऊन सर्दी, खोकला, डोकेदुखी, मळमळणे, ताप इत्यादी तक्रारींचा प्रकोप होतो. हे टाळण्यासाठी वायू शुद्ध होणे महत्त्वाचे असते. त्यासाठी कापूर, देवदार, धूप, चंदन, राळ, कडूनिंबाची पाने, मोहरी इत्यादी वनस्पतींचा धूर केल्यास वायूतील जंतूंचा नाश होऊन तो शुद्ध होईल.

काही जुन्या घरांमध्ये पावसाळ्यात प्रचंड ओलावा होत असतो आणि हा प्रकृतीस बाधक ठरतो. तसेच सोसाट्याचा वारा अंगावर जास्त घेतला तर अवयव जखडून जातात. वातविकार वाढतात. अशा अवस्थेत आहारामध्ये भोजन कोरडे, हलके, स्निग्ध, उष्ण आणि आम्ल असावे. दिवसा झोपणे टाळावे, द्रव पदार्थांचे अति सेवन करू नये. भोजनामध्ये वेली वरच्या भाज्यांचा म्हणजे चवळ, गिलके, गवार, तोंडली, परवर, कारले, लाल भोपळा, दुधी भोपळा जास्त प्रमाणात असावे. कांदा, बटाटा, मुळे, गाजर, बीट या मूळवर्गीय भाज्यांचा प्रयोग एकदम कमी करावा. तसेच गुणाने गुरू म्हणजे पचायला जड जसे, बेसन, मैदा, कडधान्य, आंबवलेले पदार्थ यांचा आहारामध्ये समावेश कमी करावा. या दिवसात अपचन होण्याची शक्यता जास्त असते. ते झाल्यास आम्ल पित्त, डोकेदुखी, मळमळायला होणे, खोकला, ताप, अंग मोडून येणे इत्यादी लक्षणे आढळतात. हे होऊ नये म्हणून आहार-विहार यावर नियंत्रण ठेवल्याने पावसाळ्यात देखील तब्येत चांगली राहू शकते.

**संजय पाठक**/नागपूर

### नागपूर रेल्वे स्थानकावर नगदी व्यवहार बंद!

दिनांक २३ जून रोजी रात्री सवा बारा वाजता मी नागपूर रेल्वे स्थानकात आमच्या स्नेहींना घ्यायला गेलो असता नगदीद्वारे प्लॅटफॉर्म तिकीट घेतले. परंतु २८ जून रोजी सकाळी ७.५० वाजता पुन्हा रेल्वे स्थानकावर गेलो असता मुख्य प्रवेशद्वाराच्या आत जी तिकीट खिडकी आहे तिथे प्लॅटफॉर्म तिकीट घ्यायला गेलो तेव्हा तेथील महिला कर्मचाऱ्याने मला नगदी पैशांचे व्यवहार बंद केले असून ऑनलाईन व्यवहाराद्वारेच तिकीट विक्री सुरू आहे असे सांगितले व मला नगदीद्वारे प्लॅटफॉर्म तिकीट देण्यास नकार दिला. हे कितपत योग्य आहे?

सगळेच लोक ऑनलाईन व्यवहार करत नाहीत. मध्य रेल्वे नागपूर येथील संबंधित अधिकाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी दखल घेऊन या खिडकीवर नगदी व्यवहार लवकरात लवकर सुरू करावा व विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना दिलासा द्यावा.

**मिलिंद गोखले**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### मनपा देशमुख वस्ती शाळेत बालदिंडी

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात भक्तीमे वातावरण निमर्ाण झालेला आहे. आषाढी एकादशी निमित्त मनपा देशमुख शाळेच्या वतीने बाल दिंडीचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यामध्ये श्री विठ्ठल यांच्या वेशभूषेत इयत्ता पाचवीच्या वर्गातील वेदांत गायकवाड तर रुक्मिणीच्या वेशभूषेत गौरी जगताप होते. वस्तीतील पालक वर्ग व सर्व लोक दिंडीमध्ये सहभागी झाले होते. देशमुख वस्तीमध्ये संपूर्ण भक्तीमय वातावरण निर्माण झालेले होते. दिंडीचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बबन ऐवळे, ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत देशमुख, सुरेश कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या दिंडीतील बाल वारकऱ्यांसाठी वस्तीतील सागर घाडगे व श्रीमंत गायकवाड यांनी खाऊचे वाटप केले. बालदिंडी यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक राहुल पाटील, नागेश गोसावी, संतोष सुतार, उमेश युवनाती यांनी परिश्रम घेतले.

### सोयी-सुविधांचा आढावा घेण्यासाठी लिंकवर माहिती द्या : आयुक्त ओम्बासे

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

दीडशे दिवसांच्या कार्यक्रमांतून शासकीय यंत्रणेत आणखी सुधारणा करण्यासाठी शासनाने शहरातील नागरी सुलभ सोयी सुविधा बाबत आढावा घेण्यासाठी फीड बॅक म्हणून दोन लींक देण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित दीडशे दिवसांचा कृती आराखडा जाहीर केला आहे. यांतून प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी, नागरिकांना आधिक चांगली सेवा देण्यासाठी हा कार्यक्रम आखला आहे. त्या अनुषंगाने शासनाने शहरातील नागरिक सुलभ सोयी सुविधा बाबत आढावा घेण्यासाठी फीड बॅक म्हणून दोन लींक दिले आहे. https://forms.gle/RKj2ZWmkR5HeN4SUA, https://forms.gle/AVSLKnhxwdxmHhWKA या लिंकवर जाऊन नागरिकांनी दिलेली माहिती भरावी, असे आवाहन केले आहे.

# सहा महिन्यात शहर गुन्हे शाखेने उघडकीस आणले १९८ गुन्हे

## २ कोटी ४ लाखांची मालमत्ता हस्तगत

## जुलै २०२२ ते जून २०२५ या कालावधीत ९८९ गुन्हे उघडकीस

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. ४ जुलै -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील शहर गुन्हे शाखेने चालू वर्षातील जानेवारी ते जून या सहा महिन्यात १९८ मालमत्तेसंदर्भातील गुन्हे उघडकीस आणून या गुन्ह्यांमध्ये २ कोटी ३ लाख ९७ हजार १७३ रुपयांची मालमत्ता हस्तगत केली. गुन्हे शाखेने उघडकीस आणलेल्या गुन्ह्यांमीधल मालमत्ता जप्तीचे प्रमाण पाहिले असता मालमत्ता जप्तीमध्ये राज्यामध्ये सोलापूर शहर गुन्हे शाखा अव्वल असल्याचे दिसून येते. जुलै २०२२ ते जून २०२५ या कालावधीत शहर गुन्हे शाखेने पोलिस आयुक्तालयाच्या इतिहासातील चमकदार





कामगिरी करीत ९८९ गुन्हे उघडकीस आणत साडे चार किलो सोने व २७ किलो चांदी हस्तगत करून ७ कोटी ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत असलेल्या ७ पोलिस ठाण्यांतर्गत घरफोडी, जबरी चोरी (चैन स्नॅचिंग व इतर जबरी चोरी), वाहन चोरी (मोटारसायकल, रिक्षा, सायकल, कार) आणि इतर चोरी (मोबाईल चोरी, पिक पॉकेटींग) असे मालमत्तेचे गुन्हे दाखल होतात. या गुन्ह्यांमध्ये कोट्यावधी रुपयांची मालमत्ता चोरीस जाते. पोलिस ठाण्यांमधून दाखल होणारे गुन्हे तसेच सराईत गुन्हेगारांवर वॉच ठेऊन त्यांच्याकडून घडलेले गुन्हे उघडकीस करण्याचे काम गुन्हे




शाखेकडून करण्यात येते. सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाची स्थापना १० ऑगस्ट १९९२ मध्ये झाली असून आयुक्तालयाच्या इतिहासात शहर गुन्हे शाखेकडे आलेले पोलिस निरीक्षक पदाच्या अधिकाऱ्यांनी अनेक गुन्हे उघडकीस आणले व करोडोंची मालमत्ता हस्तगत केली. परंतु, सध्या कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या कामाच्या पध्दतीमुळे जुलै २०२२ ते जून २०२५ या कालावधीत शहर गुन्हे शाखेच्यावतीने ९८९ गुन्ह्यांची उकल करण्यात येऊन ७ कोटी ६३ लाख १८ हजार २९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही आकडेवारी पाहता आयुक्तालयाच्या इतिहासात गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांकडून इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आणलेले दिसून येत नाहीत. पोलिस कर्मचारी हे सोलापूर शहरातील स्थानिकच आहेत, पोलिस अधिकारी हे बाहेरून बदलून आलेले आहेत. या दोघांमध्ये योग्य तो समन्वय साधून गुन्हेगारांचा माग काढण्यासाठीची योग्य ती पध्दती अवलंबून पोलिस निरीक्षक दोरगे यांनी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आणले असल्याचे बोलले जाते.

### जुलै २०२२ ते जून २०२५ या कालावधीत गुन्हे शाखेने उघडकीस आणलेले गुन्हे

| वर्ष | उघडकीस गुन्हे | जप्त मालमत्ता |
|---|---|---|
| जुलै २०२२ ते डिसेंबर २०२२ | १५२ | १,०३,७०,०९०/- |
| जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ | ३१९ | २,४४,८५,५६६/- |
| जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ | ३२० | २,१०,६५,४७०/- |
| जानेवारी २०२५ ते जून २०२५ | १९८ | २,०३,९७,१७३/- |

### तीन वर्षात साडे चार किलो सोने व २७ किलो चांदी हस्तगत

२०२३ मध्ये २३७३ ग्रॅम सोने चोरीला गेले त्यामध्ये पोलिसांनी १८४१ प्राप्त केले तर ९१६१ चांदीची चोरी झाली होती त्यामध्ये ५८८७ ग्रॅम हस्त गेले. तर सन २०२४ मध्ये सोने १६७८ ग्रॅम चोरीस गेले तर १६७८ प्राप्त केले. चांदी २० हजार ५४५ ग्रॅम चोरीला त्यामध्ये १८ हजार ५८५ ग्रॅम हस्तगत केले. चालू वर्षी १५९९ ग्रॅम सोने व ४०६१ ग्रॅम चांदी चोरीला गेली, त्यामध्ये पोलिसांनी १२८४ ग्रॅम सोने व ३३५७ ग्रॅम चांदी हस्तगत केली आहे.

### तीन वर्षात ७ कोटी ६३ लाखांचा मुद्देमाल केला आहे जप्त

शहरात सात पोलिस ठाणे आ-हेत. त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी चोरी, घरफोडी व चैन स्नॅचिंग सारख्या घटना घडलेल्या आहेत. सात पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये मागील तीन वर्षात १८३ घरफोडी, ५० जबरी चोरी, ४२८ दुचाकी, इतर चोरी ३००, बतावणी करून सोने किंवा रोख लंपास करणाऱ्या २० घटना असे एकुण ९८० हून अधिक गुन्हे गुन्हे शाखेकडून उघड करीत ७ कोटी, ६३ लाख १८ हजार २९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# आणीबाणी काळात बंदिवास सोसावा लागलेल्या व्यक्तींच्या सन्मान धोरणात सुधारणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणी कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना मिसा व डी. आर. आय. अंतर्गत सामाजिक व राजनैतिक कारणासाठी ज्या व्यक्तींना बंदिवास/कारावास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासाठी मानधन मंजूर करण्याच्या धोरणामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त संदर्भ शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती तशाच लागू राहतील.

शासन निर्णय, ३ जुलै २०१८अन्वये विहित केलेल्या धोरणातील अट क्र.२ आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी (ती व्यक्ती हयात नसल्यास त्याच्या हयात जोडीदाराने) शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे. अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक २५ सप्टेंबर २०२५ आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेवारी २०१८ पुर्वी हयात नसल्यास त्यांच्या पश्चात हयात जोडीदार पती/पत्नी यांनी अनुज्ञेय असलेले मानधन मिळण्याकरीता प्राप्त झालेल्या या अर्जाच्या अनुषंगाने मानधन मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

या योजनेतंर्गत मिळणारे वाढीव मानधन हे सदरील शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय असेल.

### याप्रमाणे वाढीव मानधन

- एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु.२० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/पतीस रु.१० हजार.
- एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु.१० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/पतीस रु.५ हजार

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Re-Tender 2nd call Notice**

Digitally signed online bids are invited through Re-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000036758 Re-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 07/2025-2026,** (2nd call) **Particulars:** Work of initial weed control & regular recurring treatment at various EHV 220/132kV substations/ cogen consumers under EHV O&M Division Solapur. **Estimated cost:** Rs. 49,95,577/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 49,955/- **Tender cost** in Rs. 500.00+ GST, **Sale period:** 03.07.2025 to 13.07.2025 **Last Date of Submission:** 13.07.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 14.07.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608

**Subsequent call intimations (3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**
**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV O&M Circle Solapur.**

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन, आंबेडकर चौक रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१.
**प्राणी संग्रहालय विभाग**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांचे वतीने NTPC कडून प्राप्त CSR फंडातून महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे विविध स्थापत्य विषयक कामे करणे कामाचे ई-निविदा बाबत.

**Tender ID-2025-SMC-1197649-1**

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०५/०७/२०२५ सकाळी १०.०० वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

सही/-
उपअभियंता
प्राणी संग्रहालय विभाग
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. ७९/२०२५
पुढील नेमली ता. ३०/०८/२०२५

**बार्शी येथील मा.दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **संपतराव देवीदास घोडके**
वय - ५३ वर्षे, धंदा - शेती,
रा. मालेगांव (आर), ता. बार्शी,
जि. सोलापूर
२) **विजया देवीदास घोडके,**
वय ७५ वर्षे, धंदा - काही नाही, रा. सदर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार नं.२ ही अर्जदार नं.१ ची आई आहे. अर्जदार नं.१ चे वडिल म्हणजेच अर्जदार नं.२ चे पती देवीदास भानुदास घोडके हे होते ते दि. २५/१२/२०१८ रोजी मालेगांव (आर), ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार यांचेशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत मयत देवीदास भानुदास घोडके यांनी त्यांचे हयातीत सोलापूर ग्रामिण बँक हल्ली विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा, वैराग ता. बार्शी या बँकेत सेव्हींग खाते उघडून सदर खात्यावर वेळोवेळी व्यवहार केलेले असून त्यांचे मृत्यूसमयी सदर खात्यावर रक्कम जमा होती व आहे. ते मयत झालेने यातील अर्जदाराने सदर रक्कमेची मागणी केली असता संबंधीत बँक अधिकाऱ्यानी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारानी ते मयत देवीदास भानदास घोडके यांचे वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात, मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः ०४/०७/२०२५

सही/- वरिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर. बार्शी

**Classifieds**

**विकणे आहे**

कृष्णा आर्केड, जुने विठ्ठल मंदिर शेजारी उत्तर कसबा सोलापूर येथील वन बीएचके सेमी फर्निश्ड फ्लॅट विकणे आहे. कारपेट ४८० स्क्वे. फूट बिल्टअप ६०० स्क्वे. फूट वकील, चार्टर्ड अकौंटंट यांना प्राधान्य.
संपर्क : 9890606763

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की. **मिळकतीचे वर्णनः-** डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील देगांव येथील घरजागा यांसी म्युनिसिपल घर नं. ३५ व नगर भुमापन क्र.५ याचे एकूण क्षेत्र १५६.७० चौ.मी. यापैकी पुर्वेकडील बाजूची जागा याचे क्षेत्र ७०.२६ चौ.मी. अथवा ७५५.९९ चौरस फुट. सदर मिळकतीमध्ये तळमजला व पहिला मजला मिळून आर.सी.सी बांधकामाचे १०६.३२ चौ. मी. बांधकाम क्षेत्रासह असलेली घरजागा. यासी चतुःसिमा-पुर्वेसः- रस्ता, पश्चिमेस- नगर भूमापन क्र.५ पैकी उर्वरीत जागा, दक्षिणेस- चंद्रकांत पाटील यांची जागा, उत्तरेस - संतोष पाटील यांची जागा, येणेप्रमाणे चतुःसिमेतील घरजागा व त्यातील असणारे वहिवाटीचे हक्क व इतर सर्व कायदेशीर अधिकार व यातील तदंगभुत वस्तुसह. सदर मिळकत ही श्री गणेश अंबादास चौगुले यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांना सदर जागेचा व्यवहार करुन आमचे अशिलाकडून रक्कम स्विकारलेली आहे व आमचे अशिलांचे नांवे इसारा पावती लिहून दिलेली आहे.

सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलास दिलेली आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाचीही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दाचा, लीज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबध, वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद मिळकतीचे आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचेही कसलेही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली तारीख ०४/०७/२०२५.

सही/-
शामराव एस. बिराजदार (ॲडव्होकेट)
बी.एस.एल. एलएल.बी.
पत्ता. गाळा नं.४, बेसकर कॉम्प्लेक्स, बी. एम. सी बँकेच्या खाली, जिल्हा न्यायालयाजवळ, सोलापूर
मो.नं.१९७५१२४८८९/९४०३७७१२९१
अशिला तर्फे ॲडव्होकेट

**जाहीर प्रसिध्दीकरण**

कि.अर्ज नं. ८०/२०२५
नि.नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात**
**मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट**

१. **श्रीमती छाया बिरमल हजारे,**
वय ६४, धंदा - घरकाम,
रा. कर्मवीर हाऊसिंग सोसायटी,
अलिपुर रोड, शिवाजीनगर, बार्शी, जि. सोलापूर.
२. **श्रीमती संजीवनी अनिल वाकडे,**
वय ४३, धंदा शेती / घरकाम,
रा. बोकरदरवाडी, उपळाई बुद्रुक,
जि. सोलापूर. ४१३२०९.
३. **सौ. भाग्यश्री भैरवनाथ सातपुते,**
वय ३९, धंदा - घरकाम,
रा. मारीगोल्ड ४०१, पार्क स्प्रिंग सोसायटी,
पोरवाल रोड, लोहगाव, पुणे. ४११०४७
४. **राहुल बिरमल हजारे,**
वय - ३६, धंदा व्यवसाय,
रा. कर्मवीर हाऊसिंग सोसायटी,
अलिपूर रोड, शिवाजीनगर, बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुद्ध
**कोणी नाही** - **सा. वाला**

यातील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी बार्शी येथील मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २, ३, ४ यांचे पिता बिरमल बापूराव हजारे यांना अर्जदारांशिवाय दुसरे कोणतेही कायदेशीर वारस नसल्याने त्यांचे कायदेशीर वारस या नात्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांनी हा अर्ज दाखल केलेला आहे.

प्रस्तुतच्या अर्जास कोणाची काही हरकत असल्यास, त्यांनी सदरचे प्रसिद्धिकरण झाल्यापासून ३० दिवसांचे आत बार्शी येथील मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिविजन यांचे कोर्टात, त्यांची लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काही हरकत नाही, असे गृहीत धरून अर्ज निकाली काढला जाईल. हे जाहीर प्रसिद्धिकरण दिले. ०४/०७/२०२५

**पुढील तारीख : ११/०८/२०२५**

कोर्टाचा शिक्का
सही/- सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बार्शी

**जाहीर नोटीस/समन्स**

रे.मु. नं. ७८७/२०११
पुढिल नेमलेली तारीख ११/०८/२०२५
नि.क्र.८९

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु. डि साहेब, यांचे कोर्टात**

**हरीभाऊ चंद्रभान शिंदे** --- **वादी**
**विरूध्द**
**विजयकुमार देशमुख, वगैरे** --- **प्रतिवादी**

प्रति,
**श्रीमती शालन राजाराम देशमुख**

ज्याअर्थी, वादीने प्रतिवादी विरुध्द दावा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेचा दावा यातील प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी नं.८ चे मयत वारस म्हणून तुम्हास सरनाम्यातील नमूद पत्त्यावर बेलीफ वारंवार समन्स बजावणीसाठी गेले असता, तुम्ही नमूद पत्त्यावर राहत नाहीत. म्हणून समन्सची बजावणी होत नाही. व ढकवून बजावणीही इतर प्रतिवादी जाणिवपुर्वक होवू देत नाहीत. व तुम्हास दाव्याची समन्सची बजावणी होणे अत्यंत जरुरीचे आहे.

त्या अर्थी या जाहीर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, हि जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात अथवा पुढील नेमलेली तारीख दि. ११/०८/२०२५ रोजी नेमलेल्या तारखेस सदर दाव्यात हजर होवून स्वतः अथवा माहितीगार वकिलामार्फत हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता दाव्यात हजर करावा.

वरील प्रमाणे तुम्ही सदर दाव्यात हजर न झाल्यास वादीच्या दाव्यातील मागणीप्रमाणे तुमचे विरोधात वादीच्या हक्कात सदर दाव्याचा हुकूम होईल. कळावे याची नोंद घ्यावी. हे जाहीर नोटीस/समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि.०२/०७/२०२५

सही/- कनिष्ट लिपीक, मे. सि. ज. ज्यु. डि. बार्शी
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा. अधिक्षक, मे. सि. ज. ज्यु. डि. बार्शी

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज ६८/२०२५
नि.नं. ५

**(मे. H.U.U. पाटील कोर्ट)**
**बार्शी येथील मे. सिव्हिल जज ज्युनियर डिव्हिजन सो. यांचे कोर्टात**

१) **शालन हनुमंत गायकवाड,** वय ७५ वर्ष,
धंदा- घरकाम रा. मु.पो. साकत, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **संजय हनुमंत गायकवाड,** वय ५७ वर्ष,
धंदा-नोकरी रा. मु. पो. लेक व्हयुव पार्क को-ऑप. हाउसिंग सोसायटी सर्वे नं, ११२/६, बिल्डिंग नं. २ प्लॉट नं.१९, सुतारवाडी, पाषाण, पुणे, महाराष्ट्र, ४११०२१
३) **दिपक हनुमंत गायकवाड,** वय ५३ वर्ष,
धंदा-नोकरी रा. मु. पो. सर्वे नंबर ३९/२, संत तुकाराम सोसायटी, न्यू बायपास रोड, देहुगाव, येलवाडी, पुणे, महाराष्ट्र ४१२१०९
४) **नागनाथ हनुमंत गायकवाड,** वय ५० वर्ष,
धंदा- नोकरी रा. मु.पो. प्लॉट नं. २७, स.नं. ७८/९, नाना मास्कर नगर, फ्लॅट नं. १०४, अक्षत एलीगन्स, मुद्रे (खुर्द), कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र -४१०२०१
५) **आशा दिलीप सुरवसे,** वय ५० वर्ष,
धंदा - घरकाम रा. मु. पो. शास्त्री नगर, ऑटी प्लॉट उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद महाराष्ट्र- ४१३६०६, — **अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणी नाही** --- **सा.वाला**

तमाम जनतेस या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, यातील मूळ पुरुष मयत हनुमंत विठोबा गायकवाड हे असून त्यांना अर्जदार नं. १ शालन ही पत्नी आहे. अर्जदार नं १ शालन व मूळ पुरुष हनुमंत यांना अर्जदार नं. २ संजय, अर्जदार नं. ३ दिपक, अर्जदार नं. ४ नागनाथ, अर्जदार नं. ५ आशा अशी एकूण ४ अपत्ये आहेत. यातील मूळ पुरुष म्हणजेच हनुमंत विठोबा गायकवाड हे दि. ०९/१२/२०२० रोजी मयत झालेले आहेत. यातील मूळ पुरुष मयत हनुमंत विठोबा गायकवाड यांचे नावावर बँक ऑफ इंडिया शाखा पानगाव येथे वेळोवेळी ०७२५१०१००००४२७४ या खात्यावर जमलेले ३,५५,७५१.५९/- रूपये व त्यावरील व्याजासह होणारी संपूर्ण रक्कम यातील अर्जदार नं. १ ते ५ यांना मयत हनुमंत विठोबा गायकवाड यांचे कायदेशीर वारसदार म्हणून मिळणे जरूर आहे. परंतु बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यानी अर्जदारांना मे. कोर्टातून वारस प्रमाणपत्र आणणेस सांगीतले त्यामुळे यातील अर्जदारांनी त्यांना वारस दाखला मिळणे बद्दल हा अर्ज मे या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर मयत हनुमंत विठोबा गायकवाड यांना यातील अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणाचा वारसा हक्क हित संबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत वकिलामार्फत अगर स्वतः मे कोर्टात नेमलेल्या तारखेसह दि. ६/८/२०२५ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारसा दाखला देणेत येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण माझ्या सहीने व मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले ता. ४/७/२०२५.

सही/- क. लिपीक
कोर्टाचा शिक्का
सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर

**जाहीर घोषणा**

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व तालुका बार्शी तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्युनिसिपल हद्दीतील गट नं. १२८४/४ प्लॉट क्र. ०९+१३ याचे क्षेत्रफळ १२०.४० चौ.मी. आहे यासी चर्तुःसिमा पुर्वेस- प्लॉट नं. १०. दक्षिणेस प्लॉट नं. ५, पश्चिमेस ९ मी रुंदीचा रोड व उत्तरेस- प्लॉट नं. ९+१३ ब येणेप्रमाणे चर्तुःसिमापूर्वक मिळकत आतील तदंगभूत वस्तूसह.

वर कलम १ मध्ये नमुद मिळकत ही अविनाश कुमार कवठाळकर व केदार जयकुमार कवठाळकर, रा. बार्शी यांचे खरेदी मालकीची आहे. त्यांचे घर बांधकाम करणेसाठी वर नमुद प्लॉटजागा तारणावर आमचे अशिल सांगली अर्बन को-ऑप बँक लि. शाखा-बार्शी यांचेकडे त्यांना घर बांधकाम करणेसाठी कर्ज मागणी केली असून त्यांना रक्कम रुपये १०,००,०००/- चे कर्ज आमचे अशिल बँकेने मंजुर केलेले आहे. सदर कर्जाकरिता अविनाश कुमार कवठाळकर व केदार जयकुमार कवठाळकर, रा. बार्शी यांनी त्यांची वर नमुद मिळकत ही बँकेचे हक्कात गहाण तारण देण्याचे मान्य केले असून तसा दस्त नोंदवून देणेचेही त्यांनी कबुल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा त्यांनी आमचे अशिल बँकेस दिलेला असून सदर मिळकत अन्य कोणत्याही बँकेकडे अगर वित्तीय संस्थेकडे गहाण तारण दिलेली नाही, कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाहीत अशीही ग्वाही त्यांनी दिलेली आहे.

तरी या जाहिर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे कांही गहाण, दान, लिज, बोजा व हस्तांतर अगर कर्ज बोजाचे हक्क अधिकार असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ (०८) दिवसात आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन आमची खातरजमा करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये व आमचे अशिलाचे हक्काची सर्वत्रास जाणीव व्हावी म्हणून, ही, जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे, ता. ०४/०७/२०२५.

सही/-
श्री. गणेश ज्ञानोबा जगताप, ॲडव्होकेट
बी.एल.एल. एल.एल.एम
ऑ. स्वामी समर्थ, कोर्ट इमारतीसमोर
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे पॅनल ॲडव्होकेट)
मो.नं.९०११३३९९३८

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७६/२०२५
नि.नं. ५

**बार्शी येथील मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

१) **जुबेर मोहब्बत मुजावर,**
वय - १३ वर्षे, धंदा - शिक्षण,
२) **आजान मोहब्बत मुजावर,**
वय - १० वर्षे, धंदा - शिक्षण,
नं. १ व २ चे अ.पा.क
**मोहब्बत रसूल मुजावर,**
वय - ४९ वर्षे, धंदा - शेती,
रा. उपळे (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरूध्द
**महाराष्ट्र शासन** - **सा.वाला**

**अर्ज - गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ व कलम २९ गार्डीयन्स ॲन्ड वॉर्डस ॲक्ट प्रमाणे**

ज्याअर्थी, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे उपळे (दु.) हद्दीतील जमिन गट नं. १० पैकी क्षेत्र हे. ००-२० आर, याचा आकार रु. ००-६२ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - जाफर पटेल यांची जमीन, दक्षिणेस मैमुनाबी यांची जमिन, पश्चिमेस - सुभाष पाटील व आप्पासाहेब पाटील व उत्तरेस - विकास आप्पासाहेब पाटील यांची जमीन आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची जमीन आतील सर्व झाड, झुडूप वगैरे तदंगभूत वस्तुसह. सदर मिळकती या अज्ञान अर्जदार नं. १ जुबेर मोहब्बत मुजावर व अर्जदार नं. २ आजान मोहब्बत मुजावर यांचे पालनकर्ता वडिल मोहब्बत रसूल मुजावर यांचे मालकी वहिवाटीची असून रेकॉर्डला मालकी हक्कात नोंद आहे. यातील अर्जदार नं. १ व २ हे अज्ञान असून त्यांचे तर्फे अ.पा.क म्हणून वडिल मोहब्बत रसूल मुजावर यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अज्ञान अर्जदार नं. १ व २ यांचे पुढील उच्च शिक्षणासाठी व घरगुती अडचणी, कपडालत्ता, औषधपाणी यासाठी अज्ञानाचे पालन करणार वडिल मोहब्बत रसूल मुजावर करणार आहेत. अज्ञान अर्जदार नं. १ व २ हे अत्यंत हुशार असून त्यांचे पुढे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे व त्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्वल होण्यासाठी रक्कमेची अत्यंत गरज असल्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे मिळकत विक्री करणे जरुरीचे झाले आहे, अशा परीस्थितीत वर नमूद यातील अज्ञान अर्जदार नं. १ व २ यांचे मालकीची मिळकत विकास आप्पासाहेब पाटील, रा. उपळे (दु.), ता. बार्शी यांना अगर ते सांगतील त्या व्यक्तीचे नांवे विक्री करणेस मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरूरीचे आहे त्यासाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

त्याअर्थी, वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदारांचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता. २३/०७/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचेतर्फे मुखत्यार वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण दिले. ता. ०४/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का
सही/- सहाय्यक अधिक्षक, मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### लहानपणी करायचो तशीच फलंदाजी केली : गिल

**बर्मिंगम** : मी लहानपणी जशी फलंदाजी करायचो तशीच फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला, असे भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिलने आपल्या द्विशतकी खेळीनंतर सांगितले. गिलने ३८७ चेंडूत २६९ धावा फटकावल्या आणि इंग्लंडमध्ये कसोटी सामन्यात द्विशतक झळकावणारा पहिला भारतीय आणि आशियाई कर्णधार ठरला. दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताने ५८७ धावांचा डोंगर रचला. त्याने लीड्समधील मालिकेच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले होते.आयपीएलच्या शेवटी व या मालिकेपूर्वी मी फलंदाजीच्या तंत्रावर खूप काम केले, प्रामुख्याने हालचाली व माझ्या सेटअपवर काम केले. याआधी, मी कसोटी सामन्यांमध्ये सातत्याने ३०-३५-४० धावा करत होतो. पण कधीतरी, मी एकाग्रतेचा भंग व्हायचा, यावर मी अधिक लक्ष केंद्रित केले, असेही त्याने सांगितले. या मालिकेत, मी माझ्या मूलभूत गोष्टींकडे परत जाण्याचा प्रयत्न केला. मी माझ्या लहानपणीप्रमाणे फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला. मी ३५-४० धावा करण्याचा किंवा लांब डाव खेळण्याचा विचार केला नाही. मला केवळ माझ्या फलंदाजीचा आनंद घ्यायचा होता, असे गिल म्हणाला. गिलने आपल्या शानदार खेळीसह, १९७९ मध्ये ओव्हल येथे दिग्गज सुनील गावस्करच्या २२१ धावांना मागे टाकले.

# इंग्लंडची जोरदार मुसंडी

## हॅरी ब्रुक, जेमी स्मिथची शतकी खेळी

◆ **बर्मिंगम, ४ जुलै**

एजबॅस्टन येथे सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताच्या ५८७ धावांच्या डोंगराला प्रत्युत्तर देताना इंग्लंडची डावाच्या सुरुवातीला घसरगुंडी उडाली, परंतु तिसऱ्या दिवशी हॅरी ब्रुक व जेमी स्मिथने नाबाद शतकी खेळी करून इंग्लंडला सामन्यात जोरदार मुसंडी मारली. चहापानापर्यंत या दोघांनी इंग्लंडला ७५ षटकांत ५ बाद ३५५ धावांपर्यंत मजल मारून दिली. खेळ थांबला तेव्हा हॅरी ब्रुक नाबाद १४० धावांवर, तर जेमी स्मिथ नाबाद १५७ धावांवर खेळत होते.

कर्णधार शुभमन गिलच्या विक्रमी द्विशतकाच्या बळावर भारताने पहिल्या डावात ५८७ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना दुसऱ्या दिवस अखेर इंग्लंडची ३ बाद ७७ धावा अशी घसरगुंडी उडाली. तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात करताना इंग्लंडची पुन्हा घसरगुंडी उडाली. सकाळच्या सत्रात भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने सलग दोन चेंडूवर जो रूट (२२) व बेन स्टोक्सला (०) यष्टिरक्षक ऋषभ पंतकडून झेलबाद केले. त्यामुळे इंग्लंडची २१.४ षटकांत ५ बाद ८४ धावा अशी स्थिती झाली. मात्र



एकमेकांचे अभिनंदन करताना जेमी स्मिथ व हॅरी ब्रुक

त्यानंतर कालचा नाबादवीर हॅरी ब्रुक व जेमी स्मिथने भारतीय गोलंदाजांचा कठोरपणे सामना करत आपल्या संघाचा डाव सावरला व धावसंख्या वाढविली. दरम्यान जेमी स्थिने आपले पहिले कसोटी शतक साजरे केले. स्मिथने ८० चेंडूंत १४ चौकार व ३ षट्कारांसह १०० धावा पूर्ण केल्या. उपहारापर्यंत इंग्लंडने ४७ षटकांत ५ बाद २४९ धावांपर्यंत मजल मारली. इंग्लंडच्या या जमलेल्या जोडीला फोडण्यासाठी भारतीय गोलंदाजांनी आटोकाट प्रयत्न केले, परंतु ते जुमानले नाही. स्मिथ पाठोपाठ हॅरी ब्रुकनेही आपले नववे कसोटी शतक साजरे केले. ब्रुकने १३७ चेंडूंत १२ चौकार व एका षट्कारसह १०० धावा पूर्ण केल्या. या दोघांनी पुढेही दमदार फलंदाजी करत चहापानापर्यंत इंग्लंडला ७५ षटकांत ५ बाद ३५५ धावांपर्यंत पोहोचवले. उपहार ते चहापानादरम्यानच्या काळात या दोघांनी इंग्लंडच्या खात्यात १०६ धावांची भर घातली. चहापानासाठी खेळ थांबला होता, तेव्हा ब्रुक १४० धावांवर, तर स्मिथ १५७ धावांवर खेळत होते. (वृत्तसंस्था)

# भारतीय ॲथ्लेटिक्सला प्रेमाची परतफेड करू इच्छितो : नीरज

### नीरज चोप्रा क्लासिक भालाफेक आज

◆ **बंगळुरू, ४ जुलै**

मी नीरज चोप्रा क्लासिक भालाफेक स्पर्धेत ९० मीटरपेक्षा जास्त भालाफेक करून भारतीय ॲथ्लेटिक्सला प्रेमाची परतफेड करू इच्छितो व त्यासाठी मी कसोशीने प्रयत्न करणार आहे, असे भारताचा दोन वेळा ऑलिम्पिकपदक जिंकणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा म्हणाला.

शनिवारी बंगळुरू येथे पहिली नीरज चोप्रा क्लासिक भालाफेक स्पर्धा होणार आहे. त्यापृष्ठभूमीवर माध्यमांशी बोलत होता. त्याच्या नावावर असलेल्या या स्पर्धेत तो या वर्षी दुसऱ्यांदा ९० मीटरचा टप्पा गाठण्याचा प्रयत्न करेल.

वयाच्या २७ व्या वर्षी नीरज चोप्राच्या कामगिरीत आधीच मोठी भर पडली आहे. त्याने आपल्या खेळात जवळजवळ सर्व पदके जिंकली आहेत- ऑलिम्पिक व जागतिक ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा सुवर्णपदके, डायमंड लीग फायनल्स ट्रॉफी, आशियाड क्रीडा व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकांचा समावेश आहे.

परंतु, आता घरच्या मैदानावर पहिल्या नीरज चोप्रा क्लासिकमध्ये मिळविलेले यश आतापर्यंत मिळविलेल्या यशापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. ही स्पर्धा भारतीय चाहत्यांना उच्च दर्जाची स्पर्धा प्रत्यक्ष पाहण्याची संधी देत आहे व ही स्पर्धा देशात या खेळाची प्रतिष्ठा उंचावण्यास मदत करेल.



ही स्पर्धा जागतिक विक्रमवीर स्वीडनचा बांबू उडीपटू अर्मांडो डुप्लांटिस व केनियाचा लांब पपल्ल्याचा धावपटू दिग्गज किपचोगे केनो यांच्याकडून प्रेरित आहे. त्यांच्या नावावर आंतरराष्ट्रीय स्पर्धा आहेत - मोंडो क्लासिक आणि किप केनो क्लासिक या जागतिक ॲथ्लेटिक्स कॉन्टिनेंटल टूर स्पर्धा आहेत. शनिवारी बंगळुरूच्या कांतीरवा स्टेडियममध्ये केवळ एक तास ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेदरम्यान चाहत्यांना दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेत्या नीरजला खेळताना पाहायला मिळणार आहे व तो ९० मीटरपेक्षा जास्त थ्रो करून या प्रेमाची परतफेड करण्याचा प्रयत्न करणार आहे. नीरजने मे महिन्यात दोहा येथे आपहल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच ९० मीटरचा टप्पा गाठला होता.

भारतात अशा प्रकारची स्पर्धा आयोजित करणे हे माझे खूप जुने स्वप्न आहे. माझ्यासाठी हे स्वप्न खरे झाले आहे, असे हरयाणाच्या खांद्रा गावातील खेळाडू नीरज म्हणाला. नीरजने २०२१ टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताला ॲथ्लेटिक्सचे पहिले सुवर्णपदक जिंतकून दिले होते व २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकले होते. (वृत्तसंस्था)

### ड्युरंड चषक फुटबॉल २३ जुलैपासून




**नवी दिल्ली** : आगामी २३ जुलै ते २३ ऑगस्ट दरम्यान पाच राज्यांमध्ये खेळल्या जाणाऱ्या आशियातील सर्वात जुनी फुटबॉल स्पर्धा असलेल्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेच्या १३४ व्या आवृत्तीत एकूण २४ संघ अव्वल स्थानासाठी स्पर्धा करतील. २४ संघांना सहा गटांमध्ये विभागले जाईल आणि जगातील तिसरी सर्वात जुनी स्पर्धा पश्चिम बंगाल, झारखंड, मणिपूर, मेघालय आणि आसाममध्ये खेळवली जाईल.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी राष्ट्रपती भवनात झालेल्या एका कार्यक्रमात भारतीय लष्कराने आयोजित केलेल्या या स्पर्धेच्या ट्रॉफीचे अनावरण केले. या कार्यक्रमाला भारतीय सशस्त्र

### ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्सची ऐतिहासिक पदभ्रमंती मोहीम

**सोलापूर** : ट्रेडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे २६ व २७ जुलै रोजी ऐतिहासिक पदभ्रमंतीचे आयोजन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्वलंत इतिहास युवा विद्यार्थी वर्ग, युवती व युवक यांना कळण्यासाठी ही ऐतिहासिक पदभ्रमंती मोहीम ज्या वाटेने छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळ्याचा वेढा तोडला होता त्याच वाटेने पावनखिंडीकडे असणार आहे. या मोहिमेमध्ये सहभागी होणाऱ्यांना दोन दिवस एक मुक्कामसह चहा, नाश्ता, जेवण, प्रवास याची सोय असोसिएशनतर्फे करण्यात येणार आहे. २५ जुलै रोजी रात्री १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून या मोहिमेची सुरुवात होईल. इच्छुकांनी असोसिएशनचे राज्य सचिव अश्विन कडलासकर (मो. ७५५८४५७१७७) यांच्याशी संपर्क साधावा.

# गिल, पंत, जयस्वालमध्ये भारतीय कसोटीला पुढे नेण्याचे सामर्थ्य : मायकेल वॉन

◆ **बर्मिंगम, ४ जुलै**

विराट कोहलीच्या अनुपस्थितीत नवीन कसोटी कर्णधार शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल आणि ऋषभ पंत यांच्यात भारतीय कसोटी संघाला पुढे नेण्याचे सामर्थ्य आहे. कोहलीने आपल्या उत्तम काळात 'एकट्याने' ही कामगिरी केली होती, असे इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन म्हणाला.

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील आतापर्यंतच्या कामगिरीवरून कोहली आणि रोहित शर्मा यांच्या तुलनेत भारतीय फलंदाजी क्रमवारीत बरीच सुरळीत प्रगती झाली आहे असे दिसते, परंतु

क्रिकेटपटूपासून समालोचक झालेला मायकेल वॉनने वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे की, चांगली सुरुवात म्हणजे काम पूर्ण झाले असे नाही. गिल, जयस्वाल आणि पंतला आता विराटने एकट्याने केल्याप्रमाणे भारतीय कसोटी संघाला पुढे न्यावे लागेल. भारतीय कसोटी संघासाठी विराट



कोहलीने जे केले ते काही वर्षांतच करण्याचा वारसा त्यांच्याकडे सोडण्याची उत्तम संधी आहे.

इंग्लंड दौऱ्यापूर्वी कोहली व रोहितने कसोटी निवृत्तीची घोषणा केली. भारतात नेहमीच भरपूर प्रतिभा असेल, परंतु कोहलीसारख्या खेळाडूची जागा भरणे सोपे नाही, असे तो म्हणाला. दोन दिग्गज खेळाडू निवृत्त झाल्यानंतर किंवा संघाबाहेर गेल्यानंतर तुम्ही अचानक पुढे जाऊ शकत नाही. शुभमनने कर्णधार व खेळाडू म्हणून अविश्वसनीय सुरुवात केली आहे. तो एक अद्‌भूत खेळाडू आहे. त्याच्या दमदार फलंदाजीमुळे संघाला जास्त संघर्ष करावा लागणार नाही, असे वॉन म्हणाला.

विराटने कसोटी संघात स्पर्धात्मक ऊर्जा आणली. त्याने गरजेनुसार संघात उत्साह व तीव्रता आणली. रणनीतीच्या बाबतीत कोहली खूप चांगला होता. कर्णधार म्हणून येणाऱ्या काळात शुभमन यात आणखी सुधारणा करू शकेल, असेही तो म्हणाला.

मजबूत फलंदाजी व गोलंदाजी बघता भारतीय संघ कसोटी क्रिकेटवर वर्चस्व गाजवेल अशी मायकेल वॉनला अपेक्षा आहे. भारताने आतापर्यंतच्या तीन जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीपैकी दोन अंतिम फेरी गाठूनही त्यांना जिंकता आले नाही. (वृत्तसंस्था)

# गुकेशचा कार्लसनवर विजय

### सुपर युनायटेड रॅपिड, ब्लिट्झमध्ये आघाडी

◆ **झाग्रेब (क्रोएशिया), ४ जुलै**

येथे सुरु असलेल्या सुपर युनायटेड रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेच्या सहाव्या फेरीत विश्वविजेता डी. गुकेशने प्रथम विश्वमानांकित नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनवर आणखी एक प्रभावी विजय नोंदविला आणि एकमेव आघाडी घेतली.

कार्लसनविरुद्धचा विजय हा गुकेशचा स्पर्धेत सलग पाचवा विजय होता आणि त्याने संभाव्य १२ पैकी १० गुण मिळवले. रॅपिड विभागात केवळ तीन फेऱ्या शिल्लक असताना गुकेशने जवळच्या प्रतिस्पर्धी पोलंडच्या डुडा जान-क्रिज्स्टोफवर




डावपेच रचण्यात मग्न मॅग्नस गार्लसन व डी. गुकेश

दोन गुणांची आघाडी घेतली आहे. अमेरिकेचा वेस्ली सो ७ गुणांसह एकमेव तिसऱ्या स्थानावर आहे, कार्लसन, हॉलंडचा अनिश गिरी आणि स्थानिक नायक इव्हान सारिक यांच्यापेक्षा पूर्ण गुणांनी मागे आहे.

आर. प्रज्ञानंद पाच गुणांसह अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनासह सातव्या स्थानावर आहे, तर फ्रान्सचा अलिरेझा फिरोज्झा चार गुणांसह नवव्या स्थानावर आहे. उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुस्तोरोव्ह केवळ तीन गुणांसह १० व्या स्थानावर आहे. नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत गुकेशकडून झालेल्या गत पराभवानंतर अव्वल विश्वमानांकित कार्लसनने चिडून टेबलवर जोरदार हल्ला केला होता. क्लासिकल बुद्धिबळात अव्वल विश्वमानांकित खेळाडूवरील हा भारतीय खेळाडूचा हा पहिलाच विजय होता. आदल्या दिवशी, गुकेशने काही चांगल्या प्रयत्नांसह अब्दुस्तोरोव्ह व कारुआनाला हरवले. प्रज्ञानंद विजय मिळवण्यासाठी संघर्ष करत आहे. त्याने कारुआना, कार्लसन व गिरीसोबत तीन बरोबरी साधली. स्पर्धेत पुनरागमन करण्यासाठी प्रज्ञानंदाला शेवटच्या दिवशी काही विजयांची आवश्यकता असेल. (वृत्तसंस्था)

### मोरोक्को गोल्फ स्पर्धेत भुल्लरला ३७ वे स्थान

**रबाट** : येथे झालेल्या २० लाख अमेरिकन डॉलर्सच्या आंतरराष्ट्रीय मोरोक्को गोल्फ स्पर्धेत भारतीय गोल्फपटू गगनजीत भुल्लरने एक अंडर ७२ चा गुण मिळवत ३७ वे स्थान मिळविले. ११ विजयांसह आशियाई टूरवरील सर्वात यशस्वी भारतीय भुल्लर आशियाई टूर ऑर्डर ऑफ मेरिट चॅम्पियन जॉन कॅटलिनपेक्षा चार शॉट्स मागे होता. २०२४ च्या शानदार कामगिरीनंतर या वर्षी सर्वोत्तम हंगाम खेळत नसलेल्या कॅटलिनने त्याच्या आवडत्या गोल्फ कोर्सवर पुन्हा फॉर्ममध्ये परतला. अमेरिकन खेळाडूने पाच अंडर ६८ सह सुरुवात केली.

# वरुण कुमारला हॉकी संघात पुनरागमनाची आशा

◆ **बंगळुरू, ४ जुलै**

टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता बचावपटू वरुण कुमारला आगामी युरोप दौऱ्यात भारत अ संघासोबत काही चांगल्या कामगिरीसह भारतीय वरिष्ठ पुरुष हॉकी संघात पुनरागमन करण्याची आशा आहे.



प्रभावी बचावपटू वरुण कुमार पॅरिस ऑलिम्पिक संघात स्थान मिळवू शकला नाही व एक वर्षापेक्षा जास्त काळ भारतीय वरिष्ठ हॉकी संघाच्या बाहेर आहे. गत वर्षी जूनमध्ये नवी दिल्लीत जर्मनीविरुद्धच्या मैत्रीपूर्ण सामन्यात तो शेवटचा भारतीय संघात दिसला होता.

ड्रॅगफ्लिकरने पुनरागमन करण्यासाठी पुढील महिन्यात राजगीर येथे होणाऱ्या आशिया चषकावर आपले लक्ष केंद्रित केले आहे आणि युरोप दौऱ्यातील चांगली कामगिरी त्याच्या बाबतीत मदत करेल याची त्याला जाणीव आहे.

निश्चितच, माझे वैयक्तिक ध्येय वरिष्ठ संघात परतणे आहे, परंतु सध्या माझ्यासाठी माझ्या खेळात सुधारणा करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. गत दीड वर्षांहून अधिक काळ योग्य दौरा खेळलो नाही.

हा बराच काळ आहे व खेळ सतत बदलत आहे. रचना बदलली असून ती खूप वेगवान सुद्धा झाली आहे. मी ज्या पद्धतीने त्याकडे पाहत आहे, ती म्हणजे नवीन सुरुवात आहे, असे वरुण म्हणाला. (वृत्तसंस्था)

### पॅरिस ऑलिम्पिकला मुकणे वेदनादायक

पॅरिस ऑलिम्पिकला मुकणे वेदनादायक होते. मी संघात स्थान मिळवण्याच्या विचारात होतो, पण आता वेळ निघून गेली. आता भारत अ संघासाठी खेळण्याची संधी मिळवून नवीन सुरुवात करण्यास तयार आहे, असे ड्रॅगफ्लिकर वरुण म्हणाला. वरुण हा २०१६ मध्ये भारताच्या कनिष्ठ विश्वचषक विजेत्या संघाचा भाग होता.

युरोपियन संघांविरुद्ध खेळणे खूपच रोमांचक आणि आव्हानात्मक असेल. माझ्यासाठी हा एक शिकण्याचा अनुभव असेल. भारतात आशिया चषक होण्याच्या पृष्ठभूमीवर युरोपमध्ये उत्कृष्ट खेळ करणे महत्त्वाचा ठरेल, असेही तो म्हणाला. संजयच्या नेतृत्वाखालील भारत अ संघ ८ जुलैपासून आयर्लण्ड, फ्रान्स व नेदरलॅण्डविरुद्ध प्रत्येकी दोन सामने आणि इंग्लंड व बेल्जियमविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळेल. हे सामने नेदरलॅण्डमधील आइंडहोव्हन व ॲमस्टेलवीन येथे होतील आणि बेल्जियमविरुद्धचा सामना ॲण्टवर्पमध्ये होईल. 'वैयक्तिकरित्या, माझ्यासाठी, मुख्य संभाव्य गटात परतण्याचा मार्ग कठीण होता. गत ७-८ महिन्यांत मी माझ्या तंदुरुस्तीवर खूप काम केले आहे आणि मानसिकदृष्ट्याही ते अत्यंत आव्हानात्मक होते, असे वरुण म्हणाला. भारत अ हॉकी संघ शुक्रवारी रात्री येथून ॲमस्टरडॅमला रवाना होत आहे.

# सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघाचा बांगलादेश दौरा रद्द होण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ४ जुलै**

गत काही महिन्यांपासून देशात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे ऑगस्टमध्ये होणारा बांगलादेश दौरा रद्द होण्याची शक्यता आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी सांगितले.

भारतीय संघ १७ ऑगस्टपासून तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहे, त्यानंतर २६ ऑगस्टपासून तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे.

भारतीय संघाचा बांगलादेश दौरा रद्द होण्याची शक्यता आहे कारण सरकारने बीसीसीआयला परिस्थिती ठीक नसल्याने तिथे जाऊ नये असा सल्ला दिला आहे. याबद्दलची अधिकृत घोषणा लवकरच केली जाईल, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने एएनआयला सांगितले.

या वर्षाच्या अखेरीस भारत आयोजित होणाऱ्या टी-२० आशिया चषकासाठी सराव म्हणून हा दौरा आयोजित करण्यात आला होता. भारताने शेवटचा २०१४ मध्ये बांगलादेशचा दौरा केला होता, तेव्हा त्यांनी तीन एकदिवसीय सामने खेळले होते.

गत वर्षी बांगलादेशने तीन सामन्यांची टी-२० मालिका भारताच्या दौऱ्यावर आणली होती व ती मालिका भारताने ३-० अशी जिंकली आणि दोन सामन्यांची कसोटी मालिकाही भारताने २-० अशी जिंकली. यापूर्वी, भारताने ढाका येथील दुर्गा मंदिर पाडल्याचा निषेध केला होता आणि मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या भूमिकेवर टीका केली होती. (वृत्तसंस्था)

# नागपूरच्या सिया देवधरची मोठी भरारी

◆ **नागपूर, ४ जुलै**

नागपूरची आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलपटू सिया देवधर हिने मोठी भरारी मारली असून चीनच्या शेन्झेन शहरात होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल महासंघाच्या (एफआयबीए) महिला आशिया चषक २०२५ स्पर्धेसाठी नागपूरची कन्या सिया देवधर हिची भारतीय संघात निवड झाली आहे.

सिया सध्या चेन्नई येथे सुरु असलेल्या राष्ट्रीय शिबिरामध्ये व्यस्थ आहे. आगामी १३ ते २० जुलैदरम्यान होणाऱ्या एफआयबीए महिला आशिया चषक बास्केटबॉल स्पर्धेसाठी ती लवकरच चीनला रवाना होणार आहे. तिच्या या कामगिरीमुळे नागपूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यापूर्वी, सियाने हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. सिया वयाच्या सहाव्या वर्षापासून बास्केटबॉल खेळायला लागली असून ती शिवाजी नगर जिमखाना येथे प्रशिक्षक शत्रुघ्न गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली बास्केटबॉलचे धडे गिरवते. हे दोघेही शिव छत्रपती पुरस्काराने सन्मानित आहे. धरमपेठ येथील रहिवासी असलेली सिया श्रीश व स्वाती देवधर यांची कन्या आहे. सियाने आतापर्यंत अनेक राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. वयाच्या १६ व्या वर्षी सिया वरिष्ठ महिला गटाच्या राष्ट्रीय बास्केटबॉल प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाली होती. सिया २०१८ व २०१९ मध्ये एनबीए अकादमी इंडिया महिलांच्या शिबिरातही सहभागी झाली होती. या शिबिरात तिला सर्वोत्तम प्रगतीशिल खेळाडूचा पुरस्कार मिळाला आहे. (तभा वृत्तसेवा)



# साळुंखे अकादमीची युनायटेडवर मात

### जे. टी. कुलकर्णी स्मृती शांभवी करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

जे. टी. कुलकर्णी स्मृती शांभवी करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत पंढरपूरच्या नागेश साळुंखे क्रिकेट ॲकॅडमीने येथील युनायटेड क्रिकेट क्लबवर ३१ धावांनी मात केली. जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर शुक्रवारी झालेल्या सामन्यात नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४० षटकांत सर्व बाद १८७ धावा केल्या. यात मुसळे याने ६७ धावा व तन्मय डोंगरे याने २९ धावा केल्या. युनायटेडच्या ध्रुव शिंदे याने ४६ धावांत तीन व श्रीराज कबाडे याने २२ धावांत तीन बळी टिपले. विजयी १८८ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या युनायटेडचा डाव ३६ षटकांत १५३ धावांत आटोपला. यात अभय अजलापुरकर ४२ व आरुष घोडके याने २८ धावा केल्या. साळुंखे अकॅडमीकडून अविनाश गरडने तीन बळी टिपले. यशराज लटके याने १२ धावांत व कार्तिक पाटोळेने २९ धावांत प्रत्येकी दोन गडी बाद केले. ३४ धावांत ३ बळी टिपणारा अविनाश गरड सामन्याचा मानकरी ठरला.



अविनाश गरड

# सोलापूर विद्यापीठाच्या अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कारासाठी १५ जुलैपर्यंत प्रस्ताव सादर करा

### क्रीडा क्षेत्रासाठी विविध पुरस्कारांची होणार घोषणा

**सोलापूर, दि. ४ जुलै -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून यंदाच्या वर्षापासून क्रीडा क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कार देण्याबाबत निर्णय झाला असून या पुरस्कारांसाठी दि. १५ जुलै २०२५ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अतुल लकडे यांनी केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून दरवर्षी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी १ ऑगस्ट रोजी जीवनगौरव पुरस्कारासह उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी, उत्कृष्ट संस्था, उत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्कारांचे सन्मानपूर्वक वितरण होते. यंदाच्या वर्षापासून कुलगुरू प्रा.प्रकाश महानवर आणि प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा क्षेत्रासाठी देखील विविध पुरस्कार देण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्या अनुषंगाने खेळ, शारीरिक शिक्षण, व्यायाम व क्रीडा क्षेत्रामधून अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कार देण्याबाबत रचना करण्यात आली आहे.

त्यानुसार उत्कृष्ट क्रीडा शिक्षक, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, उत्कृष्ट क्रीडा पत्रकारिता, उत्कृष्ट शारीरिक शिक्षण अध्यापक व संचालक असे चार पुरस्कार यंदाच्या वर्षीपासून देण्यात येणार आहे. या चारही पुरस्कारांकरिता नियमावली व विविध अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. याबाबत संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात आले आहे. तरी या पुरस्कारांसाठी दि. १५ जुलै २०२५ पर्यंत तीन प्रतीत आवश्यक कागदपत्रांसह संबंधितांनी त्या-त्या विभागाचे प्रमुख म्हणजे प्राचार्य, मुख्याध्यापक, संपादक किंवा जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या मार्फत विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अतुल

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### मळोलीत संत गाडगेनाथ पालखीवेळी बालकांचा हरिनामाचा गजर

**वेळापूर, दि. ४ जुलै-**

मळोली (ता. माळशिरस) येथे श्री संत गाडगेनाथ महाराज यांचा पालखी सोहळा गुरुवारी दुपारी विश्रांती साठी विसवला. कराड तालुक्यातील कोळे येथून हा पालखी सोहळा गेली अनेक वर्षाहून पंढरपूरकडे येत असून दिवसेंदिवस या पालखी सोहळ्यात वाढ होत आहे. गुरुवारी दुपारी दोन वाजता हा पालखी सोहळा कुसमोड गावातून मळोली येथील वारकरी वस्ती या मार्गाने गावाच्या पश्चिम देशेस आल्यानंतर रणजितसिंह जाधव, उपसरपंच ॲड. महादेव पवार, राजेंद्र जाधव पाटील, विजय पाटील, संतोष जाधव, शशिकांत जाधव, अण्णासाहेब जाधव यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. यावेळी श्री संत तुकाराम महाराज भजनी मंडळातील सर्व वारकरी बांधव व अंगणवाडी क्रमांक चार मधील बालकांनी दिंडी काढून हरीनामाचा गजर केला. यावेळी अंगणवाडी मधील बालकांनी तुळस डोक्यावर घेऊन साडी व वारकरी पोशाख परिधान करून हातात पताका घेतली होती. पालखी विठ्ठल मंदिरात विसावल्या नंतर हभप संस्थान महाराज यांचे कीर्तन संपन्न झाले. मळोली ग्रामस्थांच्या वतीने अल्पपोहार व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. तीन तासांच्या विश्रांती नंतर पालखी सोहळा रिंगण करून तांदुळवाडीच्या दिशेने मार्गस्थ झाला.



### ब्रह्मचैतन्य ग्रुपतर्फे वारकऱ्यांना फराळ, पाणी बाटल्यांचे वाटप

**पिलीव, दि.४ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ब्रह्मचैतन्य ग्रुपतर्फे गोंदवलेकर महाराज यांच्या पालखीतील सर्व वारकऱ्यांना पाण्याच्या बाटल्या तसेच उपवासाचा चिवडा याचे दरवर्षी प्रमाणे वाटप करण्यात आले.

### बार्शीत आषाढी व मोहरम सणानिमित्त पोलिसांचा बंदोबस्त

**बार्शी, दि. ४ जुलै-**

बार्शी शहरात उद्या ६ जुलै रोजी आषाढी एकादशी आणि मोहरम सण एकाच दिवशी होणार आहेत. आषाढी एकादशीनिमित्त भगवंत मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी जमणार आहे. हे मंदिर बार्शीतील वारकरी परंपरेचे केंद्र असून, आषाढी एकादशीला येथे रथ मिरवणूक काढली जाते, ती भक्ती आणि सामाजिक



एकतेचे प्रतीक आहे. याचवेळी, मुस्लिम समाजाचा मोहरम सणही साजरा होणार आहे. या दोन्ही धार्मिक कार्यक्रमांसाठी बार्शी पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्ताची व्यवस्था केली आहे. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आणि सलोखा राखण्याचे आवाहन केले आहे. आषाढी वारी आणि मोहरम मिरवणुका शांततेत पार पडाव्यात, यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनी लहान मुलांचे आणि मौल्यवान दागिन्यांचे रक्षण करावे. काही अडचण आल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले. दोन्ही समुदायांनी सौहार्दाने सण साजरे करावेत, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे.

### सलगरला १० जुलैला महारुद्र अभिषेक

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः श्री शिव बसवेश्वर विरक्त मठ करूणी सलगर येथे १० जुलैर रोजी गुरुपौर्णिमा निमित्त सकाळी सात ते अकरा या वेळेत श्री



शिव बसव शिवयोगी महास्वामीजी यांच्या पुण्य पावन कृतगदगेयला महारुद्र अभिषेक करण्यात येईल. गुरुवंदने पाद पूजा कार्यक्रम होईल व परम पूज्य श्री डॉक्टर अभिनव रामलिंगेश्वर महास्वामीजी श्री राम लिंगेश्वर मठ सलगर यांच्या सानिध्यात परम पूज्य श्री लिंगय्या देवरू यांच्या हस्ते संध्याकाळी सात ते दहा या वेळेत निवृत्ती शिक्षक यांना गौरव प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. सर्व ग्रामस्थ व भक्तगणांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

## निधन वृत्त...

### शफी अहमद शेख

**सोलापूर, दि. ४ जुलै-**



कर्णिक नगर येथील शफी अहमद अब्दुल सत्तार शेख यांचे गुरुवारी (दि.३) रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, दोन मुले, सुना असा परिवार आहे. ते निवृत्त डिस्टिक कोर्ट असिस्टंट सुप्रीटेंडंट होते.

# तृप्ती मोरे बनली मराठी चित्रपट नायिका!

### स्नेहसंमेलनात दिसणारी मुलगी मोठ्या पडद्यावर झळकली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.४ जुलै-**

वडवळ (ता. मोहोळ) येथील साधी राहणीमान असणारी शेतकरी कुटुंबातील मुलगी तृप्ती मोरे आता थेट रूपेरी पडद्यावर झळकत आहे. बालपणी गावातील रंगमंचावर दिसणारी ही कन्या आता संपूर्ण महाराष्ट्रात 'सजना' या मराठी चित्रपटातील मुख्य भूमिकेत मोठ्या पडद्यावर झळकणार आहे.

तृप्ती ही शेतकरी आत्माराम मोरे यांची कन्या. पण घरातून शिक्षण व अभिनयासाठी तिला मिळालेले स्वातंत्र्य हे तिच्या यशाचं मोलाचं कारण ठरले. वडिल आत्माराम व काका सखाराम मोरे यांनी तिला आणि तिच्या दोन बहिणींना शिकण्यासाठी भरभरून साथ दिली. घरात उच्चशिक्षित कोणीही नसताना, सर्व मुलींना शिक्षणात पुढे नेण्यासाठी मोरे कुटुंबियांनी मेहनत घेतली. तृप्तीने गावातील जिल्हापरिषद शाळेतील पहिली ते चौथी पर्यंत शिक्षण घेतले तर येथीलच माध्यमिक प्रशाला येथे दहावीपर्यंत आणि नेताजी महाविद्यालय, मोहोळ येथून उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. तिने बारावी सायन्समध्ये ८८ टक्के गुण मिळवले असून, सध्या ती बी.ए.चे शिक्षण घेत आहे. अभिनय, डान्स आणि स्पर्धांमध्ये भाग घेत-घेत तिने स्वतःची ओळख तयार केली. बालवयातच रंगमंचावरची तिची आत्मविश्वासपूर्ण उपस्थिती रसिकांना भावून गेली. आजोबा कै. नागनाथ पाटील यांनी तिच्या या वाटचालीस नेहमीच पाठिंबा दिला.




#### अभिनय काय असतो हे माहितीच नव्हते

ऑडिशनसाठी कसलीही तयारी नव्हती, अभिनय तर कधी केलाच नव्हता, मात्र गावातील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग आवडीने घेत होते. चित्रकार आणि दिग्दर्शक निर्माते शशीकांत धोत्रे यांनी मला प्रेरणा दिली. त्यामुळे अभिनयात काय करायचे असते ते क्लिअर झाले. शिरापूर येथील त्यांच्या स्टुडिओमध्ये प्रॅक्टिस करून घेण्यात आली.

**- तृप्ती मोरे, अभिनेत्री**

'सजना' चित्रपटात तृप्तीने 'वंदी' ही प्रमुख भूमिका साकारली असून, ट्रेलर आणि प्रमोशनल क्लिप्समधून तिच्या अभिनयाची झलक प्रेक्षकांना आधीच भावली आहे. तिच्या भूमिकेतील बालपणाचा भाग खुनेश्वरच्या स्नेहल चव्हाण हिने साकारला आहे. तर नायकाची भूमिका शिरापूरच्या आकाश सर्वगोड याने केली आहे. तृप्ती, कौटुंबिक पाठिंब्याने राज्यात झळकत आहे. या यशामुळे केवळ तिचे कुटुंबच नव्हे सर्वांनाच अभिमान आहे.



## जुळे सोलापूर, मंद्रूप बसस्थानकाची निर्मिती करा

### आ. देशमुख यांच्या परिवहन मंत्र्यांकडे विविध मागण्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जुलै-**

जुळे सोलापूर येथे बसस्थानक जागा निश्चिती करावी व मंद्रूप येथे बसस्थानकाची निर्मिती करावी यासह विविध मागण्या आमदार सुभाष देशमुख यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केल्या. यावेळी परिवहन मंत्र्यांनी या मागण्यांबरोबर सकारात्मकता दर्शविली व लवकरच प्रश्न मार्गी लागतील असे आश्वासन दिले.

मतदारसंघातील विविध समस्यांबाबत बैठक परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे पार पडली. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण मतदार संघाच्या दृष्टीने विविध मागण्या केल्या. यामध्ये जुळे सोलापूर बस स्थानक जागा निश्चिती करावी, मंद्रूप तालुका दक्षिण सोलापूर येथील जागेत बस स्थानक निर्मिती करावी, दक्षिण सोलापूर मतदारसंघात ग्रामीण भागासाठी २० नवीन बस उपलब्ध करून द्याव्यात, मतदारसंघातील नवीन मार्गावर नियमित बस सेवा चालू कराव्यात आदी प्रमुख मागण्या केल्या.

## वृध्द महिलेस मारहाणप्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै -**

वृध्द महिलेस मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कमल वसंत साखरे (वय ६५, रा. यशवंत नगर भाजी मार्केट, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उमेश मारूती चेंडगे, निलेश गावडे, उषा मारूती चेंडगे (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ जुलै रोजी कमल साखरे यांच्या गाडीचा चालक शुभम व शेजारी राहणाऱ्या निलेश गावडे यांच्यात वाद सुरु होता. तो वाद सोडविण्यासाठी कमल साखरे या मध्ये गेल्या असता त्यांचा भाचा उमेश चेंडगे व त्याच्या आईने मिळून कमल व त्यांचा मुलगा आण्णासाहेब यास शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण केली. तसेच कमल यांना उमेश याने ढकलून दिल्याने त्या खाली पडून जखमी झाल्या. यावेळी भांडणात कमल यांच्या गळ्यातील मंगळसूत्र तुटून कोठेतरी पडून नुकसाना झाले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार खाटमोडे पुढील तपास करीत आहेत.



कदम



क्षीरसागर

### माहिती अधिकार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी कदम; कार्याध्यक्षपदी क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ४ जुलै-**

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेच्या माढा तालुका अध्यक्षपदी प्रमोद कदम तर माढा तालुका कार्याध्यक्षपदी आनंद क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली.स्वराज माहिती अधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी ही नियुक्ती केली.स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दीपक कांबळे, संस्थापक महासचिव कमलेश शेवाळे, प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात, विश्वस्त उमेश काशीकर, प. महा.अध्यक्ष श्रीराम बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी ही नियुक्ती जाहीर केली. या निवडीसाठी स्वराज्य जिल्हा कार्याध्यक्ष सुनील पंडित, जिल्हा प्रभारी इफ्तेकार कामतीकर, जिल्हा उपाध्यक्ष सत्तू भोसले, उपाध्यक्ष शुक्राचार्य ढवण, सचिव सुधाकर शहाणे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## शिक्षकाबरोबर वाद घालणाऱ्या मद्यपी पालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ जुलै -**

शहरातील मुळेगाव रोडवरील सिध्दार्थ मराठी विद्यालय या शाळेत शिक्षकाबरोबर वाद घालणाऱ्या मद्यपी पालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दरेप्पा विश्वनाथ बिराजदार (वय ३६, रा. दर्गनहळ्ळी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सादीक नजीर शेख (वय ३४, रा. सिध्दार्थ मराठी विद्यालय अमरज्योती नगर, शाळेच्या पाठीमागे, मुळेगाव रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरेप्पा बिराजदार हे सिध्दार्थ मराठी विद्यालयात शिक्षकाचे काम करतात. ३ जुलै रोजी सकाळी ११ च्या सुमारास सादीक शेख हा दारू पिऊन मुलास भेटण्यासाठी शाळेत आला होता. त्यावेळी सादीक शेख याने दरेप्पा बिराजदार यांच्यासोबत वाद घालून त्यांची गच्ची पकडून शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

## आषाढी एकादशीनिमित्त काळेगाव येथे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ४ जुलै-**

तालुक्यातील सांगवी बु लगत असलेले काळेगाव येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आयोजित आषाढी एकादशी निमित्ताने अनेक भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, हरिपाठ, कीर्तन सोहळा व भरुडांची जुगलबंदी असे अनेक कार्यक्रम होणार आहेत.

रविवारी दि. ६ रोजी पहाटे ४ वाजता श्रीच्या मूर्तीस अभिषेक महापूजा व नंतर दिवसभर फराळीचा कार्यक्रम दरम्यान, दुपारी १२ ते ४ पर्यंत श्री राम कृष्ण हरी महिला भजनी मंडळ अक्कलकोट यांचे भजन कार्यक्रम व सायंकाळी ५ ते ७ श्री संत मारुती महाराज शिक्षण संथा कानेगाव यांचे हरिपाठ व तद नंतर रात्री ८ ते ११.३० पर्यंत भव्य कीर्तनकार हभप राजेश महाराज पाटील भालकी, जि बिदर यांचे कीर्तन होणार आहे. तसेच रात्री ११.३० ते पहाटे ४ वाजेपर्यंत भरुडांची जुगलबंदी कार्यक्रम संपन्न होणार असून, दुसऱ्या दिवशी दि. ७ सोमवार रोजी सकाळी पासून दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या आषाढी एकादशी निमित्त अतिशय भक्तीमय वातावरणात अनेक भव्य दिव्य कार्यक्रम संपन्न होणार असून या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन काळेगाव विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पिलीव येथे सेंद्रिय शेती विषयक मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. ४ जुलै-**

पिलीव (ता. माळशिरस) येथे श्रीराम कृषी महाविद्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती व सेंद्रिय शेतीचे महत्व, फायदे याविषयी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलन करून व महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजनाने कार्य़शाळेची सुरवात झाली.



अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरी हाके होते. यावेळी प्रा संगणा कुंभार यांनी सेंद्रिय शेतीचे उपयोग, फायदे तसेच रासायनिक खताच्या वापरामुळे होणारे आजार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. माजी ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ जामदार, मंडलाधिकारी एकतपुरे, दत्तुसिंग भैस, प्राचार्य हाके यांनी मार्गदर्शन केले. उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करणयात आले. यावेळी माजी विस्तार अधिकारी अनिल सावळजकर, ग्रामविकास अधिकारी बाबर, माजी ग्राम पंचायत सदस्य जिवन गोरे, पत्रकार संजय पाटील, शाहरुख मुलाणी, गणेश देशमुख, सतिश पारसे, विजय गोरे, संयोजक कृषी कन्या स्नेहल कोकाटे, प्रतिक्षा घुले, साक्षी घाडगे, सिद्धी कौलगे, श्रद्धा देवकाते, ऋतुजा पवार, ऐश्वर्या साळूंखे, सुचिता गोडसे उपस्थित होत्या. सिद्धी कौलगे व साक्षी घाडगे यांनी सुत्रसंचालन केले. श्रद्धा देवकाते यांनी आभार मानले.

## सोजर स्कूलमध्ये आषाढी दिंडी



**बार्शी, दि. ४ जुलै-**

आषाढी यात्रेच्यानिमित्त सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्यावतीने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या पालखीचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या प्रांगणातून दिंडीचा प्रारंभ झाला. त्यानंतर १०० फूटी रोड, उपळाई रोड, फुले चौक, तुकाई मंदिर मार्गे श्रीं च्या पालखीचे मल्लिकार्जुन मंदिर येथे आगमन झाले. लेझीम, फुगड्या, पाऊल ठेका, फेर या सारखे पारंपारिक खेळ प्रकार मुलांनी सादर केले. पालक रमेश मोरे यांनी मुलांना खाऊ वाटप केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रसाद सहस्त्रबुद्धे यांच्या नियोजनाखाली हा दिंडी सोहळा यशस्वीपणे पार पडला.



**पाऊले चालती.....पंढरीची वाट...**

आषाढी एकादशी निमित्त पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभाग, कर्नाटक व गोवा या राज्यातून निघालेल्या दिंड्या सांगोला तालुक्यातून पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाल्या.

(छायाचित्र : दिपक भाकरे, सांगोला)

# जिल्ह्यातील ९०२ लाभार्थ्यांना मिळणार शेततळे

### तंत्र अधिकारी सुदर्शन मामीडवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे योजना शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेत, शेतकऱ्यांना शेततळे बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. या योजनेतून शेततळे मिळण्यासाठी ९ हजार २४५ जणांनी ऑनलाईन अर्ज केले होते त्यापैकी ९०२ जणांची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात आल्याची माहिती तंत्र अधिकारी (मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापक) सुदर्शन मामीडवार यांनी आज (दि. ४) दिली.

या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादन वाढवणे, पाणीटंचाईवर मात करणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे, शेततळेसाठी आर्थिक सहाय्य करणे असा आहे. लॉटरी पध्दतीने शेततळ्यासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांमध्ये अक्कलकोट ६८, बार्शी ९५, करमाळा ८०. माढा ९२, माळशिरस १०३, मंगळवेढा ७१, मोहोळ ८८, पंढरपूर ८८, सांगोला १२५, उत्तर सोलापूर ३४ आणि द. सोलापूर ५८ असे जिल्ह्यातून ९०२ लाभार्थी शेतकरी निवडले गेले आहेत. यातील २७ अर्ज रद्द केले आहेत. ८७५ अर्ज प्रोसेस सुरू आहे तर ६०९ अर्जांची अपलोड पेंडिंग आहे. २६६ अर्ज नव्याने अपलोड झाले आहेत. यंदा या योजनेतून ४०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये वैयक्तिक शेततळ्यांसाठी सर्व शेतकऱ्यांना १०० कोटी रुपयांची तरतूद आहे. तुम्ही महाडीबीटी पोर्टल किंवा तुमच्या जवळच्या कृषी कार्यालयात जाऊन या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

#### या योजनेची अशी आहेत वैशिष्ट्ये

शेततळे बांधकामासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते, अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाते, या योजनेत, ४० गुंठे (एक एकर) पेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळतो, शेततळे अस्तरीकरणासाठी देखील अर्थसहाय्य दिले जाते, ही योजना मागेल त्याला शेततळे या नावाने पूर्वी ओळखली जात होती, आता ती मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना म्हणून ओळखली जाते.


#### अर्ज करण्यासाठी या कागदपत्रांची गरज

आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, ७/१२ उतारा, ८अ उतारा, बँक पासबुक, शेत जमिनीचा नकाशा, शेततळ्याचा अंदाज, अनुदानासाठी अर्ज, माझी कृषी योजना : वैयक्तिक शेततळे, ही योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. असे आवाहन पाणलोट विभागाने केले आहे.

### पत्नीस मारहाण करून घरातून हाकलून देणाऱ्यावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

पत्नीस मारहाण करून घरातून हाकलून देणाऱ्या पतीसह दोघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत फरीदा सलीम पठाण (वय ४५, रा. भूषण नगर भाग २, वांगी रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सलीम दगडू पठाण, शगुप्ता उर्फ डुग्या जावेद मुलाणी (दोघे रा. दुधेश्वर प्रशालाजवळ, मेंढापूर, ता. पंढरपूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ फेब्रुवारी २०२२ ते ३ डिसेंबर २०२४ या कालावधीत फरीदा या पतीसोबत सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व शगुप्ता या दोघांनी फरीदा यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून मारहाण मानसिक व शारीरीक त्रास दिला. तसेच ३ डिसेंबर २०२४ रोजी फरीदा यांना घरातून हाकलून दिले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कुंभार पुढील तपास करीत आहेत.



## शाळांमधील आषाढी दिंडी



### सिंहगड पब्लिक स्कूल

केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेजच्याच्या बाल दिंडीने लक्ष वेधून घेतले. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांच्या नेतृत्वाखाली ही दिंडी काढण्यात आली. चार हुतात्मा चौकातून या दिंडीस प्रारंभ करण्यात आले. फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्रनाथ भंडारे यांच्या उपस्थिती पार पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, होम मैदान, रंगभवन चौक मार्गे सात रस्ता येथे दिंडीचा समारोप झाला. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई, उपनगरीय शाखेचे विजय साळुंके, सदर बझार पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे, विधिज्ञ देशपांडे यांची उपस्थिती होती.



### अरिहंत स्कूल

जुना विडी घरकुल येथील अरिहंत इंग्लिश मिडियम स्कूल येथे पालखी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अजय पोन्नम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रतीकात्मक विठ्ठल-रुक्मिणीची आकर्षक व सुंदर वेशभूषा केली होती. पालखीचे पूजन अक्कलकोट श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे चन्नेश इंडी, सुलक्षणा पोन्नम, रामकृष्ण पोन्नम, तोषिता पोन्नम, पर्यवेक्षक तस्लीम शेख, रजनी सग्गम होते. ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका ठेवलेली पालखी खांद्यावर घेऊन दिंडी शाळा परिसरात मिरवणूक काढली. यावेळी विविध संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी रिंगण सोहळ्यात आकर्षण ठरले.



### वि. मो. मेहता प्राथमिक शाळा

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत आषाढी दिंडी सोहळा झाला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी हभप पोपटराव माळी, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी आषाढी एकादशी निमित्त सगळ्यांना शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांचा परिचय गणेश माने यांनी करुन दिला. मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन, संत मंडळींचे, विठ्ठल-रुक्मिणी पूजन करण्यात आले. श्रुती कुलकर्णी यांनी गायलेल्या मनात भरली पंढरी या अभंगावर सर्वांनीच ताल धरला. बालवारकऱ्यांनी विठ्ठल माऊली या अभंगाचे सादरीकरण केले. त्याला सुभाषिणी पिल्ले, श्रुती कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले तर आभार सुजाता यादव यांनी मानले.

# शिवरायांचे विचार अंगिकारणे काळाची गरज

## प्रा. नितीन बानगुडे-पाटील : अन्नछत्र मंडळ वर्धापन व गुरूपौर्णिमा उत्सवात गुंफले पाचवे पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.४ जुलै-**

महाराष्ट्राच्या मातीतून उभे राहिलेले स्वराज्याचे स्वप्न पाहणारे आणि ते साकार करणारे एक महान व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांच्याच कार्याचा, त्यांच्या विचाराचा आणि शौर्याचा गौरव आज ही होतोय, पुढे ही होत राहणार. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक राजा नव्हते तर ते एक महान व्यक्तिमत्व होते. त्यांचे विचार आणि कार्य आपल्याला कायमच प्रेरणा देत राहील. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे संकल्पित कार्य स्वराज्याच्या हितार्थ केले. आजच्या पिढीने शिवरायांचे विचार अंगीकारणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले.

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३८व्या वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवानिमित्त पाचवे पुष्प गुंफताना प्रा. बानगुडे-पाटील बोलत होते. संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली हा उत्सव होत आहे. आज 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यान झाले. दरम्यान कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन माजी शिक्षणमंत्री आमदार दिपक केसरकर, आरपीआय (आठवले गट) राज्य सचिव राजाभाऊ सरवदे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर चंद्रशेखर विनायक मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीपभाऊ सिद्धे, जीएसटी विभागाचे संजय कुलकर्णी, सुरेश सुर्यवंशी, बाबासाहेब निंबाळकर, बाळासाहेब मोरे, गोव्याचे पोलीस निरीक्षक लक्सी अमोणकर, झिला पेडणेकर, अनंत मालवणकर, गुरुराज नाडगोडा, आरपीआय (आठवले गट) तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे, सन्नी ठेंगील, गोगावचे सरपंच वनिता सुरवसे, समीर लोंढे, नागेश भिसे, नवाज भाई, नागेश बिद्री यांच्या हस्ते करण्यात आले. माजी शिक्षणमंत्री आमदार दिपक केसरकर यांचा न्यासातर्फे सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना प्रा.बानुगडे-पाटील म्हणाले,छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, शिक्षण स्वराज्याची स्थापना, प्रेरणा देणारे कार्य, एक महान देशभक्त, कुशल प्रशासक, अंतरराष्ट्रीय कीर्तीचे सरसेनापती याबाबत प्रा. बानुगडे- पाटील यांनी अंगावर शहारे उभे करणारा इतिहास सांगितला. प्रा. बानगुडे-पाटील यांच्यासह मान्यवरांचा अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.

न्यासाचे पुरोहित सोमकांत व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठण झाले. यावेळी विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, तेजस्विनीराजे भोसले, स्वामिनीराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, सुनंदा अष्टगी, क्रांती वाकडे, अनिता गडदे, रोहिणी देशपांडे, धनश्री पाटील, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक श्वेता हुल्ले यांनी केले. सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.



**अन्नछत्र हे संवेदनशीलतेचे प्रतिबिंब**

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ एक मातृत्व संस्था म्हणून श्री. भोसले यांनी संस्थेच्या माध्यमातून धार्मिक कार्याबरोबरच समाज उपयोगी कार्य त्यांच्या हातून घडत आहे. अन्नछत्र हे संवेदनशीलतेचे प्रतिबिंब आहे.

**-आमदार दिपक केसरकर, माजी मंत्री**

**आज कीर्तन** : दि. ५ जुलै रोजी शनिवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचे 'किर्तन' होणार आहे.

**गुणीजन गौरव :** विश्वनाथ गुरप्पा देवरमनी जि.प.प्राथमिक शाळा, नागणसूर (कृषी), महेश रामराव घुटे, वरिष्ठ शाखा प्रबंधक, बँक ऑफ इंडिया, शाखा- अक्कलकोट(बँकिंग), रमेश शिवराया पुजारी, प्रयोगशाळा परिचर, सी.बी.खेडगी महाविद्यलय, अक्कलकोट, सखुबाई शिवाजी चुंगीकर, सेवेकरी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# विकासकामे केल्यावर मिळतात जनतेची मते

## जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

सध्या केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीचेच सरकार आहे. या दोन्ही सरकारकडून जनहिताच्या असंख्य योजना राज्यात सुरू केल्या आहेत. या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवा आणि योग्य लाभार्थींना त्या-त्या योजनांचा लाभ मिळवून द्या, जनहिताची, विकासाची कामे मन लावून केल्यास निवडणुकीत भरभरून मते मिळतात, अशी स्पष्टोक्ती राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी आज (दि.४) सोलापुरात दिली.

येथील भारतीय जनता पार्टीच्या शहर-जिल्हा कार्यालयात भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांच्या बैठकीत मंत्री महाजन मार्गदर्शन करीत होते. यावेळी विचार मंचावर भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, चेतनसिंग केदार, सरचिटणीस विशाल गायकवाड, प्रा. नारायण बनसोडे, महिला आघाडीच्या अध्यक्षा विजया वडेपल्ली, साधना संगवे, संपदा जोशी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, विठ्ठल बडगंची आदींची उपस्थिती होती.

येथील भाजपा कार्यालयातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहून ना. महाजन यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी मंत्री महाजन पुढे म्हणाले की, सध्या केंद्र आणि राज्य सरकारद्वारे शेतकरी, कामगार, शेतमजूर, उद्योजक, युवक-युवती, महिला व एकंदरीत अबालवृध्दांसाठी विविध शासकीय योजनांचा पाऊस पडत आहे. या योजना अजूनही तळागातील सर्वसामान्यांना माहीत नाहीत. यासाठी भाजपच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी घरोघरी जावून या योजना सर्वसामान्य जनतेला समजावून सांगाव्यात, त्या योजनांचा योग्य लाभार्थ्यांना फायदा मिळवून द्यावा. अशा पध्दतीने भाजपा कार्यकर्त्यांनी केलेले परिश्रम कधीही वाया जात नाहीत. त्याचे फळ जनता-जनार्धन निवडणूक काळात देतेच, असाही दृढविश्वास मंत्री महाजन यांनी व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकापूर्वीही हेच काम करा. केंद्र अन् राज्यातील महत्वाच्या योजना सर्वसामान्यांना समजावून सांगा, त्या योजना त्यांना मिळवून द्या आणि निवडणुकीला उभारा. अन् फक्त विकासकामांना मत मागा, जनता भरभरून मतदानाचे दान देते, असाही सल्ला मंत्री महाजन यांनी यावेळी दिला.



**माझ्या मतदारसंघात आता विरोधकच नाही**

माझ्या मतदारसंघात केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना योग्य लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी मी स्वत: माझे कार्यकर्ते-पदाधिकारी रात्रंदिन राबतात. आरोग्यावरील योजनांचा तर आम्ही ९० टक्के लोकांना फायदा करून दिला आहे. यामुळे मी निवडणुकीत उभारल्यावर मला मतदारसंघात फिरायचीही गरज नाही. जनता जनार्धनच मला निवडूण आणते. यामुळे माझ्या मतदारसंघात आता विरोधकच राहिला नाही. सध्याही मी बाहेर फिरत असलो तरी माझी टीम त्या ठिकाणी तन-मन-धनाने काम करीत आहे.

**- गिरीष महाजन, जलसंपदा मंत्री**

# ७ जुलै रोजी सरकार पक्षाला म्हणणे सादर करण्याचे आदेश

## मनोहर सपाटे अटकपूर्व जामीन अर्ज प्रकरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

माजी महापौर मनोहर सपाटे यांच्यावर दाखल विनयभंगाच्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीनासाठी दाखल केलेल्या अर्जावर सोमवार दि. ७ जुलै रोजी म्हणणे दाखल करण्याचे आदेश सरकार पक्षाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी दिला.



दरम्यान शुक्रवारी झालेल्या सुनावणीवेळी फिर्यादीच्या वकीलांनी न्यायालयात महत्वाची कागदपत्रे दाखल केली. १६ व २४ जून २०२५ रोजी शिवपार्वती लॉजवर राहणाऱ्या एका विवाहितेचा विनयभंग केला याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात सपाटे विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये अटकेची शक्यता निर्माण झाल्याने माजी महापौर सपाटे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये जामीनाची मागणी असून त्याची प्राथमिक सुनावणी होणार आहे. दरम्यान तपासाधिकारी आषाढी वारी बंदोबस्तात असल्याने, त्यांचयाकडून कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्याने सरकार पक्षाच्या वतीने म्हणणे सादर करण्यासाठी पाच दिवसांची मुदत मागितली होती. त्यावर अर्जदाराच्या वकीलांनी हरकत घेतल्याने तीन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. याप्रकरणी फिर्यादीच्या वतीने अॅड. भडंगे तर सपाटे यांच्यातर्फे अॅड. शशी कुलकर्णी, अॅड. गुरुदत्त बोरगांवकर हे काम पाहत आहेत.

# सुरवसे बालक मंदिरात बालदिंडी

**सोलापूर :** आषाढी एकादशीच्या अवचित साधून चिमुकल्या जनाबाईसह सुरवसे बालक मंदिरात विविध वेशभूषेतील चिमुकल्याना पाहण्यासाठी पालकांनी गर्दी केली होती. अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका राखी सुरवसे, मुख्याध्यापिका शुभांगी लोखंडे आदी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते व चिमुकल्या विठ्ठल रुक्मिणी यांच्या हस्ते विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी खान, कुलकर्णी, ओहोळ, रसाळ, रतन, सोनाली आदींनी या दिंडीमध्ये सहभाग घेतला होता.






# व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये बाल वारकऱ्यांची दिंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये हरिनामाच्या गजरात बाल वारकऱ्यांनी आषाढी दिंडी यात्रा काढण्यात आली. यावेळी बाल वारकऱ्यांची दिंडी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालकीसह निघाली.

मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा, भगतलाल सुतार, इंद्रजीत चव्हाण, स्वेता येमेकर, रेखा बाबानगरे, उमा कोडम, भाग्यश्री गिडवीर, क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव यांच्या उपस्थितीत संत ज्ञानेश्वरांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. विद्यालयाच्या प्रांगणात वारकऱ्यांचा रिंगण सोहळा पार पडला. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असलतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.










https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


# अवघे गर्जे पंढरपूर । चालला नामाचा गजर ।।



## पंढरीतील रस्ते फुलले वारकरी अन् विठ्ठल भक्तांनी; दर्शनासाठी धावा

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.४ जूलै -**

आषाढी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मजलदरमजल करीत आलेल्या लाखों वैष्णवांचा मेळा पंढरीच्या दिशेने येत आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश झाला असून शुक्रवारी संध्याकाळी हे दोन्ही पालखी सोहळे शेवटच्या मुक्कामासाठी वाखरी येथे दाखल झाले. त्यामुळे पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना पुण्यनगरी पंढरीकडे येण्याची आता ओढ लागली आहे.

यात्रेच्या मुख्य दिवसांमध्ये गर्दीमुळे श्री विठ्ठलरुक्मिणीचे व्यवस्थीत दर्शन घडत नसल्यामुळे अनेक वारकरी दर्शन घेण्यासाठी पालख्यांमधून अगोदरच पुढे येत आहेत. त्यामुळे शहरातील रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत. वारकरी सांप्रदायामध्ये सर्वात मोठा उत्सव म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो तो आषाढी यात्रेचा सोहळा अवघ्या दोन दिवसांवर आलेला आहे. रविवारी दि. ६ जुलै रोजी आषाढी एकादशीचा महाउत्सव संपन्न होत आहे. संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकोबारायांचे पालखीसह सर्व प्रमुख संतांचे पालखी सोहळे शेवटच्या मुक्कामासाठी शुक्रवारी दि.४ जुलै रोजी संध्याकाळी वाखरी मुक्कामी दाखल झाले आहेत. जसजसे हे पालखी सोहळे पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करु लागले आहेत तशी या सोहळ्यांतील वारकरी भाविकांची विठ्ठल दर्शनाची आस वाढू लागली आहे. तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटसी केशवा ।। या श्री तुकोबारायांच्या अभंगाप्रमाणे लाखो वैष्णवांची अवस्था झाली आहे. दरम्यान शहरात आषाढी यात्रेसाठी व्यापाऱ्यांची दुकाने थाटण्यासाठी लगबग सुरू आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदीर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, तसेच मुख्य स्टेशन रस्त्यावरील दुकानदारांची तयारी अंतिम टप्प्यात आहे. पालखी सोहळ्याबरोबर चालणारे काही भाविक सध्या पालखी सोहळ्यातून पुढे पंढरपुरात येवुन येथील मठ, धर्मशाळा तसेच मंदिर परिसरातील मोठ्या वाड्यांमधून आपल्या खोल्या आरक्षीत करीत आहेत. आपल्या बरोबर आणलेले सामान या खोल्यांमधून ठेवुन चंद्रभागा स्नान, विठुरायाचे दर्शन, नगरप्रदक्षिणा करुन पालखी सोहळ्यात सहभागी होत असल्याचे दिसत आहे. एकंदरीतच पंढरीनगरीत वातावरण भक्तीमय झाले आहे.

**उपनगरांमधून देखील वारकऱ्यांची वर्दळ**

आषाढी यात्रेसाठी यावर्षी जिल्हा प्रशासनाने गर्दी टाळण्यासाठी वारकऱ्यांना अधिकाधिक सोयीसुविधांसाठी शहरात सुक्ष्म नियोजन केले आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणे, आवश्यक तेथे एकेरी वाहतूक, मंदिर परिसरात नो व्हेईकल झोन, फेरीवाल्यांना रस्त्यांवर बसण्यास मज्जाव करुन यात्रेचे नेटके नियोजन केले आहे. त्यामुळे शहरात गर्दी असून देखील रस्त्यांवर वारकऱ्यांना चालताना कोणताही गर्दीचा त्रास जाणवत नाही. मात्र प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे वारकऱ्यांची वाहने तसेच वारकऱ्यांनी आपला मोर्चा उपनगरांकडे वळविल्याचे दिसत आहेत. त्यामुळे दरवर्षी पेक्षा उपनगरांमधून विशेष: रेल्वे स्टेशन, गणेश नगर, टाकळी रोड, मनिषा नगर, इसबावी भागातील उपनगरे, लिंकरोड परिसरातील उपनगरे आदीं भागात वारकऱ्यांची वाहने अधिक प्रमाणात दिसत आहेत. या बरोबरच वारकरी भाविकांचे जथ्थे देखील येथे वास्तव्यास असल्याचे दिसत आहे.





**आषाढीनिमित्त शाळेच्या दिंडी**

सोलापूर : आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला विविध शाळांमध्ये बालदिंड्या काढण्यात आल्या. शहरातील सरस्वती मंदिर स.हि.ने. प्रशालेचे विद्यार्थी पाडुरंग रुक्माई, संतांच्या वेशभूषेत सहभागी होते.

(छायाचित्रे : केवल तिवारी)

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी २१० जीवरक्षक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जूलै-**

आषाढी यात्रा सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकरी भक्तांच्या सुरक्षेसाठी सोलापूर आणि कोल्हापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या समन्वयाने विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. यात्रेदरम्यान चंद्रभागेत स्नान करणाऱ्या वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी यंदा प्रथमच तब्बल २१० जीव रक्षकांचे पथक नियुक्त करण्यात आले आहे.

याशिवाय २० यांत्रिक बोटीच्या साहाय्याने नदीपात्रामध्ये अहोरात्र गस्त घालण्यात येत आहे. याशिवाय वारकऱ्यांनी नदी पात्रातील खोल पाण्यात जाऊ नये, यासाठी स्पंज बॉल साखळीच्या साहाय्याने नदीच्या पाण्यावर ३ किलोमीटर लांब फ्लोटिंग बॅरिकेडस देखील उभारण्यात आले आहेत. आषाढीला आलेला प्रत्येक भाविक चंद्रभागेमधील पवित्र स्नानाचा आनंद घेत असतो. या काळात नदी परिसरामध्ये लाखो वारकऱ्यांची गर्दी होत असते. या लाखो भाविकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार चंद्रभागेत बचाव कार्यासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापनांतर्गत चंद्रभागा नदीत संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आणि वारकऱ्यांना मदत करण्यासाठी एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि कोल्हापूर येथील वजीर रेस्क्यू फोर्स पथक तैनात करण्यात आले आहे आहे. या पथकामध्ये २१० जीव रक्षकांचा (आपदा मित्र) समावेश आहे. विशेष बाब म्हणजे या पथकामध्ये महिला जीव रक्षकांची संख्या देखील लक्षणीय आहे. हे आपदामित्र २० यांत्रिक बोटी आणि आवश्यक सर्व साहित्यासह चंद्रभागा नदीत गस्त घालत आहेत.



**आपदा मित्र योजनेअंतर्गत प्रशिक्षण**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुरस्कृत आपदा मित्र (जीव रक्षक) प्रशिक्षण योजना आहे. या योजनेअंतर्गत १८ ते ४५ वयोगटातील तरुणांना आपत्ती व्यवस्थापनामध्ये विशेष प्रशिक्षण दिले आहे. चंद्रभागेमध्ये तैनात असलेल्या बचाव पथकातील स्वयंसेवकांनीही जीव रक्षक प्रशिक्षण घेतले आहे.



**बालकृष्ण खात होता लोणी...**
**मात्र आताचा विठ्ठल खातोय आईस्क्रीम..**

सोलापूर : आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विविध शाळांनी बालदिंडीचे आयोजन केले होते. त्यामध्ये सहभागी होण्यासाठी निघालेला विठ्ठलच्या वेशभूषेतील बालक.



## अश्वपूजन सोहळ्याने श्रीक्षेत्र नारायणगड दिंडीचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ४ जुलै-**

श्री क्षेत्र नारायणगड पायी दिंडी पालखी सोहळ्याचे मोडनिंब (ता. माढा) येथे पारंपरिक अश्वपूजन करून स्वागत करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सायंकाळी पाच वाजता पालखी गावात दाखल होताच फुलांची उधळण, टाळ-मृदंगाचा गजर आणि राम कृष्ण हरी, नारायण नारायण नगद नारायणच्या जयघोषात अश्वाचे पूजन करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील यांनी सपत्नीक अश्वपूजन केले.

पालखीच्या स्वागतासाठी गावातील महिलांनी रांगोळ्या काढल्या, तर अनेकांनी तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन दिंडीत सहभाग नोंदवला. ह.भ.प. महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सोहळ्यात गावातील भाविक, महिला-पुरुष, व बालवारकरी सहभागी झाले होते.

## धाकट्या पंढरीत फुलणार भक्तीचा मळा

### ●श्री श्रेत्र धामणगाव येथे आषाढी एकादशीला जमणार लाखो वैष्णवभक्त

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ४ जुलै-**

धाकटी पंढरी समजल्या जाणाऱ्या श्री. क्षेत्र धामणगाव (ता. बार्शी ) येथे आषाढी एकादशी दिवशी श्री. संत माणकोजी बोधले महाराजांच्या संजीवन समाधीचे लाखों भाविक भक्तगण दर्शन घेत असतात. श्री. संत माणकोजी बोधले महाराज हे विठ्ठल भक्त होते. त्यांच्या भक्तीप्रेमामुळेच आषाढी एकादशीला पंढरपूर येथून पांडूरंग हे धामणगाव येथे वास्तव्यास येतात. अशी वारकरी सांप्रदायात अख्यायिका मानली जाते. ते आषाढी पौर्णिमेंपर्यत येथेच असतात. त्यामुळे आषाढी एकादशी ते पौर्णिमा पाच दिवसापर्यंत येथे वैष्णवांचा मेळा भरत असतो.

**'पंढरीची वाट गेली धामणगावा ।**
**ऐसी सेवा केली बोधल्यांनी ।।**

ही भावना भक्ताच्या मनात असल्याने धामणगाव क्षेत्रास वारकरी संप्रदायात महत्वाचे स्थान आहे. या आषाढीच्या निमित्ताने पंचक्रोशीतील २५ गावांतील पायी दिंड्यासह वारकरी व वैष्णव भक्त येथे लाखोंच्या संख्येने जमा होतात. मंदिर हे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतिक असल्याने वारकरी, भागवत, दत्त पंथात एक वैशिष्ट पूर्ण क्षेत्र म्हणून ख्याती आहे. आषाढी एकादिवशी निमित्त मंदिरात अभिषेक, पुजा, गुरू परंपरा कार्यक्रम होऊन धार्मिक विधीचे कार्यक्रम उत्साहात पार पडले जातात. बोधलेवाड्यातून पालखी परिक्रमा निघून माणकोजी व विठ्ठलांस नैवैद्य विधी केली जाते. विठ्ठल-बोधनामाचा गजर, भजन, किर्तनात भक्तगण दंग होतात. मंदिर व परिसरात विद्युत रोषणाईने आकर्षक सजविले जाते. पाळणे, मनोरंजन कार्यक्रम, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम उत्सवाचे आयोजन आषाढी पौर्णिमेपर्यंत चालते. बाहेरील गावातून येणाऱ्या भाविकांसाठी मंदिरामध्ये स्वच्छ पाणी, महाप्रसाद व आरोग्यविषयक सुविधा मंदिर समितीच्या वतीने पुरविण्यात येणार आहे. पौर्णिमेच्या पहाटे नाथपंथी जोग, सायंकाळी दहीहंडी कालासोहळ्याने यात्रेची सांगता होणार असल्याचे वंशपिठाधिश हभप विवेकानंद बोधले महाराज यांनी सांगितले.



> एकादशीला यात्रा भरत असून भाविकांना दर्शन रांगेची व्यवस्था, रस्ते दुरुस्ती, आरोग्य तपासणी, वाहन तळाची व्यवस्था करण्यात आली आहे.
> **- एस. के. पाटील, सरपंच, धामणगाव**



### मनोरमा परिवारातर्फे उद्या

## 'पाऊले चालती पंढरीची वाट' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पश्चिम (मनोरमा), सोलापूर आणि मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त पाऊले चालती पंढरीची वाट हा विशेष कार्यक्रम रविवार, दि. ६ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता खालील मान्यवरांच्या उपस्थितीत होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकांत मोरे (ज्येष्ठ साहित्यिक तथा अध्यक्ष मसाप पुणे शाखा प. सोलापूर) असून, प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार प्रशांत जोशी आहेत. प्रमुख उपस्थितीत अध्यक्षा शोभा मोरे, अस्मिता गायकवाड, प्रा. राजशेखर शिंदे, संतोष सुरवसे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. मनोरमा सांस्कृतिक भवन, बेन्नूर नगर, आरटीओ ऑफिस समोर, विजापूर रोड, येथे असून, तरी सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा प. (मनोरमा) सोलापूर व मनोरमा साहित्य मंडळी सदस्य डॉ. सुमित मोरे, डॉ. मिताली मोरे, डॉ. ऋचा मोरे पाटील, उज्ज्वला साळुंखे, शिल्पा कुलकर्णी, सुनील पाटील, कविता कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११६७


**अठराही भागले, सहाही शीणले । चाऱ्हीही राहिले मौन्यची ।।**
**रुखमादेवीवरें अंगिकार केला । निवांत राहिला सेना न्हावी ।।**

भक्त पुंडलिकाची आईवडीलांवरील भक्ती ही सर्वश्रेष्ठ भक्ती म नली जाते. असे आई वडिलांच्या सेवेचं अत्युच्च टोक असणाऱ्या पुंडलिकाला भेटायला आलेल्या आणि त्याच्या भेटीसाठी वाट पाहात समचरणी उभा असलेल्या पांडुरंगाची महती शब्दात व्यक्त करणे शक्य नाही. या पांडुरंगाची महती संसारात अडकलेल्या जीवाला तर सोडाच; पण अठरा पुराणे, सहा शास्त्रे आणि चार वेदांनाही जमले नाही. अर्थात, या ठिकाणी ही सर्व पुराणे, शास्त्रे, वेद, मौन धरून गप्प झाली आहेत. तेथे मी पामर या पांडुरंगाची कीर्ती किती सांगू शकणार आहे,

**अठराही भागले, सहाही शीणले । चाऱ्हीही राहिले मौन्यची ।।**

असे सेनाजी म्हणतात. अर्जुनाला कृष्ण अवतरात भगवंतांनी जेव्हा विश्वरुप दाखवले तेव्हा तो म्हणाला,

**म्हणौनि त्रिभुवनीं तूं एकु । तुजसारिखा ना अधिकु ।**
**तुझा महिमा अलौकिकु । नेणिजे वानूं ।।**



भगवंता त्रिभुवनात तुझ्यासारखा तुच आहेस. तुझा महिमा कोणालाही सांगता येणे शक्य नाही. अठरा पुराण, सहा शास्त्रे आणि चार वेदाचा उल्लेख येथे आल्याने या सर्वांची नावे येथे सांगणे योग्य वाटते. ब्रम्ह, पद्म, विष्णु, शिव, लिंग, गरूड, नारद, भागवत, अग्नी, स्कंद, वामन, मत्स्य, कूर्म, वराह, भविष्य, ब्रम्हवैवर्त, मार्कंडेय, ब्रम्हांड ही अठरा पुराणे होत. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा ही सहा शास्त्रे तर ऋग्वेद, यजुर्वेद, साम आणि अथर्व ही चार वेद होत. अठरा पुराणे, सहा शास्त्र आणि चार वेद या सर्वांची बेरीज अठ्ठावीस येते. या अठ्ठावीसांचा आधार, मध्य आणि शिरोम णी असणारा पांडुरंग अठ्ठावीस युगापासून समचरणी उभा असल्याचे मानले जाते. अशा महिमा सांगता येऊ न शकणाऱ्या पांडुरंगाने आपला स्वीकार केल्याने आपण निवांत झालो, आनंदी झालो असे सेना महाराज,

**रुखमादेवीवरें अंगिकार केला । निवांत राहिला सेना न्हावी ।।**

या शब्दांत म्हणतात. संत महात्म्यांनी स्त्रीची महती शेकडो वर्षापूर्वी सांगून ठेवली आहे. तरीही स्त्रियांना योग्य ते स्थान द्या, असे आजही सांगावे लागते. त्यासाठी विविध स्तरावरून वेगवेगळे प्रयत्नही केले जातात. याचा अर्थ आपण संतांचे ऐकण्यात कमी पडलो आहोत असा होऊ शकतो. एखाद्या मोठ्या आणि चांगल्या व्यक्तिचा परिचय त्याच्या पत्नीचा पती म्हणून व्हावा, यात त्या स्त्रीची महती लपलेली आहे. सेनाजींचा अंगिकार करणाऱ्या पांडुरंगाचा परिचय सेनाजींनी रुख्मीनीचा पती म्हणून करून दिला आहे. हा रुख्मीणीचा पती इतका मोठा आणि चांगला आहे, की त्याची कीर्ती सांगणेही कोणाला जमत नाही. वेद, शास्त्र, पुराणही हे कार्य करण्यात कमी पडले. तेथे माझ्यासारखा बापडा या रुख्मीणीच्या पतीची महती कसा सांगू शकेल, असे सेनाजी म्हणतात. आपणाला रुखमीणीच्या पतीची महती सांगता येणे शक्य नसल्याने आपण गप्प बसणेच योग्य असल्याचेही ते म्हणतात.

**माऊलीही श्री ज्ञानेश्वरीमध्ये, यालागीं आतां ।**
**स्तुति सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें ।।**

असे म्हणतात. भगवंताची, गुरुची स्तुति ही शब्दांपलिकडे असल्याने ती शब्दांत व्यक्त करता येणे शक्य नसते. प्रत्येक व्यक्तीच्या मोठेपणामागे, कर्तृत्वामागे निश्चितच एखाद्या स्त्रीचा हात असतो, असे म्हणतात. असे म्हणणे खरोखर सत्यही आहे. प्रत्येक व्यक्तिला स्त्रीकडे पाहण्याची संतासारखी दृष्टी लाभली तर कोणाही स्त्रीवर अत्याचार, अन्याय होणार नाहीत. कुटुंबात, समाजात आनंद आपोआप वाढेल.

**जय जय राम कृष्ण हरी.**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. ५ जुलै २०२५ | जागतिक सहकार दिन |
| विक्रम संवत् २०८१ | श्री जगन्नाथ पुनर्यात्रा पुरी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी (१८.५८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (१९.५०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्द (२०.३४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (अहोरात्र) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे.

**वृषभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. गृहसजावट, गृहबांधणी अशा व्यवसायात मनासारखी प्रगती होईल.

**मिथुन:** कितीही योजना करा, वेळेला जे हवे आहे तेच होत असते. धनस्थ मंगळा मुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे.

**कर्क:** घाईने निर्णय नको रुप आणि रुपया यावर कधीच गर्व नाही करायचा. गरीबी, आजार कधीच सांगून येत नाही.

**सिंह :** नवीन योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. डोळ्याच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी.

**कन्या :** वैद्यकिय, कृषि क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनातील समस्या विचाराने, सामंजस्याने सोडवाव्यात.

**तुळ :** आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. कला-गुणांच्या प्रगतीसाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. नव्या संधीचे स्वागत करावे.

**वृश्चिक :** कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणीतून म ार्ग निघत जाईल. नव्या योजना विशेष लाभदायक ठरतील. महत्वाची कामे करून घ्यावीत.

**धनु :** कार्यक्षेत्रात अधिक विचाराने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील.

**मकर :** नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात कला-गुणांचा विकास होत जाईल. जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. प्राप्तीचे प्रमाण सम ाधानकारक राहिल.

**कुंभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील.

**मीन:** व्यवसायात विचाराने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल.

# व्यसनमुक्त भारत आणि राष्ट्रभक्त तरुण घडविण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांची गरज : गिरीश महाजन

### संघ गंगा के तीन भगीरथ नाटकामधून हेडगेवार, गोळवलकर गुरुजी आणि बाळासाहेब देवरस यांचा जीवनपट उलगडला

### डॉ. केशव हेडगेवार आणि महात्मा गांधी यांच्या भेटीचा लक्षवेधी प्रसंग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

व्यसनमुक्त भारत आणि राष्ट्रभक्त तरुण घडविण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचाराची गरज आहे,असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. सोलापुरातील महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखेच्यावतीने गुरुवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात विश्वराज रिस्पॉन्सीबल रिव्हेलेशन नागपूर प्रस्तुत संघ गंगा के तीन भगीरथ या नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री गिरीश महाजन बोलत होते. सामान्य स्वयंसेवक असलेले नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले. पंतप्रधान मोदी यांच्यामुळे आज देशात नाव जगाच्या नकाशावर गेले आहे. आपण सुद्धा संघामुळेच सात वेळा आमदार झालो आहोत. त्यामुळे लहानपणापासूनच संघाच्या विचारांची सर्वांना गरज आहे, असे सांगत सकाळी - सकाळी पोपटपंची करणाऱ्यांना संघाच्या विचारांची गरज असल्याचे शिवसेनेचे नेते संजय राऊत यांचे नाव न घेता गिरीश महाजन यांनी यावेळी चिमटा काढला. मुस्लिम लीग स्ट्रॅाँग होत असताना वंदे मातरम आंदोलनाच्या म ाध्यमातून हिंदू समाजाला संघटित होण्यासाठी तरुणांनी शालेय जीवनापासूनच हाती घेतलेला लढा,लाठी-काठीपासून सुरु झालेले संघाचे कार्य आणि त्याला द्यावयाची गती यासह शरीर, मन आणि बुद्धीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखांमधून चालणारे काम,डॉक्टर केशव हेडगेवार यांनी संघाच्या कार्याची केवळ ९ वर्षात वाढवलेली व्याप्ती आणि त्याचे महात्मा गांधी यांनी केलेले तोंड भरून कौतुक या विषयावर या नाटकाद्वारे प्रकाश टाकण्यात आला. डॉक्टर हेडगेवार यांनी अनेक वर्षे काँग्रेसमध्ये काम केले मात्र काँग्रेसमध्ये असे संघटन का होऊ शकले नाही ? याबाबत महात्मा गांधी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस पक्षात बरेच चांगले लोक आहेत, मात्र मनोवृत्तीचा फरक असल्याचे हेडगेवार यांनी महात्मा गांधी यांना दिलेले सडेतोड उत्तर तसेच डॉक्टर हेडगेवार आणि महात्मा गांधी यांची भेट हा प्रसंग लक्षवेधी ठरला . संघ केवळ हिंदूंचे संघटन करतोय,अन्य समाजाचे का करत नाही, या महात्मा गांधी यांच्या प्रश्नाला डॉक्टर हेडगेवार यांनी स्वयंस्फूर्तीने दिलेले उत्तर अनेकांना भावले.नागपूर आणि परिसरातील मुस्लिम हिंदूंना त्रास देत असताना वंदे मातरम आंदोलनाचा लढा हाती घेत तरुणांनी संघटित हिंदू समाज हेच सर्वांचे उत्तर असल्याचे नाटकाच्या माध्यमातून दाखविण्यात आले.

क्रांतिकारी विचाराचे आणि काँग्रेसचे सक्रिय सदस्य असलेले डॉक्टर हेडगेवार यांनी राष्ट्रहितासाठी आणि हिंदूंच्या रक्षणासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली,यासह डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांचा संघर्ष नाटकामधून सांगण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून शिस्त, त्याग आणि समर्पणाचा संदेश देणारे द्वितीय सरसंघचालक म ाधव सदाशिव गोळवलकर गुरुजी आणि तृतीय सरसंघचालक मधुकर दत्तात्रय उर्फ बाळासाहेब देवरस या महान व्यक्तींच्या जीवनकार्यावरसुद्धा नाटकाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ प्रचारक रवींद्र भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली हुतात्मा स्मृती मंदिराच्या रंगमंचावर संघ गंगा के तीन भगीरथ हे तीन अंकी नाटक सादर करण्यात आले.

विश्वराज रिस्पॉन्सईबल रिव्हॉलेशन आणि राधिका क्रिएशन प्रस्तुत श्रीधर गाडगे यांनी या नाटकाचे लेखन केले आहे. तर संजय पेंडसे हे निर्देशक आहेत. सारिका पेंडसे यांची निर्मिती असून सतीश पेंडसे यांचे नेपथ्य आहे. निर्मिती सहाय्य म्हणून रमण सेनाड, नीलिमा बावणे आणि अरुणा पुरोहित यांनी काम पाहिले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, अमोल धाबळे, जितेश कुलकर्णी, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर,जिल्हा संघचालक सुनील इंगळे, शहर संघचालक राजेंद्र काटवे, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर,शहाजी पवार, अविनाश महागावकर, राम तडवळकर यांच्यासह श्रोते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नाटकातील कलाकार

संघ गंगा के तीन भगीरथ या सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिरात गुरुवारी सायंकाळी झालेल्या नाटकामध्ये अनिकेत मुनशी, मनीष उईके, रविदत्त हळवे, सुरेंद्र हरडे, प्रद्युम्न बायस्कर, नचिकेत म्हैसाळकर, राधिका सेनाड,मीनल मुंडले, स्वप्नगंधा खटी, संकल्प पायाळ, चिन्मय देशकर, शैलेश भलमे, मधुस्मिता गहलोद, स्वप्नील जतकर, मल्हार रानडे, अनुप रानडे, यशवंत चोपडे, अनिकेत गोंडाणे, हेमंत जिचकार, अंजली जोशी, शंतनु मगरूळकर, रमण सेनाड, प्रज्वल भोयर, सुधीर चिटणीस, अंतरा देशपांडे, अभिषेक काणे, रमेश शेळके आशिष पवार आणि सौरभ मसराम या कलाकारांनी भूमिका बजावल्या.

# मंगळवारपासून अस्थिव्यंग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव वितरण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकारच्या भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), मुंबई, मार्फत एस. आर. ट्रस्ट, मध्य प्रदेश, जिल्हा समाज कल्याण विभाग, सोलापूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, सोलापूर यांच्या सहकार्याने एडिप योजनांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील तालुका निहाय अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना म ोफत कृत्रिम हात, पाय बसविणे, कॅलिफर्स यांचे मोजमाप व तात्काळ मोफत जागेवर साहित्य वाटप शिबीराचे आयोजन दिनांक ८ ते १७ जुलैपर्यंत सकाळी १० ते ५ या दरम्यान जिल्ह्यातील तालुका निहाय ठिकाणी आयोजित केले आहे. तरी सर्व अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांगांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, सोलापूर प्रकल्प संचालक प्रकाश यलगुलवार यांनी केले आहे.

### शिबिराचे वेळापत्रक (तारीख व ठिकाण)

**शहर, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर :** ८ व ९ जुलै (जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र कर्णिक नगर, सोलापूर). **अक्कलकोट :** १० जुलै (मूकबधिर निवासी शाळा घोडगांव रोड, अक्कलकोट). **बार्शी :** ११ जुलै (बधिर मूक विदयालय, बार्शी). **पंढरपूर :** १२ जुलै नवजीवन अस्थिव्यंग निवासी शाळा के बी पी. कॉलेज चौक, पंढरपूर). **मोहोळ :** १३ जुलै (प्रभात चॅरिटेबल ट्रस्ट संचलित जुनेद मूकबधिर निवासी विदयालय, मोहोळ). **करमाळा :** १४ जुलै (जगदंबा मूकबधिर विदयालय, करमाळा). **सांगोला :** १५ जुलै : पंचायत समिती, सांगोला. **मंगळवेढा :** १६ जुलै : मूकबधिर निवासी शाळा, मंगळवेढा. **माढा :** १७ जुलै मूकबधिर निवासी विदयालय, कुर्डुवाडी

# नेहरू वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू; १ ऑगस्टला वसतिगृह सुरू

### ११ जुलैपासून अर्ज करण्याचे शिक्षण विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह आणि शेळगी येथील सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहात ११ जुलैपासून प्रवेश मिळणार आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनींनी प्रवेशासाठी २१ जुलैपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन प्राथमिक शिक्षणअधिकारी कादर शेख यांनी केला आहे.

नेहरू वसतिगृहात ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहेत. त्यासाठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना सात हजार १०० रुपये भरावे लागणार आहे. तर सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहात १०० मुलींना प्रवेश मिळणार आहे. त्यासाठी प्रत्येक मुलींना प्रवेशासाठी सहा हजार १०० रुपये प्रवेश फी भरावे लागणार आहे.

दरम्यान, ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरात मोठ्या प्रमाणात शिक्षण घेण्यासाठी येत असतात. मात्र, जवाहरलाल नेहरू वसतिगृह आणि सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहात प्रवेशाची क्षमता खूप कमी आहे. त्यामुळे या वसतिगृहात प्रवेशाची क्षमता वाढविण्याची म ागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे.

### प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक

* प्रवेश अर्ज स्वीकृती - ११ जुलै ते २१ जुलै
* प्रवेश अर्जाची छाननी - २२ ते २४ जुलै
* प्रवेश यादी जाहीर - २५ ते २८ जुलै
* प्रवेश शुल्क भरणे तारीख - २९ ते ३१ जुलै
* प्रत्यक्ष वसतिगृह सुरू - १ ऑगस्ट

## चक्कर येऊन बेशुध्द पडलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

राहत्या घरात अचानक चक्कर येऊन बेशुध्द झालेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. बाळू विठ्ठल दहिहंडे (वय ५५, रा. शाहिर वस्ती, भवानी पेठ) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घरात असताना, बाळू यांना अचानक चक्कर आली. यात ते बेशुध्द पडल्याने त्यांना पुतण्या दिनेश याने सायंकाळी सहाच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महावितरण कर्मचाऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

महावितरण कंपनी, अशोक चौक येथील पॉलिटेक्निक कार्यालयात तंत्रज्ञ असलेले वरिष्ठ कर्मचारी महेश नारायण आडे (वय ३३, रा. ता. किनवट, जिल्हा नांदेड) यांचे गुरुवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने महावितरण विभागात तसेच सहकाऱ्यांत शोककळा पसरली आहे.

गुरुवारी आडे हे ड्युटीसाठी घरातून निघण-ार होते. दरम्यान पावणेचार सुमारास त्यांना छातीत दुखू लागले. कार्यालयातील सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना सिव्हिल रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. आडे हे मागील साडेतीन वर्षापासून कार्यरत होते. त्यांनी विभागात विविध पदांवर जबाबदारी सांभाळत अनेक महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे.

## घरासमोर आग लावणाऱ्याविरुध्द गुन्हा

अंत्रोळीकर नगरमध्ये राहणाऱ्या व्यक्तीच्या घरासमोरील चारचाकी वाहनाचे नुकसान व्हावे म्हणून आग लावणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शफी अब्दुलकादीर शेख (वय ४३, रा. अंत्रोळीकर नगर भाग १, होटगी रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जून रोजी पहाटे अडीचच्या सुमारास शफी शेख यांच्या घराच्या पोर्चमध्ये असलेल्या कारचे नुकसान व्हावे म्हणून अज्ञात व्यक्तीने पोर्चमध्ये आग लावली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक वराळे पुढील तपास करीत आहेत.

## भावाला शाळेत सोडण्यासाठी जाताना बहिणीला सर्पदंश

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

भावाला शाळेत सोडण्यासाठी जाताना बहिणीला सापाने दंश केला. हा प्रकार माऊली दूध डेअरीसमोर गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास घडला.

अनुपमा संदेश माने (वय १६, रा. वसंत विहार) असे दंश झालेल्या मुलीचे नाव आहे. गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास अनुपमा हि भावाला ज्ञानदीप शाळेत सोडण्यासाठी म्हणून घरातून सकाळी ९ वाजता बाहेर पडली. दोघे बहिण भाऊ पायी जाताना ते माऊली दूध डेअरीसमोर आले. तेव्हा तिच्या डाव्या पायाला साप-ने दंश केला. तिला काकू रोहिणी माने यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असून रुग्ण शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर अभ्यासक्रम सुरु करणार : कुलगुरु डॉ. महानवर

### सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासनाची बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

महात्मा बसवेश्वर यांचे मानवतावादी कार्य समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्यावतीने म हात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्यावर आधारित अभ्यासक्रम सुरु करणार असल्याचे कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन सल्लागार समितीची बैठक विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला प्र-कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते.

यावेळी बैठकीत महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्यावतीने अल्पकालावधीचे विविध अभ्यासक्रम तयार करणे आणि हे अभ्यासक्रम सर्व इच्छुकांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन आणि विचारावर आधारित असलेले ग्रंथ संपदा संकलीत करुन कायमस्वरुपी जतन करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच ग्रंथाचे मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचा निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर विश्वसंवाद सदन आणि महात्मा बसवेश्वर आयुर्वेदिक उद्यान निर्माण करण्यासाठी प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर आधारित व्याख्याने, चर्चा, कार्यशाळा यांचे आयोजन करणे तसेच अध्यासन केंद्राच्या वतीने श्री सिध्देश्वर देवस्थान आणि म हाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील विविध संस्था महाविद्यालयासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी दिली

यावेळी जेष्ठ समाजसेवक हेमंत हरहरे यांनी सर्व उपक्रमाचे कौतुक केले व सामाजिक प्रबोधनासाठी अध्यासन कार्य करत असल्याचे नमूद केले. बैठकीला महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे सदस्य प्राचार्य गजानन धरणे, महादेव न्हावकर, स्वाती महाळंक, सुरेश शहापूरकर, राहुल पावले आदी उपस्थित होते.

## सिव्हीलमध्ये रुग्णवाहिकेतून खाली पडून तीन वर्षाची मुलगी जखमी

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

उपचारासाठी घेऊन येत असताना सिव्हील हॉस्पीटलच्या गेटजवळ गाडीने ब्रेक मारल्याने तीन वर्षाची मुलगी रुग्णवाहिकेतून खाली पडून जखमी झाली. हा प्रकार गुरुवारी सकाळी ९.१० वाजता घडला.

श्रावणी मारुती डोंगरे (वय ३ वर्षे,रा. किणी ता. अक्कलकोट) असे बालिकेचे नाव आहे. श्रावणी हिच्यावर अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रुग्णवाहिकेतून तिला सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणण्यात येत होते. रुग्णवाहिका सकाळी ९.१० वाजता शासकीय रुग्णालयाच्या गेटजवळ आली असता, गाडीने अचानक ब्रेक मारल्याने श्रावणी हि रुग्णवाहिकेतून खाली पडली. यात तिच्या डोक्याला जखम झाली असून तिला आजी मिनाक्षी डोंगरे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## पूर्ववैमनस्यातून तरुणीला मारहाण

**सोलापूर -** दक्षिण सोलापूर तालुक्यातील सिंदखेड येथे पूर्ववैम नस्यातून तरुणीला मारहाण करण्यात आली. ही मारहाण बुधवार रोजी सायंकाळी ५.३० वाजता झाली. लक्ष्मी योगीनाथ शरणार्थी (वय ३१) असे मारहाण झालेल्या तरुणीचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी लक्ष्मी ही राहत्या घराजवळ असताना, पूर्वी झालेल्या भांडणाच्या रागातून योगीनाथ व इतर चार जणांनी लाकूड तसेच लाथाबुक्याने मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने ती स्वतः गुरुवारी दुपारी १२.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची सुबुद्धी दे

## ■ राजू शेट्टींचे विठ्ठलास साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जुलै-**

राज्यातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी तसेच राज्यातील जनतेवर अन्यायकारक असणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची सुबुध्दी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना द्यावी यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी व विधीमंडळातील गटनेते आमदार सतेज पाटील, खासदार प्रणिती शिंदे यांनी पंढरपूर येथील महाराष्ट्रातील गोरगरीब व कष्टकरी जनतेचे आराध्य दैवत पांडूरंगास साकडे घातले.




राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ जुलै रोजी पंढरपूर येथे पांडुरंगाची सपत्नीक शासकीय पूजा करणार आहेत. या पुजेच्या आधी मुख्यमंत्र्यांनी विधानसभा निवडणुकीत दिलेला राज्यातील शेतक-यांचा सात बारा कोरा करून संपुर्ण कर्जमुक्तीच्या निर्णयाची तातडीने अमलबजावणी करावी. तसेच राज्यातील जनतेवर व शेतक-यावर अन्यायकारी ठरणारा शक्तीपीठ हामार्ग रद्द करण्याची सुबुध्दी सुचावी या मागणीसाठी पंढरपूरात आज शेतकऱ्यांना गर्दी केली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चौकातून सर्व शेतकरी एकत्रित येत विठ्ठल मंदिरासमोरील नामदेव पायरीवर पांडुरंगास अभिषेक घालून साकड घालण्यात आले. राज्य सरकारला जर शेतक-यांची कर्जमाफी करण्यास व शक्तीपीठ रद्द करण्याची सुबुद्दी सुचली नाही तर या सरकारच्या विरोधात लढण्याची ताकद देण्याचे साकड घालण्यात आले.

### विठ्ठला राजू शेट्टींनाच सुबुध्दी दे - पालकमंत्री

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणतात की, राजु शेट्टीनी आषाढी यात्रेच्या काळात वारकरी भाविकांची गर्दी असताना हे आंदोलन आज करावयास नको होते. खरे तर सरकार ऐवजी पांडुरंग राजू शेट्टींनाच सुबुध्दी देईल. त्यांच्या मध्ये निश्चितच फरक पडेल.

साकडे आंदोलना संदर्भात राजू शेट्टी म्हणाले, हे आंदोलन नव्हे तर आम्ही देवाला साकडे घालण्यासाठी आलेलो आहोत. पांडुरंग हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्रातील जनतेला नको असलेला महामार्ग आहे. कोणा भक्तांनी, कोणा शेतकऱ्यांनी या महामार्गाची मागणी केलेली नाही. मराठवाड्याच्या विकासाचे स्वप्न दाखवून ३० ते ३२ हजार कोटींमध्ये तयार होणारा रस्ता ८६ हजार कोटी मध्ये तयार करुन ५० हजार कोटींचा भ्रष्टाचार करण्यासाठी हा महामार्ग करण्याचा घाट घातलेला आहे. पोलिसांच्या मदतीने जमीनी मोजण्याचा प्रयत्न होतोय. हे सरकार दमण नितीचा वापर करुन शेतकऱ्यांच्या जमीनी लुटू पहात आहे. वयाची पंच्याहत्तरी पुर्ण केलेल्या शेतकऱ्याला सुध्दा आज बैलाच्या ठिकाणी राबण्याची परिस्थिती या सरकारने आणली आहे. या मुख्यमंत्र्यांना सुबुध्दी दे आणि हा निर्णय रद्द करायला भाग पाड त्याच बरोबर निवडणूकी मध्ये सातबारा कोरा करण्याचे जे आश्वासन दिलेले आहे ते पाळण्याची सुबुध्दी या सरकारला द्या अन्यथा यांच्या विरोधात लढण्यासाठी पांडुरंगा आम्हाला बळ दे साकडे घालण्यासाठी आम्ही येथे आलेलो आहे.

# टेंभुर्णीत वारकऱ्यांना मोफत चहा, अल्पोपहार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ४ जुलै-**

माढा तालुक्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे हे सध्या अमेरिकेमध्ये असून त्यांच्यावर होणारी हृदयाची शस्त्रक्रिया यशस्वी होवो, यासाठी टेंभुर्णीमध्ये विविध ठिकाणी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांना मोफत चहा, अल्पोपहार, केळी, लाडू, चिवडा यासारखे अनेक खाद्यपदार्थाचे वाटप करण्यात येत आहे. यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडू ढवळे, डेप्युटी ॲग्रीकल्चर ऑफिसर संजय ढवळे उपस्थित होते.




यावेळी सरपंच नवनाथ शिंदे, उपसरपंच हनुमंत चव्हाण, ॲड. सचिन चव्हाण, सुनील भोसले, संतोष वाघमारे, धनंजय भोसले,सोमनाथ नलवडे,सुरज काझी,नागनाथ गायकवाड, स्वप्निल चव्हाण, राहुल सुतार, सोन्या सुतार,लहू कुटे, आबा कुटे यांनीही या उपक्रमास उपस्थित राहून सहकार्य केले.

# वीर माता, पत्नी व माजी सैनिकांचा गौरव

## ■ झेंडेवाली सवारी मित्रमंडळाकडून आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जुलै-**

येथील राऊळ गल्ली येथे असणारी मानाची समजली जाणारी झेंडेवाली सवारी मित्रमंडळाच्यावतीने भारत सरकारने राबवलेले ऑपरेशन सिंदूरच्या साक्षी म्हणून माजी आमदार राजेंद्र राऊत व पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते वीर माता, पत्नी यांचा तसेच तालुक्यातील माजी सैनिकांचा गौरव गुरुवारी सायंकाळी राऊळ गल्ली येथे करण्यात आला.



यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष ॲड. असिफ तांबोळी, विलास रेनके, बाबा कापसे, रवी राऊत, राकेश तातेड, झेंडेवाली सवारीचे सर्वेसर्वा रफिकभाई सातारकर उपस्थित होते.

यावेळी वीर माता, वीर पत्नी सुनिता जयंत पन्हाळकर, सुनिता संतोष शिंदे, अर्चना सुनील काळे, राहीबाई अभिमन्यू पवार यांचा तसेच तालुक्यातील सर्व माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी जिजाऊ स्कूलच्यावतीने ऑपरेशन सिंदूरबाबत लघु नाटिका सादर केली तर शारदीय स्कूलच्यावतीने पतसंचालन करण्यात आले. यावेळी माजी आमदार राऊत म्हणाले की, झेंडेवाली सवारी मित्रमंडळांनी हिंदू मुस्लिम ऐक्याची परंपरा जोपासली आहे. ऑपरेशन सिंदूरसाठी पंतप्रधान यांनी सैन्याला पूर्ण मुभा दिली होती. त्याचा परिणाम आपल्याला पाहायला मिळाला. प्रास्ताविक राकेश तातेड तर आभार राजू रुणवाल यांनी मानले.

# बैलगाडी खड्ड्यात आदळून महिला जखमी

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

गतीरोधकावरून तसेच खड्ड्यात दुचाकी आदळून अनेकवेळा खाली पडून महिला किंवा पुरुष जखमी झाल्याच्या घटना घडल्या. परंतु दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंत्रोळी येथे बैलगाडी खड्ड्यात आदळल्याने महिला बैलगाडीतून पडून जखमी झाल्याची घटना घडली. विमल ज्योतीबा साळुखे (वय ५०, रा. अंत्रोळी ता. द. सोलापूर) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास विमल या बैलगाडीत बसून जात होत्या. अंत्रोळी शिवारातून बैलगाडी जाताना ती खड्ड्यात आदळली. यामुळे विमल या बैलगाडीतून खाली पडल्याने त्यांच्या चेह-याला जखम झाली. मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शुक्रवारी स्वत: दुपारी ४.१५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# धार्मिक भावना भडकवणारी पोस्ट शेअर केल्याबद्दल गुन्हा दाखल

**बार्शी, दि. ४ जुलै-**

बार्शी शहरात धार्मिक भावना भडकवणारी फेसबुक पोस्ट आणि व्हिडीओ शेअर केल्याप्रकरणी सोहेल राजू खड्डेवाले याच्याविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २९९ अंतर्गत हा गुन्हा नोंदवला असून, पोलिसांनी तपास सुरु केला आहे. दि. ४ जुलै रोजी पहाटे ००:१५ वाजता, मंगळवार पेठ येथील सोहेल खड्डेवाले याने त्याच्या फेसबुक अकाउंटवरुन आक्षेपार्ह व्हिडीओ टाकला. यात आगीन पावडा येथे मुस्लिम समाजातील व्यक्ती सवारी घेऊन जात असल्याचे दाखवत लिंबू याला मारिला हे गाणे एडिट केले होते. तसेच, पोस्टमध्ये अपने पास भी है ऐसा.... हराम हराम हराम... आणि कमेंटमध्ये मोहरम में के नाजायज औलाद अगर कमेंट में आये ना बहिण उचलुंगा असे आक्षेपार्ह मजकूर लिहिला. यामुळे लिंबूवाली सवारी मानणाऱ्या मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. देशमुख प्लॉट येथील बिलाल आबूतालिब शेख (वय २६, व्यापारी) यांनी याबाबत तक्रार दाखल केली. त्यांनी म्हटले की, आरोपीच्या कृत्यामुळे धार्मिक तेढ निर्माण होऊन सामाजिक सौहार्द बिघडले आहे. बार्शी शहर पोलीस ठाण्यात ठाणे दैनंदिनी क्रमांक २/२०२५ अंतर्गत गुन्हा नोंदवला गेला. पोलीस निरीक्षक बलाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ मुढे (बक्कल क्र. १६६५) तपास करत आहेत. पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावर संयम राखण्याचे आणि धार्मिक भावना भडकवणाऱ्या पोस्ट टाळण्याचे आवाहन केले आहे. तपास सुरु असून, लवकरच आरोपीला ताब्यात घेतले जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

# केंद्राच्या योजनेसाठी बँकांची पावले गावांकडे

## ■ १ हजार ग्रामपंचायतीत होणार बँकांचे शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

वंचित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांमध्ये समाविष्ट करणे आणि त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी दि. १ जुलै ते ३० सप्टेंबरपर्यंत तीन महिन्यांचे आर्थिक समावेशन योजनांचे संयुक्त अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील १ हजार १२ ग्राम पंचायतीमध्ये विविध बँकांद्वारे विशेष शिबीर आयोजन करण्याचे निर्देश दिलेले आहेत, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक राम वाखरडे यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली.

भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाच्या सूचनानुसार देशभरात ही मोहीम राबविली जाणार आहे. ग्रामपंचायत स्तरावरती उपलब्ध असलेल्या विविध शासकीय यंत्रणा म्हणजेच तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, डीसीसी बँक व पोस्ट ऑफिस यांनीही या मोहिमेमध्ये सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि बँकर्सना आवश्यक ती मदत करण्याचे निर्देश दिले आहेत.

अभियानाचा उद्देश सर्व खातेधारकांच्या केवायसीची पुनः पडताळणी, ज्यामध्ये विद्यमान निष्क्रिय पीएमजेडीवाय खतांचा समावेश आहे, पीएमजेडीवाय अंतर्गत बँक खाते नसलेल्या प्रॉडक्टसाठी बँक खाते उघडणे, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत नोंदणी अटल पेन्शन योजना अंतर्गत नोंदणी, बँक खातेधारकांसाठी नामांकन सुविधा, डिजिटल फसवणूक प्रतिबंध आणि दावा न केलेल्या ठेवींमध्ये प्रवेश मिळवण्याचे मार्ग आणि तक्रार निवारण यावर जागरूकता सत्रे इत्यादीचा समावेश आहे. जनतेने पीएमजेजेबीवाय, पीएम एसबीवाय आणि एपीवाय अंतर्गत नोंदणी करून या शिबिराचा लाभ घ्यावा व मोहीम यशस्वी करण्यासाठी बँक शाखा, शिबिर स्थळ आणि बँक व्यवसाय प्रतिनिधींना जनतेने भेट भेट द्यावी, असे आवाहन राम वाखरडे यांनी केले.

# फळपीक विमा योजनेस ६ जुलैपर्यंत मुदतवाढ

**सोलापूर दि. ४ जुलै-**

प्रधानमंत्री पिक पिमा योजने अंतर्गत पुनर्रचीत हवामान आधारित फळपिक विमा योजना अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकारकडून फळ पिक विमा भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

फळपिक विमा भरण्याची मुदत ६ जुलै वाढविण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व डाळिंब, पेरू, लिंबू, चिकू, सीताफळ व मोसंबी बाग धारक शेतकऱ्यांनी आपल्या फळ बागेचा विमा नजीकच्या कॉमन सर्विस सेंटर, बँक किंवा आपले सरकार केंद्रास भेट देवून आपली फळबाग विमा संरक्षित करून घ्यावी. पिक - पेरू- पिकाचे उत्पादनक्षम वय (वर्ष) ३, शेतकरी विमा हफ्ता (प्रति हेक्टरी)-३५०० - विमा सरक्षित रक्कम -७० हजार, मोसंबी- पिकाचे उत्पादनक्षम वय (वर्ष) ३, शेतकरी विमा हफ्ता (प्रति हेक्टरी)-५ हजार - विमा सरक्षित रक्कम - १ लाख. लिंबू- पिकाचे उत्पादनक्षम वय (वर्ष) ४ - शेतकरी विमा हफ्ता (प्रति हेक्टरी)-४ हजार - विमा सरक्षित रक्कम - ८० हजार

# शिक्षण प्रसारक मंडळाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला

## ■ मोहिते-पाटील यांचे प्रतिपादन
## ■ १५१ गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ जुलै-**

शिक्षण प्रसारक मंडळाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात जाऊ द्यावे. आपली मते त्यांच्यावर लादू नयेत असे अवाहन संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांनी केले.



स्मृतिभवन शंकरनगर येथे शिक्षण प्रसारक मंडळातील इयत्ता १०वी मध्ये ९० टक्के पेक्षा अधिक व १२वी मध्ये ८० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या एकूण १४६ तर जेई नीट सीईटी मधील ५ अशा एकूण १५१ गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार आयोजित केला होता. या वेळी ते बोलत होते.

सदरचे सत्कार संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, युवानेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, संचालक सुभाष दळवी, निशा गिरमे नारायण फुले, रामचंद्र गायकवाड बाळासाहेब सणस, पांडुरंग एकतपुरे, वसंत जाधव, उत्कर्ष शेटे प्रमुख उपस्थित होते. जयसिंह मोहिते-पाटील म्हणाले, शिक्षण प्रसारक मंडळांने १९८४ पासून संयुक्त परीक्षा पद्धत सुरू केली. या मुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली. सध्या स्पर्धे चे युग आहे. विद्यार्थ्यांनी यशामुळे हुरळून जाऊ नये. गुणवत्तेमध्ये सातत्य ठेवावे. संस्थेने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते बरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक गुणांचाही विकास करत सर्वांगीण विकास साधला आहे. टीव्ही, मोबाईलच्या जमान्यात महाराष्ट्राची ग्रामीण संस्कृती, खेळ, कला लोप पावत चालली असून ती जोपासण्याचे काम अकलूज मध्ये होत आहे. महिलासाठी नागपंचमीचा सोहळा शिवपार्वती मंदिरात साजरा होणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रस्ताविक युवा नेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी केले. शासनाने मुख्यमंत्री आदर्शशाळा स्पर्धेत संस्थेच्या सदाशिवराव माने विद्यालयाला जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांकासह रोख ११ लाख रुपये तर महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेस द्वितीय क्रमांकासह रोख ५ लाख रुपये देऊन गौरव केला आहे.

इयत्ता १०वी व १२वी मध्ये संस्थेत प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. यामध्ये इयत्ता १०वी परीक्षेत कु. पौर्णिमा भांगे तिने९८.२० टक्के गुण मिळवत संस्थेत प्रथम, सिफा तांबोळी ९७ टक्के व ओंकार राऊत ९७ टक्के मिळवित विभागून द्वितीय,आर्या कुलकर्णी, इंद्रनील चव्हाण, गौरांग जामदार या तिघांनी ९६.८० टक्के मिळतील विभागून तृतीय यांचा समावेश आहे. तर १२ वीत वरद कोतमिरे याने ८९.८३ टक्के मिळवित संस्थेत प्रथम, मनाली भुजबळ हिने ८९.५० टक्के मिळवित द्वितीय व क्रांती पांढरे हिने ८९ टक्के मिळवित तृतीय यांचा समावेश आहे. प्रारंभी सहकार महर्षी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील तसेच सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. सारे जहाँ से अच्छा या देशभक्तीपर गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी व आर. आर. पाटील यांनी केले.

## महत्वाचे...



### आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त कालभैरव पतसंस्थेच्यावतीने वृक्षारोपण

**बार्शी, दि. ४ जुलै-**

आंतरराष्ट्रीय सहकारी वर्षानिमित्त दि. ४ जुलै रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बार्शी व कालभैरव नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने मंगळवार पेठेतील उत्तरेश्वर मंदिराच्या पाठीमागे वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सहाय्यक निबंधक सय्यद, एस. के. मुंढे, मनिषा गुप्ता, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शीचा स्टाफ व कालभैरव नागरी सहकारी पतसंस्थाचे चेअरमन मंगेश बारंगुळे, व्हा. चेअरमन लहूमामा चव्हाण, संचालक सर्वश्री पांडुरंग गोंदिल, यशवंत सावळे, दत्तात्रय लेंगरे, जयवंत भागवत, नागजी कातूरे, चंद्रकांत पात्रुडकर, श्रीमती शकुंतला देशमुख, श्रीमती शर्मिष्ठा बारंगुळे, नंदा गुंड, राधा बारंगुळे, शुभांगी बारंगुळे, मॅनेजर सचिन क्षीरसागर, सागर दसंगे, आनंद भोसले, सागर बारंगुळे, श्रीकांत बारंगुळे, रमेश घळके, अजिंक्य बारंगुळे उपस्थित होते.



### श्री वटवृक्ष मंदिरामुळे स्वामी समर्थांची कीर्ती सर्वदूर : सुमीत म्हात्रे

**अक्कलकोट. दि. ४ जुलै-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मुळे व स्वामी समर्थांच्या जागृत वास्तव्यामुळे अनेक भाविकांना स्वामींच्या कार्याची प्रचिती येत आहे.श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानमुळे स्वामी समर्थांची कीर्ती सर्व दूर पसरली असल्याचे मनोगत मुंबई येथील छोट्या पडद्यावरील स्टार प्रवाह या मराठी वाहिनीचे कार्यकारी निर्माता सुमीत म्हात्रे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी सुमीत म्हात्रे, आदेश बांदेकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी सुमीत म्हात्रे बोलत होते. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, धनराज स्वामी, संतोष जमगे, महेश काटकर, श्रीकांत मलवे, विपुल जाधव आदीसह भाविक भक्त उपस्थित होते.



### माहिती अधिकार कार्यकर्त्ता महासंघ जिल्हा उपप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल हेगडेंचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ४ जुलै-**

शिवसेना बांधकाम कामगार सेना सोलापूर जिल्हा उपप्रमुख स्वामीनाथ हेगडे यांची माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ सोलापूर जिल्हा उपप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ सोलापूर जिल्ह्याच्या वतीने त्यांचा सत्कार माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ पश्चिम महाराष्ट्र संघटक डॉक्टर सत्यजित मस्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ सोलापूर शहराध्यक्ष श्रीकांत कोळी, मारुती जाधव, समर्थ बिराजदार उपस्थित होते.



### कृषी दिनानिमित्त वाडीकुरोली येथे वृक्षारोपण

**वेळापूर, दि. ४ जुलै-**

वाडीकुरोली तालुका पंढरपूर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी सलग्नित अकलूज येथील रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषी दिनानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला संचालक धनंजय काळे व समाधानकाळे राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र उपाध्यक्ष तसेच शितल चाटे यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमात वाडी कुरोली येथील ३२ एकर गायरान मध्ये १०० कडुलिंब, कारंज, नारळ इत्यादी प्रकारची झाडे लावण्यात आली व कृषी कन्या यांनी पर्यावरणाचे महत्व, वातावरणातील बदल, शेतावर होणारे बदल, वृक्षारोपणाचे फायदे ग्रामस्थांना पटवून दिले. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर.जी.नलावडे, प्रा. एस एम एकतपुरे कार्यक्रम समन्वयक अधिकारी एम. एम. चंदनकर, कार्यक्रम अधिकारी एच व्ही कल्याणी यांच्या मार्गदर्शनानुसार कृषिकन्या श्रुती पाटोळे, योगिता भोईटे, सानिका जगदाळे, प्रतीक्षा शिखरे, साक्षी कहाकर, रोहिणी रड्डी, प्रणोती देशमुख, तनुजा घुले, वैशाली खिलारे यांनी वृक्षारोपण करून पर्यावरणाबद्दल जनजागृती केली.

## अश्व धावले रिंगणी... होता टाळ-मृदंगाचा ध्वनी...





# संतांचे पालखी सोहळे वाखरीत विसावले

- टाळ, मृदुंगाचा गजर व माऊली...माऊली जयघोष करीत पार पडला रिंगण सोहळा
- अश्वाच्या नेत्रदीपक दौडीने डोळ्यांचे पारणे फिटले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जुलै -**

सावळ्या विठ्ठलाच्या भेटीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून लाखो वैष्णवांसह टाळ, मृदुंगाचा गजर व हरीनामाचा जयघोष करीत भक्तीचे मळे फुलवित आषाढी वारीसाठी पंढरीस निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली, जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज, श्रीसंत सोपानकाका आदिसह राज्यभरातील संतांचे पालखी सोहळे पंढरीसमीप वाखरीत दाखल झाले आहेत. आता पंढरपूर हाकेच्या अंतरावर राहिल्याने वारकऱ्यांत उत्साह होता.

दरम्यान वाखरीत संत ज्ञानदेव व संत तुकोबाराय यांच्या पालखी सोहळ्यातील उभे व गोल रिंगण अत्यंत उत्साही व भक्तीमय वातावरणात पार पडले. उद्या दि. ५ रोजी हा भक्तीचा महासागर विठूरायाच्या भूवैकुंठ नगरीत पोहोचेल व चंद्रभागेत विलीन होईल. पंढरी समीप आल्याने वारकऱ्यांमध्ये उत्साह संचारला आहे. भंडीशेगांव मुक्कामी पहाटे माऊलींची विधीवत पूजा पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांच्या हस्ते करण्यात आली.दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती. आज पालखी तळावर वारकऱ्यांनी दिंड्यामध्ये कांदाभजी करून कांदेनवमी साजरी केली. दुपारचे भोजन घेवून हा सोहळा शेवटच्या वाखरी मुक्कामाकडे मार्गस्थ झाला. दुपारी ४ वाजता हा सोहळा बाजीराव विहीर येथे उभ्या रिंगणासाठी पोहोचला. दुपारी ४.३० वाजता अश्व धावण्यासाठी सोडण्यात आले. टाळ मृदुंगाच्या गजरात माऊलीऽ माऊलीऽऽ नामाचा अखंड जयघोष चालू होता. अश्वांनी धावत जावून माऊलींला एक प्रदक्षणा पूर्ण करीत रथामागे २० दिंड्यांपर्यंत गेला. त्यानंतर पुन्हा रथाजवळ येवून माऊलींचे दर्शन घेतले. नारळ, प्रसाद घेवून पुन्हा तो पंढरीच्या दिशेने धावत आला. यावेळी पुंडलिक वरदा, हरि विठ्ठल असा जयघोष वैष्णवांनी केला व उभे रिंगण पूर्ण करण्यात आले. सायंकाळी ५.३० वाजता रस्त्यालगतच्या मैदानात गोल रिंगण झाले. चोपदार व पोलिसांनी रिंगण आखून घेतले. माऊलींचा व स्वाराचा अश्व रिंगणाच्या मध्यभागी आला. त्यानंतर पताकाधारी व माऊलींची पालखी दिंड्यांसमवेत एक प्रदक्षणा पूर्ण करून रिंगणाच्या मध्यभागी आली. जरी पटक्याचा भोपळे दिंडीचा ध्वज रिंगणात धावण्यासाठी सोडण्यात आला. त्याने २ प्रदक्षणा पूर्ण केल्या. त्यानंतर स्वाराच्या अश्वासह माऊलीच्या अश्वाने लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत नेत्रदिपक दौड केली. २ प्रदक्षणा पूर्ण करून रिंगण सोहळ्याची सांगता झाली. भाविकांनी माऊलीऽ माऊलीऽऽ नामाचा जयघोष केला. रिंगणानंतर दिंड्यामध्ये खेळ रंगले. उडीच्या खेळानंतर हा सोहळा वाखरीकडे मार्गस्थ होत समाज आरतीनंतर तो वाखरीत विसावला.

### संत तुकोबांचे उभे रिंगण

माऊलींचे गोल रिंगण सुरू असतानाच पालखी मार्गावर तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात उभे रिंगण पार पडले. टाळ, मृदुंगाचा गजर व हरीनामाच्या जयघोषात अश्वांनी नेत्रदिपक दौड केली व हा रिंगण सोहळा संपवून तुकोबारायांचा पालखी सोहळा वाखरी मुक्कामासाठी मार्गस्थ झाला.

### शनिवारी पालख्या पंढरीत

शनिवारी दि. ५ रोजी संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत सोपानदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत एकनाथ, संत चौरंगीनाथ, चांगा वटेश्वर, गुलाबबाबा, संतनाथ महाराज, गवार शेठ लिंगायत वाणी (तुकाराम महाराजांचे टाळकरी), संत गोरोबा काका, जगनाडे महाराज आदि संतांच्या पालख्यांना विठुरायाच्या नगरीत नेण्यासाठी संत नामदेव महाराज यांची पालखी वाखरीत येईल. त्यानंतर हे सोहळे पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतील. सर्व संतांना पुढे करून सर्वात शेवटी दुपारी माऊलींची पालखी वाखरीतून पंढरपूरकडे विठ्ठलाच्या भेटीसाठी मार्गस्थ होणार आहे. विसावा पादुका येथे पालखी सोहळ्यातील शेवटचे उभे रिंगण होणार आहे. त्यानंतर आरती होईल. माऊलींच्या पादुका या शितोळे सरकारांच्या गळ्यात दिल्या जातील व त्या पंढरपूरातील ज्ञानेश्वर मंदिरात नेल्या जातील.

## दर्शनरांगेत यंदा दोन जर्मन हँगरची सोय

**▸▸पाच कि.मी.चे अंतर कमी होणार; मंदिर समितीची सुविधा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जुलै -**

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी दर्शन रांगेत भाविकांची माठी गर्दी आहे. दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत गेली आहे. पददर्शनासाठी भाविकांना दर्शनरांगेसाठी फार लांब जाता येऊ नये. यासाठी गोपाळपूर हद्दीत मंदिर समितीकडून सर्व सुविधायुक्त दोन जर्मन हँगरची उपलब्धता केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पदस्पर्श दर्शन रांगेतील भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे तसेच पददर्शन रांगेसाठी जास्त लांब चालत जाता येऊ नये यासाठी गोपाळपूर येथे जर्मन हँगर उभा करण्यासाठी खाजगी मालकीचे अडीच एकर घेण्यात आले असून, या ठिकाणी जर्मन हँगर उभा करण्याचे काम सुरू आहे. पददर्शन रांग या ठिकाणाहून सुरू केल्यास जवळपास तीन किलो मीटर पर्यंतचे दर्शन रांग यामध्ये राहील तसेच आसरा हॉटेल जवळपास एक जर्मन हँगर तयार झाला असून दोन किलोमीटर पर्यंतची दर्शनरांग यामध्ये राहील. पददर्शन रांगेतील भाविकांसाठी दोन जर्मन हँगरची उपलब्धता केल्याने



भाविकांना पददर्शन रांगेत जाण्यासाठी पाच कि.मी. चे अंतर कमी होणार आहे. या ठिकाणी भाविकांना सुरक्षा स्वच्छ पिण्याचे पाणी सुलभ शौचालय आदी आवश्यक सुविधा मंदिर समितीकडून उपलब्ध करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. तसेच गोपाळपूर -रांझणी रोड वरील दर्शन रांगेत लाईट नसल्याने, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गुरुवारी (ता.३ जुलै) रात्री साडेबारा वाजता भेट देऊन संबंधित यंत्रणेना सूचना दिल्या व त्या ठिकाणी तात्काळ प्रकल्प प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षा रक्षकांची नेमणूक देखील करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

## आषाढीत एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार मोफत भोजन

**परिवहन मंत्री सरनाईक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जुलै-**

आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५ हजार २०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आल्याची माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, एसटीचे कर्मचारी ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता निष्ठेने त्यांचे कर्तव्य बजावत असतात. आषाढीच्या काळात त्यांच्या जेवणाची आबाळ होऊ नये म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था करीत आहे. या निमित्ताने माणसातील विठुरायाची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे १३ हजार एसटी कर्मचारी या भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

## रविवारी पंढरपुरात वारकरी महाअधिवेशन

**हिंदू जनजागृती समितीचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जुलै-**

हिंदू जनजागृती समितीतर्फे आषाढी एकादशी दिवशी दि.६ जुलै रोजी पंढरपूर येथील भक्तीमार्गावरील जनकल्याण हॉस्पिटलच्या शेजारील सद्गुरु श्री गंगागिरी महाराज मठात १ वाजता वारकरी अधिवेशन घेण्यात येणार असल्याची माहिती राज्य संघटक सुनील घनवट यांनी दिली.



आळंदी येथे प्रस्तावित असलेला कत्तलखाना, वारीत होणारी घुसखोरी, संतांच्या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून लोकांची दिशाभूल करणे यांसह अन्य प्रश्नांना वाचा फोडणे यांसह जाज्वल्य भक्ती अन् राष्ट्रनिष्ठा यांच्या भूमिकेतून वारकरी ऐक्य साधून महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे करण्याबाबत या अधिवेशनात मंथन होणार आहे. महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत. ज्येष्ठ किर्तनकार संतवीर बंडातात्या कराडकर, वारकरी महामंडळाचे अध्यक्ष रामेश्वरशास्त्री महाराज, सचिव नरहरी महाराज चौधरी, श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त प्रकाश महाराज जवंजाळ, गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त माणिक महाराज मोरे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, हभप ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली), नरेंद्र महाराज मस्के, श्री क्षेत्र आपेगाव येथील विष्णु महाराज आपेगावकर, संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती महाराज, वारकरी महामंडळाचे कोकण प्रांताध्यक्ष भगवान महाराज कोकरे, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे मारुती महाराज तुनतुने, कार्याध्यक्ष बापू महाराज रावकर, राज्य संघटक सुनील घनवट यांसह संत- महंत, ह.भ.प., धर्माचार्य, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. या अधिवेशनात धर्मरक्षणार्थ कार्यरत धर्मरक्षकांचा सन्मान करण्यात येणार आहे. वारकरी-भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी राजन बुणगे - ९७६२७२१३०४ वर संपर्क साधावा.

## माऊलींच्या पालखी सोहळ्यात अडीच लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. ४ जुलै -**

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी आळंदीहून निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात दर्शनासाठी आलेल्या कोल्हापूरच्या व्यक्तीचे अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले. याबाबत गणपती शामराव माने (वय ५०, रा. कांचनवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नातेपुते पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणपती माने व त्यांचा मित्र विष्णु भाऊ पाटील हे नातेपुते येथे ३० जून रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शनासाठी आले होते. लोणारी पेट्रोल पंप येथे पालखीचे दर्शन घेऊन बाहेर येत असताना चोरट्याने विष्णु पाटील यांच्या गळ्यातील १ लाख ६२ हजार रुपये किंमतीची २० ग्रॅम ६७३ मिली वजनाचे सोन्याची चैन तसेच ८८ हजार रुपये किंमतीची १३ ग्रॅम २२० मिली वजनाची सोन्याची चैन असा एकूण २ लाख ५० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेले. म्हणून नातेपुते पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## पालकमंत्री गोरे यांनी केली पत्राशेड, दर्शनरांगेची पाहणी

**वारकरी, भाविकांशी साधला संवाद**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.४ जुलै-**

आषाढी यात्रा सोहळ्यासाठी विठ्ठल-रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून, दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत गेली आहे. पददर्शन रांगेत तसेच पत्राशेड येथे भाविकांसाठी मंदीर समिती व प्रशासन वतीने आवश्यक मुबलक सोयी सुविधा उपलब्ध केल्या असून, या उपलब्ध सोयी सुविधांची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली.



पददर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, तसेच पद दर्शन रांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीकडून करण्यात आलेल्या उपायोजनांची माहिती घेतली. तसेच या ठिकाणी भाविकांसाठी उपलब्ध केलेली शौचालये, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधांची पाहणी केली. तसेच पददर्शन रांगेतील भाविकांशी संवाद साधून मंदीर समितीकडून पत्राशेड, दर्शनरांगेत उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधाबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी पालकमंत्री गोरे यांनी दर्शनरांगेतील भाविकांना मोफत अन्नदान सुरु केले असुन या अन्नदानाचे वाटपही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. वारकरी भाविकांसाठी मंदीर समिती व प्रशासनाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची कमतरता भासणार याची घ्यावी अशा सूचनही पालकमंत्री यांनी यावेळी दिल्या. त्याचबरोबर पाहणी करताना वारकरी व भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पालकमंत्री टुव्हीलरवरुन दर्शनरांगेची गोपाळपूर पर्यंत पाहणी केली.

यावेळी मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर प्रशासनाकडून पत्राशेड, दर्शनरांग, दर्शनमंडप, मंदिरात भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांबाबतची माहिती दिली. तसेच दर्शनरांगेतील भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

यावेळी त्यांच्या समवेत पाहणी करताना कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, सांगोला तहसिलदार संतोष कणसे उपस्थित होते.

## टाळ मृदुंगा बरोबरच 'येरे गड्या मैदानात' असा आवाज वाखरीतच घुमतो : सुशीलकुमार शिंदे

**श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेचे उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जुलै-**

वारकरी सांप्रदायाच्या ठिकाणी टाळ मृदुंगाचा आवाज, तर मांडीवर थाप मारून येरे गड्या मैदानात असा आवाज वाखरीमध्ये घुमतो. हे केवळ डॉ. विश्वनाथ दा. कराडच करू शकतात. त्यांनी पंढरपुरच्या मातीत भक्ती-शक्तीचा संगम दाखविणारी नवी पिढी उभी केली आहे. असे विचार माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले.



विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने वाखरी येथील पालखी तळाच्या शेजारी विश्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक-भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या 'श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धे'च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी हिंद केसरी पै.दिनानाथ सिंग हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. तसेच हभप तुळशीराम दा. कराड, प्रगतशील शेतकरी काशीराम दा. कराड, महाराष्ट्र केसरी विष्णुतात्या जोशीलकर, महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम, डॉ.एस.एन.पठाण, शिवम गुरूजी, डॉ. विश्वजीत नागरगोजे, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. गोपाळकृष्ण जोशी, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे व डॉ. टी.एन.मोरे उपस्थित होते. यावेळी संभाजीनगर येथील पैलवान आकाश दोंगे आणि सोलापूर येथील दादासोहन माने यांच्यात उद्घाटनपर कुस्ती खेळण्यात आली.

सुशीलकुमार शिंदे म्हणाले, संपूर्ण विश्वालाच आपले घर मानणारे डॉ. कराड यांनी कर्तृत्वाच्या जोरावर सर्वधर्मसमभावाने आदर्श संस्था उभ्या केल्या आहेत. आम्ही सर्व एक आहोत ही एक विचारधारा घेऊन जीवन व्यतीत करीत आहेत. मानवात परमेश्वराचे रुप असून विश्वशांतीच्या कार्यासाठी ते झटत आहेत.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास कठीण वज्रास भेदू ऐसे, असा हा वारकरी संप्रदाय आहे. त्यांचे आज येथे विष्णुदास आणि समर्थ असे दर्शन घडले. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. हिंद केसरी पै.दिनानाथ सिंग म्हणाले, लाल मातीतील कुस्तीला जगविण्यासाठी डॉ. विश्वनाथ कराड अथक प्रयत्न करीत आहेत. ज्ञान सागराबरोबर त्यांनी शक्तिची पुजा केली आहे. येथे आलेल्या पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे. तसेच, त्यांनी या क्षेत्राला नवसंजीवनी दिली आहे. प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन हभप शालीकराम खंदारे यांनी केले.